# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

## मा.महापालिका सभा

## कार्यपत्रिका क्रमांक – ६४

## सभावृत्तांत

दिनांक – १७.१०.२०१६ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे ऑक्टोबर-२०१६ ची मासिक मा.महापालिका सभा सोमवार दि.१७.१०.२०१६ रोजी दुपारी २.०० वा.महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब - महापौर

२. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव - उपमहापौर

३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू

५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ

६. मा.भालेकर अरुणा दिलीप

७. मा.सौ.स्वाती प्रमोद साने

८. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)

९. मा.थोरात वनिता एकनाथ

१०. मा.जाधव साधना रामदास

११. मा.जाधव राहुल गुलाब

१२. मा.आल्हाट मंदा उत्तम

१३. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर

१४. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर

१५. मा.पात्रे राम संभाजी

१६. मा.बाबर शारदा प्रकाश

१७. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव

१८. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम

१९. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर

२०. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

२१. मा.तानाजी विठ्ठल खाडे

२२. मा.बो-हाडे शुभांगी संजय

२३. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर

२४. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित

२५. मा.भारती फरांदे

२६. मा.आर.एस.कुमार

२७. मा.जावेद रमजान शेख

२८. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

२९. मा.पांढरकर निलेश शंकरराव

३०. मा.राजू मिसाळ

३१. मा.नंदा विकास ताकवणे

३२. मा.नेटके सुमन राजेंद्र

३३. मा.तरस बाळासाहेब जयवंत

३४. मा.भोंडवे संगिता राजेंद्र

३५. मा.मोरेश्वर महादू भोंडवे

३६. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

३७. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

३८. मा.शमीम पठाण (पठाणबाई)

३९. मा.ॲड.संदीप गुलाब चिंचवडे

४०. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

४१. मा.अपर्णा निलेश डोके

४२. मा.अनंत सुभाष को-हाळे

४३. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

४४. मा.पवार मनीषा काळूराम

४५. मा.प्रसाद शेट्टी

४६. मा.श्रीमती टेकवडे सुजाता अविनाश

४७. मा.काळभोर वैशाली जालिंदर

४८. मा.सौ.साळुंके सविता सुरेश

४९. मा.शेख अस्लम शैकत

५०. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन

५१. मा.मासुळकर समीर मोरेश्वर

५२. मा.वाबळे संजय मल्हारराव

५३. मा.मडिगेरी वर्षा विलास

५४. वसंत (नाना) आनंदराव लोंढे

५५. मा.सुपे आशा रविंद्र

५६. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके

५७. मा.मोहिनीताई विलास लांडे

५८. मा.अजित दामोदर गव्हाणे

५९. मा.गोफणे अनुराधा देविदास

६०. मा.गव्हाणे सुरेखा शंकर

६१. मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

६२. मा.लोंढे शुभांगी संतोष

६३. मा.विश्वनाथ विठोबा लांडे

६४. मा.सावळे सिमा रविंद्र

६५. मा.भोसले राहूल हनुमंतराव

६६. मा.पालांडे सुजाता सुनिल

६७. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद

६८. मा.कदम सदगुरु महादेव

६९. मा.गिता सुशील मंचरकर

७०. मा.कैलास महादेव कदम

७१. मा.छाया जगन्नाथ साबळे

७२. मा.वाघेरे सुनिता राजेश

७३. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

७४. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ

७५. मा.काळे विमल रमेश

७६. मा.पाडाळे निता विलास

७७. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

७८. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे

७९. मा.विमलताई सुरेश जगताप

८०. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार

८१. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

८२. मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदु बारणे

८३. मा.बारणे माया संतोष

८४. मा.यमुनाताई रमणनाना पवार

८५. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड

८६. मा.कलाटे स्वाती मयुर

८७. मा.चौंधे आरती सुरेश

८८. मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

८९. मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

९०. मा.बोकड रामदास गेणभाऊ

९१. मा.जवळकर वैशाली राहुल

९२. मा.जगताप राजेंद्र गणपत

९३. मा.शितोळे शैलजा बाबुराव

९४. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र

९५. मा.प्रशांत शितोळे

९६. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी

९७. मा.काटे रोहितअप्पा सुदाम

९८. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

९९. मा.शेंडगे आशा सुखदेव

१००. मा.मोटे किरण बाळासाहेब

१०१. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

१०२. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब

१०३. मा.बो-हाडे अरुण तुकाराम

१०४. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.तानाजी शिंदे-अति.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.डॉ.अनिल रॉय-आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.डोईफोडे,मा.कडूसकर,मा.दुरगुडे,मा.इंदलकर-सहा.आयुक्त,मा.पवार-कायदा सल्लागार,मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

------

**मा.महापौर-**उपस्थित मा.नगरसेवक व मा.नगरसेविका,मा.आयुक्त,अधिकारी वर्ग,पत्रकार,नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.गोरक्षनाथ लोखंडे-**मा.महापौर साहेब,पांडूरंग खंडुजी जगताप-मा.पंचायत सदस्य व आमदार, चिंचवड विधानसभा लक्ष्मण पांडूरंग जगताप यांचे वडील, पंडीतअण्णा मुंडे-राज्याचे विरोधी पक्षनेते धनंजय मुंडे यांचे वडील,सचिन शेळके-तळेगाव नगरपरीषदेचे माजी नगराध्यक्ष, पै.ज्ञानोबा उर्फ नाना जम-माजी नगरसदस्य,श्रीम.सुरंगाबाई कदम-सामाजिक कार्यकर्ते शशिकांत गणपत कदम यांची आई या मान्यवरांचे नुकतेच दुःखद निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली अर्पण करणेत यावी अशी सूचना मी मांडतो.

**मा.अपर्णा डोके-**मा.महापौर साहेब,सूचनेस अनुमोदन देते.

**मा.महापौर-**श्रध्दांजली वाहणेसाठी सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

**मा.अपर्णा डोके-**मा.महापौर साहेब, आजची सभा आज दि.१८/१०/२०१६ रोजी दुपारी १.०० पर्यंत तहकूब  करणेत यावी अशी सूचना मी मांडते.

**मा.सुजाता पालांडे-**मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देते.

**मा.महापौर-**सन्मा.सदस्यांचे सूचनेप्रमाणे आजची सभा आज दि.१८/१०/२०१६ रोजी दुपारी १.०० पर्यंत तहकूब करणेत येत आहे.

(धराडे शकुंतला भाऊसाहेब)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११०१८

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८

## मा.महापालिका सभा

## कार्यपत्रिका क्रमांक - ६४

## सभावृत्तांत

## (दिनांक १७.१०,२०१६ ची तहकूब सभा)

दिनांक – १८.१०.२०१६ वेळ – दुपारी १.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.१७/१०/२०१६ (माहे ऑक्टोबर-२०१६) ची तहकूब मा.महापालिका सभा मंगळवार दि.१८.१०.२०१६ रोजी दुपारी १.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब - महापौर

२. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव - उपमहापौर

३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू

५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ

६. मा.भालेकर अरुणा दिलीप

७. मा.सौ.स्वाती प्रमोद साने

८. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)

९. मा.थोरात वनिता एकनाथ

१०. मा.जाधव साधना रामदास

११. मा.आल्हाट मंदा उत्तम

१२. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर

१३. मा.पात्रे राम संभाजी

१४. मा.बाबर शारदा प्रकाश

१५. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव

१६. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम

१७. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर

१८. मा.पवार संगीता शाम

१९. मा.तानाजी विठ्ठल खाडे

२०. मा.बो-हाडे शुभांगी संजय

२१. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर

२२. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित

२३. मा.भारती फरांदे

२४. मा.जावेद रमजान शेख

२५. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

२६. मा.नंदा विकास ताकवणे

२७. मा.नेटके सुमन राजेंद्र

२८. मा.तरस बाळासाहेब जयवंत

२९. मा.भोंडवे संगिता राजेंद्र

३०. मा.मोरेश्वर महादू भोंडवे

३१. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

३२. मा.शमीम पठाण (पठाणबाई)

३३. मा.अॅड.संदीप गुलाब चिंचवडे

३४. मा.अपर्णा निलेश डोके

३५. मा.अनंत सुभाष को-हाळे

३६. मा.प्रसाद शेट्टी

३७. मा.श्रीमती टेकवडे सुजाता अविनाश

३८. मा.काळभोर वैशाली जालिंदर

३९. मा.सौ.साळुंके सविता सुरेश

४०. मा.शेख अस्लम शैकत

४१. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन

४२. मा.मासुळकर समीर मोरेश्वर

४३. मा.वाबळे संजय मल्हारराव

४४. मा.मडिगेरी वर्षा विलास

४५. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे

४६. मा.सुपे आशा रविंद्र

४७. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके

४८. मा.मोहिनीताई विलास लांडे

४९. मा.अजित दामोदर गव्हाणे

५०. मा.गोफणे अनुराधा देविदास

५१. मा.गव्हाणे सुरेखा शंकर

५२. मा.सावळे सिमा रविंद्र

५३. मा.पालांडे सुजाता सुनिल

५४. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद

५५. मा.कदम सदगुरु महादेव

५६. मा.कैलास महादेव कदम

५७. मा.छाया जगन्नाथ साबळे

५८. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास

५९. मा.टाक अरुण मदन

६०. मा.आसवानी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम

६१. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ

६२. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे

६३. मा.विमलताई सुरेश जगताप

६४. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार

६५. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

६६. मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदु बारणे

६७. मा.यमुनाताई रमणनाना पवार

६८. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड

६९. मा.बोकड रामदास गेणभाऊ

७०. मा.जवळकर वैशाली राहुल

७१. मा.जगताप राजेंद्र गणपत

७२. मा.शितोळे शैलजा बाबुराव

७३. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र

७४. मा.प्रशांत शितोळे

७५. मा.काटे रोहितअप्पा सुदाम

७६. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

७७. मा.शेंडगे आशा सुखदेव

७८. मा.मोटे किरण बाळासाहेब

७९. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

८०. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब

८१. मा.बो-हाडे अरुण तुकाराम

याशिवाय मा.तानाजी शिंदे-अति.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.चव्हाण-प्र.शहर अभियंता,मा.गावडे-सहआयुक्त,मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.डोईफोडे,मा.दंडवते,मा.दुरगुडे,मा.आष्टीकर-सहा.आयुक्त,मा.पवार-कायदा सल्लागार,मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक, मा.कांबळे-प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक),मा.निकम, मा.लडकत, मा.पिरजादे,मा.बरशेट्टी,मा.गलबले-कार्यकारी अभियंता, मा.बुरसे-मुख्य अभियंता,पीएमपीएमएल हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

**------**

**मा.महापौर-**उपस्थित मा.नगरसेवक व मा.नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.नारायण बहिरवाडे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब आणि सर्व सन्मा.सभागृह, आज वर्तमानपत्रात असे वाचण्यात आले आहे की, नगरपरिषद व नगरपंचायती यांच्या निवडणुकीची आचारसंहिता लागू झाली आहे. यासंदर्भात थोडी माहिती पाहिजे की, पुणे जिल्हा, विधानपरिषदेची जी निवडणूक आहे. त्या निवडणुकीचा वर्तमानपत्रांत कुठेही नामोल्लेख नाही. मग ही सदरची आचारसंहिता आपल्याला लागू होते का काय किंवा राज्य निवडणूक आयोगाकडून आपल्याला काय पत्र आले आहे किंवा आलेल्या पत्राचे वाचन केलेतर लगेच कळेल.

(मा.नगरसचिव यांनी पत्राचे वाचन केले.)

**मा.नारायण बहिरवाडे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब आणि सर्व सन्मा.सभागृह,अशा परिस्थितीत मा.महापालिका सभा घेता येईल किंवा घेता येणार नाही याचा खुलासा करावा. पुणे जिल्हा स्थानिक स्वराज्य संस्था याची मुदत पण संपली आहे. याचा पण उल्लेख यात नाही. तुम्ही खुलासा करताना आत्ता सांगितले आहे की, जिल्ह्यात चारपेक्षा अधिक नगरपरिषदा असतील किंवा त्यांच्या निवडणूका असतील तर संपूर्ण जिल्ह्याला, मग त्यात आपली महानगरपालिका देखील आलेली आहे. मग आपण मिटींगा घेऊ शकतो का घेऊ शकणार नाही. जर आपण मिटींग घेतली आणि विकास कामांचे विषय मंजूर केलेतर या निवडणूका प्रत्यक्षात ग्रामिण भागात, नगरपरिषदा जिथे आहेत तिथे होणार आहेत. पिंपरी चिंचवड शहरात जी विकास कामे सुरु आहेत किंवा आपण नव्याने जे आदेश देणार आहात, त्याचा विपरीत परिणाम तिथल्या मतदारांवर होणार आहे का, कुठल्या प्रभागावर पडणार आहे का हा मुद्दा आहे. आपण विकास कामांना मंजूरी दिलीतर त्याचा परिणाम तिथल्या नगरपरिषद किंवा नगरपंचायतीच्या निवडणूकांवर होणार आहे का. मग हे चुकीचे वाटत नाही का. मिटींग घेता येईल का नाही याचे उत्तर द्या.

**मा.शमिम पठाण**-मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब आणि सर्व सन्मा.सभागृह, आज आचारसंहिता लागू झाली आहे. जे काही निवडणुकीचे नियम आहेत, आचारसंहितेचे नियम आहेत. प्रश्न असा आहे की, डायरेक्ट मतदारांवर ज्या गोष्टीचा प्रभाव पडेल, ज्या कामाचा प्रभाव पडेल. किंवा जे सहाय्य देतो त्याचा प्रभाव पडेल अशी एकही व्यक्ती पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या एरियात, हद्दीत नाही. आपली कामे थांबणार नाहीत. जी चालू आहेत, जी सुरु झाली आहेत, ज्यांना वर्कऑर्डर आहे, त्याबद्दल वाद नाही. आपण पूर्वीपासून पाहत आलो आहोत. प्रश्न हा आहे की, या वर्षी नव्यानेच नगरपरिषद व नगरपालिका यांच्या निवडणूकांमुळे आपल्या मनपा क्षेत्रांत आचारसंहिता लावायची ही पहिलीच वेळ आहे. त्यामुळे सगळे गोंधळलेल्या अवस्थेत आहेत की, आचारसंहिता का लागली, कशी लागली, त्याचे कारण काय. यापूर्वी अशी आचारसंहिता लागू झाली नव्हती. मग त्यादृष्टिने कोणी प्रयत्न केलेत का. मा.आयुक्त साहेबांनी तशी विचारणा केली का. डॉ.माने,निवडणूक प्रमुख यांनी त्याबाबतीत विचारणा केली का. त्यांच्याकडूनच आम्हाला ही माहिती मिळायला पाहिजे होती. जिथल्या निवडणूका डिक्लेअर झाल्या आहेत, आमचे लोक तिथे मतदार नाहीत. असे असताना आपल्यावर का, नवी मुंबई, मुंबई, ठाणे यांना वगळले आहे. तर पिंपरी चिंचवड किंवा पुणे इथल्या कोणत्याच मतदारांचा त्या मतदानाशी संबंध येत नाही. आमच्या ज्या शंका आहेत, त्या निवडणूक विभागाने स्पष्ट कराव्यात. मा.निवडणूक आयुक्त, संबंधित अधिकारी यांच्याशी बोलणे झाले आहे का याबाबतीतही डॉ.माने यांनी खुलासा करावा. इथे एक विषय

रु.१,९२,१०,०००/- चा आहे. निवडणूकीसाठी तो विषय मंजूर करुन घेऊ शकतो का. तुम्ही खर्च करु शकता का.

**मा.नारायण बहिरवाडे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब आणि सर्व सन्मा.सभागृह, मा.नगरसचिव तुम्ही यासंदर्भात खुलासा करावा. मा.आयुक्त साहेबांनी वर्तमानपत्रात माहिती देताना सांगितले की, मा.जिल्हाधिका-यांकडून अद्यापपर्यंत कोणतेही पत्र प्राप्त झालेले नाही. शेवटी म्हटले आहे. एक ओळ अशी आहे. म्हणजे मा.जिल्हाधिका-यांकडून कोणते पत्र आले नाही का. त्यांनी जे सांगितले आहे ते राज्य निवडणूक आयोगाने जनरली सगळ्यांनाच तसे पत्र दिले आहे. परंतू आचारसंहिता लागू करण्याबाबत जिल्हाधिका-यांचे जे पत्र आपल्याला प्राप्त असायला पाहिजे, ते आपल्याला अद्यापपर्यंत प्राप्त झालेले नाही. मा.आयुक्त यांनी सुद्धा पेपरमध्ये तसे सांगितले होते. तसे पत्र आम्हाला प्राप्त झाले नाही. तसे असेलतर आजची मिटींग तुम्ही घ्या.

**मा.मंगलाताई कदम** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब आणि सर्व सन्मा.सभागृह, आम्हाला कोणत्याही प्रकारचा निवडणूक आयोगाचा भंग करायचा नाही. म्हणूनच आम्ही विचारले की, जर मा.महापालिका सभा घ्यायची असेल, कोणत्याही समितीची सभा घ्यायची असेलतर ती प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे हे नागरीकांसाठीच करत असतो. कोणत्याही वैयक्तिक माणसासाठी कोणतीही गोष्ट करत नाही. ही मिटींग घेताना आपण घेऊ शकतो का. घेऊ शकत नसेलतर आत्ता मिटींग तहकूब करतो. दोन वाक्यांत उत्तर पाहिजे. कोणताही विषय असलातरी सभेत येऊ दे. कोणत्याही कमिटीचा विषय असलातरी तो प्रत्यक्ष कोणत्याही नगरसेवकासाठी नसतो, वैयक्तिक नागरीकासाठी नसतो. तो प्रत्यक्ष अप्रत्यक्ष नागरीकासाठी असतो. म्हणून मिटींग घेऊ शकतो का नाही ते सांगावे. इतका साधा, सोप्पा खुलासा द्या. नसेलतर आमचे काही म्हणणे नाही. आम्हाला निवडणूक आयोगापुढे जायचे नाही. कायद्याने जे बंधन आहे, ते पाळायला आम्ही तयार आहोत.

**मा.नगरसचिव-**मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, मा.आयुक्त साहेबांनी आचारसंहितेबाबतीत सर्व विभागांना परिपत्रक पाठवले आहे. त्याची प्रत माझ्याकडे आत्ता आहे. सोबत राज्य निवडणूक आयोगाची आचारसंहिता लागू झालेबाबतची प्रत जोडलेली आहे. आचारसंहितेबाबतीत जो नियम आहे. त्याबाबतीत मी सभागृहाला अवगत करून देऊ इच्छितो की, स्थानिक स्वराज्य संस्थेतील सर्वसाधारण सभा, स्थानिक स्वराज्य संस्थेतील विविध सभा, समित्यांच्या/विशेष समित्यांच्या बैठका,ज्या कायद्यानुसार घेणे बंधनकारक आहे, त्या घेता येतील. परंतू नेमणूका,अनुदान, कर्ज अथवा अर्थसहाय्य मंजूर किंवा अदा करण्यात येऊ नये.

कोणत्याही नवीन कामास मंजूरी देता येणार नाही. तसेच मतदारावर प्रभाव पडेल असा कोणताही धोरणात्मक निर्णय घेता येणार नाही अशा प्रकारची तरतूद आहे. महाराष्ट्र अधिनियम अनुसूची प्रकरण २ नियम १ ओ प्रमाणे, सभागृहाने बहुमताने निर्णय घ्यायला पाहिजे. त्यामुळे आचारसंहितेच्या अनुषंगाने आपण निर्णय घ्यावा, अशी विनंती आहे.

**मा.नारायण बहिरवाडे -** मा.नगरसचिव साहेब तुम्ही बॉल आमच्या कोर्टात कशाला टाकताय. तुम्ही सांगा, आम्ही मिटींग घेऊ शकतो का घेऊ शकणार नाही.

**मा.मंगलाताई कदम** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब आणि सर्व सन्मा.सभागृह, मी इतका सोप्पा प्रश्न विचारला. कोणताही विषय कोणत्याही सदस्यासाठी नसतो. सर्व विषय शहरासाठी, नागरीकांसाठी आहेत. आम्ही मिटींग घेऊ शकतो का नाही घेऊ शकत. आम्हाला उल्लंघन करायचे नाही. आम्ही साडे चार वर्षे काम केले आहे. आम्हाला कोणत्याही नियमाचे उल्लंघन करायचे नाही. फक्त आम्ही मिटींगा घेऊ शकतो का नाही हे सांगा. नाहीतर तुम्ही शॉर्टलिस्ट करा. हे विषय घेऊ शकता, हे विषय घेऊ शकत नाहीत असे सांगा.

**मा.नगरसचिव-**मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, मी खरेतर आयोगाने आचारसंहितेबाबत जे सांगितले आहे त्याची माहिती आपल्याला सांगितलेली आहे. याप्रमाणे मिटींग घ्यावी. कारण मिटींगच्या अनुषंगाने कायद्यात काही तरतूदी आहेत. जसे दोन महापालिका सभा घेतल्या नाहीत तर महापौर पदाबाबतीत सुद्धा निर्णय होऊ शकतो. त्यामुळे मिटींग या घ्याव्याच लागतात. मिटींगा या बोलवण्यात येतील. परंतू त्यात आपल्याला हे बंधन पाळावे लागेल की, धोरणात्मक निर्णय घेता येणार नाही. खर्चाला मान्यता देता येणार नाही. फक्त समित्यांचे अहवाल आहेत, जे पूर्वी झालेले असतात. तेवढ्याबाबतीतच आपल्याला विचार करता येईल,इतर विषयांबाबतीत विचार करता येणार नाही.

**मा.नारायण बहिरवाडे-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, आता हा विषय क्रमांक ३ हा निवडणुकीच्या खर्चाचा वर्गीकरणाचा विषय आहे. त्यासाठी मान्यता घ्यावीच लागणार आहे. त्याशिवाय निवडणूका कशा होणार. अंदाजपत्रकात र.रू.१,९२,१०,०००/- ही निवडणुकीच्या खर्चासाठी तरतूद केलेली आहे. प्रत्यक्ष या निवडणुकीत जे तेरा लाख पन्नास हजार मतदार आहेत, प्रत्येकी शंभर रुपये प्रमाणे तेरा कोटी पन्नास लाखाचा विषय मान्यतेसाठी सभागृहापुढे आला आहे. मग या विषयाला मान्यता द्यायची का नाही द्यायची याचा पण खुलासा करा. जर आपण मान्यता दिलीच नाहीतर निवडणुकीला पैसे कुठून आणणार. आपल्याला निवडणूक पुढे ढकलावी लागेल. मा.महापौर साहेब, हा विषय खूप महत्वाचा आहे. निवडणूकीच्या तरतूद वर्ग

करण्याच्या विषयाला तुम्हाला मान्यता घ्यावीच लागणार आहे. मा.आयुक्त साहेब, तुम्ही खुलासा करा.

**मा.अतिरिक्त आयुक्त** – मा.महापौर साहेब, सर्व सन्मा.सभागृह, काल १७ तारखेला मा.राज्य निवडणूक आयोगाने जिल्ह्यातील नगरपंचायती व नगरपरिषदांची आचारसंहिता जाहिर केली होती. जशा सार्वत्रिक निवडणूक जाहिर होतात व त्यांची आचारसंहिता लागू होते. ज्यादिवशी आचारसंहिता व निवडणूकीचा कार्यक्रम जाहिर होतो, त्या दिवसापासून निवडणूकीचा निकाल लागेपर्यंत आचारसंहितेचा कालावधी असतो. या कालावधीत आचारसंहितेच्या काळामध्ये कोणी काय काम करायचे आहे, शासकीय संस्थांनी काय काम करायचे आहे, राजकीय व्यक्तींनी काय काम करायचे आहे, प्रशासनाने काय काम करायचे आहे याबद्दलची मोडस ऑपरेंडी दिलेली असते. याचा कोड ऑफ कंडक्ट आहे. या कोड ऑफ कंडक्टमध्येच राहून आपल्याला काम करावे लागणार आहे. जसे मा.नगरसचिव यांनी सांगितले, महापालिकेच्या विशेष समित्या आहेत, मा.महापालिका सभा आहे किंवा बाकी विषय समित्या आहेत. त्यांच्या सभा तुम्हाला बोलवाव्या लागणार आहेत. त्या सभांचे कामकाज कसे चालेल. सभेत काय निर्णय घ्यायचा किंवा नाही याबाबतची आचारसंहिता आहे. त्याचे पालन सर्वांनी केले पाहिजे. त्याचे डिटेल्स निवडणूक विभागाने दिले आहेत. हा सर्वस्वी महापालिकेचा अधिकार आहे. त्यामुळे फार खोलात, डिटेल्समध्ये न जाता आचारसंहितेचे पालन होईल अशा प्रकारे सभेचे आयोजन करण्यात यावे. सभा बोलवण्यात यावी व त्याप्रमाणे कामकाज व्हावे अशी अपेक्षा आहे.

**मा.नारायण बहिरवाडे-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, मा.राज्य निवडणूक आयोगाकडून जे पत्र आले आहे, त्यासंदर्भात सांगितले आहे. आपण एकिकडे मिटींग घ्या असे सुद्धा सांगताय. काही विकास कामांचे विषय आहेत, तुम्ही त्याची शॉर्टलिस्ट करा. कुठला विषय फेटाळू शकतो, कुठला विषय तहकूब करु शकतो, याचे आम्हाला सांगा. कारण हा विषय मंजूर करावाच लागणार आहे. विकास कामाचा विषय तो कदाचित आचारसंहिता भंग करणारा असू शकतो. पण या अजेंड्यावर जे विषय आहेत, याबाबतीत नगरसचिव साहेब आपण सांगावे की, हा विषय करु शकतो, हा करु शकत नाही.

**मा.सिमा सावळे** -मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, मला माहित आहे, यातले कोणते विषय करता येतील किंवा नाही करता येतील. परंतू मूर्तीचा अहवाल आपण निश्चितपणे मांडू शकतो. आणि आपण त्यावर चर्चा करु शकतो. त्यासाठी मा.निवडणूक आयोगाचे आपल्याला कोणतेही बंधन नाही. मा.महापौर साहेब, माझी विनंती आहे की, गेले दोन/तीन मिटींग झाल्या. विठ्ठल-रुक्मिणी मूर्तीसंदर्भातील अहवाल सभागृह पटलावर ठेवतो

असे मा.आयुक्तांनी देखील सांगितले होते. हा अहवाल मांडता-मांडता राहीला आहे. मिटींग तीन वेळा तहकूब झाली असेलतर त्याला कोरमची आवश्यकता नाही. जर कोरमची गरज असेलतर हरकत नाही आजची सभा तहकूब करा.

**मा.नगरसचिव** – कोरम लागेल.

**मा.सिमा सावळे** -मा.महापौर साहेब,कोरम लागत असेलतर सभा तहकूब करणार आहात का नाही ते सांगा. आणि जर कोरमची गरज नसेलतर मला विठ्ठल-रुक्मिणी मूर्तीच्या अहवालावर चर्चा करायला परवानगी द्यावी.

**मा.मंगलाताई कदम** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,मा.नगरसचिव आणि माझे सर्व सहकारी, तुम्ही आम्हाला फक्त एवढेच सांगा, मी तुम्हाला इतकं सोप्प विचारलं की, प्रत्येक विषय हा कुणा ना कुणासाठी आहेच. विषय घेऊ शकतो का नाही नाही का हो मध्ये एवढेच सांगा. म्हणजे आम्ही मिटींग तहकूब करायला रिकामे. जर तुम्ही म्हणता, मिटींग घ्यायची. मिटींगला यायचे, सही करायची. मिटींग तहकूब करायची. जर मिटींग घेतली नाहीतर तुमचे नगरसेवक पद रद्द, महापौरांचे महापौर पद रद्द. मग नुसते यायचे आणि सह्या करायच्यात का. आम्ही आजपर्यंत प्रशासनाला सहकार्यच करत आलो आहोत. आम्हाला प्रशासनाला आजही सहकार्य करायचे आहे. सहकार्य करायचे नाही अशातला भाग नाही. हे विषय कसे करावेत याचा खुलासा करा. नाहीतर आम्हाला मिटींग तहकूब करायला. आम्ही पुढील २० तारीख देतो. तुम्ही असे सांगताय का, पुढील २० तारखेला खुलासा देतो. तसे हवेतर सांगा. मिटींग घेता येईल का नाही तेवढे सांगा.

**मा.नगरसचिव**–मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, मी आचारसंहितेबाबतीत परिपत्रकातील मुद्दा वाचून दाखवला आहे. आचारसंहितेच्या कालावधीत कोणताही धोरणात्मक निर्णय घेता येणार नाही. जी कामे सुरु असतील ती तशीच पुढे सुरु ठेवता येतील. यात कोणताही नवीन निर्णय घेता येणार नाही. सभा तर घ्याव्याच लागतील. यात जे समितीचे अहवाल झाले आहेत. कामे ऑलरेडी झाली आहेत. तेवढे यात येतील. अवलोकनाचे विषय करता येतील. मागील काळात सर्वसाधारण सभा तहकूब केली होती. हा सभागृहाचा निर्णय आहे. तो सभागृहाने घेणे अपेक्षित आहे.

**मा.मंगलाताई कदम** - मा.महापौर साहेब, समितीचा अहवाल मंजूर करा आणि मिटींग तहकूब करा अशी विनंती करते. ही सभा गुरुवार दिनांक २०/१०/२०१६ रोजी दु.४.०० वा. पर्यंत तहकूब करा.

**मा.स्वाती साने** – मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन देते.

**मा.शमिम पठाण** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, यात कोणता विषय घेता येईल याचा अभ्यास करुन अधिका-यांनी दि.२० ऑक्टोबरपर्यंत सांगावे.

**मा.नारायण बहिरवाडे-**मा.महापौर साहेब, मिटींग तहकूब करा. परंतू जे विषय मंजूर करु शकतो,तेवढेच विषय अजेंडावर घ्या. ही सभा गुरुवार दिनांक २०/१०/२०१६पर्यंत तहकूब करा.

**मा.तानाजी खाडे**–मा.महापौर साहेब, सभा गुरुवार, दिनांक २० ऑक्टोबर २०१६ रोजी दुपारी ४.०० वा. पर्यंत तहकूब करावी.

**मा.मंदाकिनी ठाकरे** – मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.महापौर** – सन्मा.सदस्यांच्या सूचनेवरुन ही सभा गुरुवार, दिनांक २० ऑक्टोबर २०१६ रोजी दुपारी ४.०० वा. पर्यंत तहकूब करण्यात येत आहे. सर्वांचे आभार मानून ही सभा संपल्याचे जाहीर करण्यात येत आहे.

(धराडे शकुंतला भाऊसाहेब)

**महापौर**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी - ४११०१८

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८

## मा.महापालिका सभा

## कार्यपत्रिका क्रमांक – ६४

## सभावृत्तांत

## (दिनांक १७.१०,२०१६, १८.१०.२०१६ ची तहकूब सभा)

दिनांक – २०.१०.२०१६ वेळ – दुपारी ४.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.१८.१०.२०१६ दुपारी १.०० वा. (माहे ऑक्टोबर-२०१६) ची तहकूब मा.महापालिका सभा गुरुवार दि.२०.१०.२०१६ रोजी दुपारी ४.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब - महापौर
२. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
३. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू
४. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
५. मा.भालेकर अरुणा दिलीप
६. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
७. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
८. मा.सायकर अजय शंकरराव
९. मा.जाधव साधना रामदास
१०. मा.आल्हाट मंदा उत्तम
११. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१२. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
१३. मा.बाबर शारदा प्रकाश
१४. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
१५. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम

१६. मा.उल्हास शेट्टी

१७. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर

१८. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

१९. मा.तानाजी विठ्ठल खाडे

२०. मा.बो-हाडे शुभांगी संजय

२१. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर

२२. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित

२३. मा.भारती फरांदे

२४. मा.आर.एस.कुमार

२५. मा.जावेद रमजान शेख

२६. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

२७. मा.पांढरकर निलेश शंकरराव

२८. मा.राजू मिसाळ

२९. मा.नंदा विकास ताकवणे

३०. मा.नेटके सुमन राजेंद्र

३१. मा.तरस बाळासाहेब जयवंत

३२. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

३३. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

३४. मा.शमीम पठाण (पठाणबाई)

३५. मा.ॲड.संदीप गुलाब चिंचवडे

३६. मा.अनंत सुभाष को-हाळे

३७. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

३८. मा.श्रीमती टेकवडे सुजाता अविनाश

३९. मा.काळभोर वैशाली जालिंदर

४०. मा.सौ.साळुंके सविता सुरेश

४१. मा.शेख अस्लम शैकत

४२. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन

४३. मा.मासुळकर समीर मोरेश्वर

४४. मा.सुपे आशा रविंद्र

४५. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके

४६. मा.गोफणे अनुराधा देविदास

४७. ॲड. नितीन ज्ञानेश्वर लांडगे

४८. मा.सावळे सिमा रविंद्र

४९. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ

५०. मा.भोसले राहूल हनुमंतराव

५१. मा.पालांडे सुजाता सुनिल

५२. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद

५३. मा.कदम सदगुरु महादेव

५४. मा.गिता सुशील मंचरकर

५५. मा.कैलास महादेव कदम

५६. मा.छाया जगन्नाथ साबळे

५७. मा.टाक अरुण मदन

५८. मा.आसवानी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम

५९. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

६०. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ

६१. मा.काळे विमल रमेश

६२. मा.विनोद जयवंत नढे

६३. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

६४. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

६५. मा.ओव्हाळ शेखर अशोक

६६. मा.यमुनाताई रमणनाना पवार

६७. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड

६८. मा.कलाटे स्वाती मयुर

६९. मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

७०. मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

७१. मा.बोकड रामदास गेणभाऊ

७२. मा.जवळकर वैशाली राहुल

७३. मा.जगताप राजेंद्र गणपत

७४. मा.शितोळे शैलजा बाबुराव

७५. मा.जगताप नवनाथ दत्तु

७६. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र

७७. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी

७८. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

७९. मा.शेंडगे आशा सुखदेव

८०. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

८१. मा.संजय केशवराव काटे

८२. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती

८३. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब

८४. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.दिनेश वाघमारे-आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.चव्हाण-प्र.शहर अभियंता,मा.डॉ.अनिल रॉय-आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.दुधेकर, मा.पठाण-सहशहर अभियंता, मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.डोईफोडे,मा.दंडवते, मा.माछरे,मा.दुरगुडे,मा.आष्टीकर-सहा.आयुक्त,मा.कांबळे-प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक),मा.लडकत, मा.बरशेट्टी,मा.गलबले,मा.गायकवाड-कार्यकारी अभियंता,मा.लावंड-कायदा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

------

**मा.महापौर-**उपस्थित मा.नगरसेवक व मा.नगरसेविका,मा.आयुक्त,अधिकारी वर्ग,पत्रकार,नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.आशा शेंडगे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह,खरेतर आपल्या अनेक सभा काही ना काही कारणाने तहकूब होत गेल्या. आपण सभागृहासमोर अहवाल आणणार आहोत. विठ्ठल-रुक्मिणी मूर्ती खरेदीविषयीचा अहवाल होता तो सभागृहासमोर मांडावा अशी मी विनंती करतेय. आम्हाला यावर चर्चा करायची आहे.

**मा.उल्हास शेट्टी**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,मला याठिकाणी खुलासा हवा आहे की, तहकूब मा.महापालिका सभेत आपल्याला हा विषय घेतो का. मा.नगरसचिव यांनी खुलासा करावा. तहकूब मिटींग असल्यामुळे मागणी केली आहे ते करता येते का.

(मा.नगरसचिव यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या अनुसूची प्रकरण २ नियम १ (म) चे वाचन केले.)

**मा.सिमा सावळे** – मा.महापौर साहेब, आत्ता नगरसचिव मा.उल्हास जगताप यांनी जी तरतूद वाचून दाखवली आहे ती तरतूद अजेंड्यावरील विषयांसाठी आहे. अहवाल हा सेपरेट आहे. तो अजेंड्यावर नव्हताच. मला वाटते की, त्याच्यावर कोणतेही बंधन नाही. त्यांनी अजेंड्यावरच्या विषयाच्या संबंधीचे वाचन केले आहे. अहवाल हा सेपरेट विषय होता. मा.आयुक्त यांच्या अधिकारांत त्यावर चर्चा होण्यासाठी कोणत्याही आचारसंहितेची किंवा कुठल्याही बंधनाची गरजच नाही. तो आपण मांडू शकतो. अहवाल देताय मग त्यावर चर्चा सुद्धा व्हायलाच पाहिजे. चर्चा करायला काय बंधन आहे. खरेदीचा विषय आहे का. नवीन काही घेणार आहोत का. चर्चा करायला काय बंदी असली पाहिजे. मा.महापौर साहेब, गेल्या अनेक सभा आपण या मूर्ती अहवालाचा विषय पुढे-पुढे ढकलला आहे. आपण आत्ता पळवाटा शोधतोय ती एकतर नीट शोधा.

**मा.महापौर**–अहवालावर चर्चा करायची असेलतर त्याचे काय नियम आहेत ते अधिका-यांनी सांगावेत.

**मा.डॉ.माने (सहा.आयुक्त,निवडणूक)** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, आचारसंहिता ही विधानपरिषदेची आहे. हे सभेचे कामकाज आहे. आचारसंहिता ही निवडणुकीच्या कामकाजाच्या अनुषंगाने असलेल्या वेगवेगळ्या संहिता आहेत. आणि आत्ताच्या आचारसंहितेचे काल संध्याकाळी डिक्लरेशन झाले आहे. विधानपरिषदेच्या अंतर्गत मा.भारत निवडणूक आयोगाने लावलेल्या आचारसंहितेची अंमलबजावणी सुरु झाली आहे. ही जी चर्चा

चालू आहे ती, सभेच्या कामकाजाच्या अनुषंगाने या सभेअंतर्गत आहे. आचारसंहितेत सभा,बैठका घ्यायला कोणतीही हरकत नाही. फक्त बैठकीत कामकाज काय चालवावे, त्यात धोरणात्मक निर्णय घेता येत नाही अशी यात तरतूद आहे.

**मा.सिमा सावळे** – मा.महापौर साहेब, चर्चेवर कोणतेही बंधन नाही असे आत्ता डॉ.माने यांनी सांगितलेले आहे. माझी आपणास विनंती आहे की, जे काही सत्य आहे ते एकदा जनतेपुढे येऊ द्यावे. अहवालाची प्रत सर्व नगरसेवकांना देण्यात यावी. यावर चर्चा घडवून आणावी. मा.महापौर साहेब, आपल्याला विनंती करते. कारण तसे बंधनच नाही.

**मा.आर.एस.कुमार** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, एक वाजताच्या बैठकीत मी त्या रिपोर्टबद्दल सांगितले होते. या दोन्ही रिपोर्टचा विषय मी मा.महापालिका सभेत प्रथम काढला होता. त्याअनुषंगाने मला रिपोर्ट मागायचा अधिकार आहे. तुम्हीही १५ तारखेच्या महापालिका सभेत सांगितले होते की, पुढील महापालिका सभेत हे पण काढणार. मग रिपोर्ट द्यायला काय हरकत आहे. मा.महापौर साहेब, तुम्ही आयुक्तांना रिपोर्ट द्या म्हणून आदेश द्या. नाहीतर मला प्रशासनाच्या विरोधात प्रिव्हिलेज्ड मोशन करावे लागेल.

**मा.सुलभाताई ऊबाळे**- मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, याठिकाणी आचारसंहितेचे कारण पुढे करुन जो अहवाल आहे तो दडपण्याचा प्रयत्न होतो आहे. कारण अहवालात काय खरे आहे, काय खोटे आहे, यावर तरी चर्चा झाली पाहिजे. याचा निवडणुकीशी कुठे संबंध आहे हे मला कळत नाही. अहवालातले अधिकारी निवडणुकीला उभे राहणार आहेत का आम्ही विधानपरिषदेला उमेदवार म्हणून उभे राहणार आहोत. याचा काय संबंध आहे. मला कळत नाही. आचारसंहितेचा अर्थ तुमच्या सोयीने लावायचा का. तुमच्या सोयीने नियम लावायचे का. तीन ते चार वेळा मिटींग तहकूब झाली. कधी आयुक्त नाहीत म्हणून, कधी काय कारणे देऊन दोन्ही अहवाल नाकारलेत. जसे मा.आर.एस.कुमार साहेब म्हणाले, दोन्हीही अहवाल याचा थेट नागरीकांशी संबंध आहे. लोक वाट बघत आहेत. ते काही विधानपरिषदेचे मतदार आहेत ना नगरपरिषदेचे मतदार आहेत. त्यामुळे तुम्हाला जर अहवाल द्यायचा नसेलतर अधिका-यांनी, मा.आयुक्तांनी लेखी स्वरुपात आत्ता द्यावे की, तुम्ही देऊ शकत नाही. या व्यासपीठावर लेखी द्यावे की, तुम्ही देऊ शकत नाही. अन्यथा अहवाल प्रस्तूत करुन सर्वांना चर्चा करायला मुभा द्यावी. कारण नक्की काय ते तरी कळाले पाहिजे. जनतेपुढे असाच अंधार राहीलातर दोषी कोण आहे. किंवा त्यामागचा सुत्रधार कोण आहे ते तरी कळाले पाहिजे. कशामुळे झाले, काय झाले ते कळाले पाहीजे. नुसताच भ्रष्टाचार झाला पण काय झाले ते तरी कळाले पाहिजे. तुम्ही पहिली मिटींग नोव्हेंबरला घेतलीत. पुढील मिटींग चालू होते का नाही.

नगरसेवक नोव्हेंबरला येतात का नाही. परत कोरमचा मुद्दा आलातर परत मिटींग होणार नाही. या पंचवार्षिकचा हा विषय याच ठिकाणी संपला पाहिजे. आम्हाला खुलासा करु द्या, सगळ्यांना चर्चा करु द्या. आम्हाला लेखी उत्तराची अपेक्षा नाही. नाहीतर आम्ही इथे आंदोलन करु.

**मा.मंगलाताई कदम**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,मी मागच्या मिटींगला सुद्धा सरळ सरळ मागणी केली होती. आम्हाला कोणतीही काहीही अडचण नाही. परंतू आम्ही आजही पुन्हा तेच म्हणतोय की, कमिश्नर डायसवर दिसत नव्हते. मघाशी तीन चार नगरसेवक होते. तहकूबी मांडून झाली होती. त्यानंतर आमचे ज्येष्ठ नगरसेवक सभागृहात आले. ऑलरेडी बोलून झाले होते. म्हणून मी तुम्हाला सांगितले होते की, तुम्ही हा विषय चार वाजता घ्यावा. तोपर्यंत अधिका-यांना संधी द्यावी की,चर्चा करायला येते किंवा नाही येत. विषय देता येतो का नाही. दोन वाजताच्या मिटींगमध्ये हा विषय मांडला होता. त्यांनी नंतर मुद्दा उपस्थित केला होता. म्हणून मी सांगितले की, हा विषय चार वाजता घेण्यात यावा. कारण चार वाजता मा.महापालिका सभा आहे. आणि आत्ता सुद्धा माझी हिच मागणी आहे की, अधिका-यांनी किंवा आयुक्तांनी सरळसरळ खुलासा करावा. सादर करता येत असेलतर सादर करा. अहवाल तयार नसेलतर तसे सांगा. मा.महापौर, मी अशी मागणी करते की, मूर्तीचा खुलासा होण्यामध्ये आमचीही सहमती आहे. आम्हाला त्यात काही नाहीए. अधिका-यांना खुलासा करता येतो का, आयुक्तांना खुलासा करता येतो का ते त्यांनी सांगावे. कशाला आमच्यात. आमचे यात काहीही नाही. प्रशासनाने इथे क्लिअर सांगावे. त्यांना खुलासा करता येतो किंवा नाही ते सांगा. अर्धवट सांगू नका. मागील मिटींगमध्ये सुद्धा विचारले होते, तुम्हाला कोणते कामकाज करता येते, कोणते करता येत नाही ते सांगा. आयुक्त साहेबांनी सांगावे. यावर सांगता येते किंवा नाही येत. करता येत असेलतर तुम्ही खुलासा करा. आम्हाला त्याची काही अडचण नाही. संबंधित जे कोणी असेल त्यांनी खुलासा करावा.

**मा.महापौर –** मा.नगरसचिव यांनी खुलासा करावा.

**मा.नगरसचिव-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, मी आत्ताच तहकूब सभेबाबतीतल्या ज्या तरतूदी आहेत, त्या सभागृहाच्या निदर्शनास आणून दिल्या आहेत. यामध्ये तहकूब सभेत अजेंडावर जे काम आहे तेवढेच काम करता येते. त्याव्यतिरिक्त इतर काम करता येत नाही. हे मी आपल्या निदर्शनाला आणून दिलेले आहे.

**मा.सुलभाताई ऊबाळे**-मा.महापौर साहेब, तुम्ही हि दिशाभूल चालवलेली आहे. हा मुळात जीबीतल्या अजेंडाचा विषय नाही. हा अहवाल आहे. ठरवेला विषय आहे. तुम्ही मागचे प्रोसिडिंग काढा. काय ठरले आहे. आम्ही तुम्हाला सांगतोय. ते काहीपण सांगताहेत.

**मा.सिमा सावळे**-मा.महापौर साहेब, मा.नगरसचिव साहेब वारंवार सांगत आहेत की, अजेंडावरचे राहिलेले कामकाज करायची तरतूद आहे. डॉ.माने यांनी खुलासा केला आहे की, धोरणात्मक निर्णय घेता येत नाही. हा काही धोरणात्मक निर्णय नाही. इथे फक्त केलेल्या चोरीचा उलगडा व्हायचा आहे. त्यासाठी इथे कुठल्या कोरमची काय कशाचीच आवश्यकता नाही. जेवढ्या लोकांनी सह्या केल्या आहेत. त्यावर ६५ लोकांच्या सह्या आहेत. तिथे नोंद झालेली आहे.

**मा.महापौर** – अधिका-यांनी खुलासा करावा. आमच्यावर चोर म्हणवून घेण्याची वेळ येऊ देऊ नका. शब्द जपून वापरा.

**मा.सिमा सावळे**-मा.महापौर साहेब, ज्याप्रकारची दडपशाही चालली आहे, त्यावरुन आम्ही हेच म्हणणार ना. जे करतेय त्याला लागले. प्रशासन दडपशाही करतेय. प्रशासनाने याठिकाणी एकदा खुलासा केला आहे, दोनदा खुलासा केला आहे. याठिकाणी प्रशासनाने आम्हाला लेखी द्यावे की, अशाप्रकारचा अहवाल देता येत नाही. अशा प्रकारचे कामकाज चालणार नाही. तुमच्या मनाप्रमाणे चालणार आहे का काही.

**मा.धनंजय आल्हाट**–मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, विषय अगदी साधा आहे. सन्मा.जगताप साहेबांनी यासंदर्भातील काही नियम सांगितले आहेत. त्यांचेदेखील बरोबर आहे. परंतू गेले काही दिवसांपासून या विषयासंदर्भात सदस्यांनी चौकशीची मागणी केली आहे. मला वाटते, चौकशीची मागणी केल्यानंतर आयुक्तांनी सभागृहात सांगितले होते, मागील मा.महापालिका सभेत अहवाल सादर करणार असे आयुक्त साहेबांनी सांगितले होते. आपला हा अधिकार आहे. प्रशासनाकडे याची विचारणा करण्यापेक्षा आपण प्रशासनाला आदेश द्या की,. या संदर्भातील चौकशी झाली असेल, अहवाल तयार असेलतर तो अहवाल सादर करावा. असा आपला अधिकार आहे. त्याचा आचारसंहितेशी काही संबंधच नाही. हे सभागृहाचे कामकाज आहे. कामकाज करत असताना विषय सोडून जर प्रशासन किंवा शहराच्या संदर्भातील काही प्रश्न असतील, किंवा जर त्याठिकाणी कोणत्या कामात भ्रष्टाचार झाला असेल, किंवा आयुक्त साहेबांनी चौकशी समिती नेमून अहवाल सादर करावा असे सदस्यांकडून सांगितले असेलतर मा.महापौर साहेब, त्यांना सांगायचा तो तुमचा अधिकार आहे. एवढी चर्चा किंवा प्रश्न

विचारायची काही गरज नाही. तुम्ही सन्मा.आयुक्तांना तसे आदेश द्या की, हा अहवाल तयार असेलतर तो ताबडतोब वाचून दाखवावा. मा.महापौर साहेब हा तुमचा अधिकार आहे. आयुक्त साहेबांनी सांगितले होते, यासंदर्भात चौकशी समिती नेमलेली आहे.

**मा.महापौर**–मा.आयुक्त साहेब, सदस्यांनी जे काही त्यांचे म्हणणे मांडले आहे, आयुक्त साहेबांनी खुलासा करावा.

**मा.आर.एस.कुमार**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, इतका सिम्पल मॅटर आहे. चौकशीचा आचारसंहितेशी काही संबंध आहे का. जर अधिका-यांनी आचारसंहितेचे कारण देऊन आज रिपोर्ट सबमिट केला नाहीतर आम्ही अर्बन डेव्हलपमेंटचे विषय घेणार आहोत. तुम्ही कशाला पॉलिटीक्समध्ये एन्ट्री करताय. मी सकाळी आयुक्त साहेबांना फोन केला होता. आयुक्त साहेबांनी सुद्धा सांगितले होते की, यात काही पॉलिसी डिसिजन नाही. कमिश्नर साहेबांनी सुद्धा आदेश दिले आहेत. यात काही पॉलिसी इश्यू नाही, फक्त चोर कोण आहे ते सांगा. नाहीतर आमच्या सर्वांच्या माथ्यावर आम्ही चोर आहोत म्हणून लागतेय. सभागृहात रिपोर्ट सबमिट केला नाहीतर, आम्ही नगरविकास विभागाला रिपोर्ट पाठवू. मी सकाळी फोन केल्यावर मला बोलले, सगळे सांगितले. इथे काय चर्चा चालू आहे. यांनी खाल्ले, पदाधिका-यांनी खाल्ले अशी चर्चा बाहेर चालू आहे. तुम्ही भ्रष्टाचार चालू आहे का नाही, झाला असेलतर कोण जबाबदार हे क्लिअर करा. यात आचारसंहिता कुठे येते. काय संबंध आहे. कोणता पॉलिसी डिसिजन आहे का. मा.नगरसचिव साहेब तुम्ही स्पष्टिकरण करताना अर्धवट केले आहे. अहवालाचा आणि अजेंडाचा काही संबंध नाही. पुढील जी.बी.त देणार, हे तुमचेच शब्द होते. मला आश्चर्य वाटतेय. महापौर मॅडम तुम्ही ऑर्डर द्या, तुम्ही आदेश द्या. तुम्ही सुद्धा सांगितले होते. पुढील मिटींगमध्ये घेऊ म्हणून. मा.महापौर मॅडम तुम्ही आदेश द्या.

**मा.महापौर**–मा.आयुक्त साहेब, आज तीन महिने झाले. आपल्याकडे जो अहवाल आला आहे, तो आपण सादर करावा. काय आहे ते सगळ्यांना कळू द्यात.

**मा.मंगलाताई कदम**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,मा.आयुक्त, आपण खुलासा करावा अशी आमची सुद्धा इच्छा आहे. तुम्हाला हा खुलासा करता येतो किंवा कसे किंवा तुम्हाला काय करता येण्यासारखे आहे, ते तरी कमीतकमी सांगा. ठिक आहे, आम्ही तुमचा सुद्धा रिस्पेक्ट ठेवू शकतो. आज आमच्या महापौरांना पाच मिनिटे उशीर झाला, तसा तुम्हाला सुद्धा पाच मिनिटे उशीर होऊ शकतो. आमचे दुमत नाही. जे काही असेल,आम्हाला क्लिअर चित्र द्या. अहवाल सादर करता येत असेलतर तसे सांगा, नसेलतर तसे सांगा. आम्ही

ज्यावेळी माहिती घेतली, त्यावेळी आम्हाला असेच सांगितले होते की,आम्हाला या गोष्टीवर आता बोलता येणार नाही. सगळ्यांचा गैरसमज कशाला व्हायला पाहिजे की, आम्ही खुलासा होऊ देत नाही किंवा काय. अजिबात असे नाही. तुम्हाला काय करता येते ते स्पष्ट शब्दांत, खुल्लमखुल्ला प्रशासनाने सांगावे.

**मा.महापौर**–मा.आयुक्त साहेब,या विषयावरून आमच्यावर अनेक आरोप होतात. अहवाल तुमच्याकडे आला आहे. आपण तो खुलासा करावा. माझे तुम्हाला आदेश आहेत.

**मा.नारायण बहिरवाडे-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,त्याआधी हे करता येते का ते सांगा.

**मा.महापौर-**मी आदेश दिला आहे. बाकीच्यांनी बोलू नये. ते त्याचे उत्तर देतील. तुम्ही खाली बसा. मी काही अडचणीत नाही. माझ्यावर सुद्धा आरोप झाले आहेत. म्हणून त्यांनी खुलासा करावा. शहराच्या महापौर म्हणून माझा सुद्धा आग्रह आहे की,त्यांनी खुलासा करावा. मी त्यांना आदेश दिला आहे. आयुक्त साहेबांनी खुलासा द्यावा.

**मा.आयुक्त-**मा.महापौर साहेब,सर्व सन्मा.सभागृह,मा.निवडणूक आयुक्त यांच्या आचारसंहिते बाबतीत गाईडलाईन्स आहेत, त्याप्रमाणे आपल्याला कोणताही पॉलिसी डिसिजन घेता येणार नाही, कोणत्याही प्रकारची नवीन योजना मंजूर करता येणार नाही. आचारसंहितेची तत्वे आहेत, ती सर्व सन्माननीय नगरसेवकांना आपण सर्क्युलेट केली आहेत. प्रत्यक्षात विठ्ठल-रुक्मिणी मूर्तीसंदर्भात जो चौकशी अहवाल आहे तो सादर करण्याच्या सूचना मा.महापौर यांनी दिल्या आहेत. त्यावरुन आमचे सहाय्यक आयुक्त, प्रशासन यांना मी आदेश देतो की, त्यांनी हा चौकशी अहवाल मा.नगरसचिव यांच्याकडे सादर करावा. व त्यांनी या पटलावरून हा अहवाल सादर करावा.

**मा.मंगलाताई कदम**–मा.महापौर, आयुक्त साहेबांनी उभे राहून उत्तर दिले आहे. तर मा.नगरसचिव यांनी कृपया उभे राहून त्यांचे उत्तर द्यावे.

**मा.नगरसचिव**–मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, मी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील सभेच्या तरतूदींबाबतीत सभागृहाला यापूर्वीच अवगत करुन दिले आहे. महाराष्ट्र महापालिका अधिनियमाच्या अनुसूची प्रकरण २ १म प्रमाणे, अजेंड्यावरील कामकाज जे आहे, याशिवाय अन्य कामकाज करता येणार नाही. असे मी आपल्या निदर्शनास

आणून दिले आहे. मा.आयुक्त यांनी तसे आदेश दिले. मा.महापौर यांनी आदेश दिले आहेत. खरेतर तहकूब सभेत मला इतर कामकाज घेता येत नाही. तशा कॉपीज् द्यायच्या असतील सन्मा.सदस्यांची तशी मागणी असेल, मा.आयुक्त यांचे आदेश असतील, मा.महापौर यांचे आदेश असतील आणि आचारसंहितेचा भंग होत नसेलतर मला अहवाल सभागृहात सन्मा.सदस्यांना वाटायला हरकत नाही.

**मा.मंगलाताई कदम-**मा.नगरसचिव साहेब, होत नसेलतर तसे सांगा. तुम्ही असे कसे सांगताय. तुम्ही म्हणताय मला दाखल करुन घेता येत नाही, ते म्हणताहेत दाखल करुन घेता येते.

**मा.नगरसचिव** – याबाबतीत निवडणूक शाखा सांगू शकते.

**मा.मंगलाताई कदम** – मा.नगरसचिव साहेब, तुम्ही क्लिअरकट सांगा. तुम्ही म्हणताय विषय दाखल करुन घ्यावा. ते म्हणताहेत दाखल करुन घेता येत नाही. येणा-या मा.महापालिका सभेत तुम्ही विषय दाखल करुन घेणार आहात का. एकमेकांवर ढकलण्यापेक्षा जे असेल ते खुले सांगा.

**मा.सिमा सावळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, माझी मा.उल्हास जगताप यांना नगरसचिव म्हणून विनंती आहे की, आजचा हा जो विषय आहे. अहवालाचा हा विषय काही आजचा नाही. तहकूब जी.बी.तला विषय अजिबात नाही. त्यादिवशी सभागृहापुढे अहवाल मांडणार असे आयुक्त साहेबांनी सभागृहापुढे सांगितले होते. त्यादिवशी अहवाल वाचन होईल, नंतर कामकाज होईल असे सांगितले होते. हा त्या कामकाजाचा पार्ट असल्यामुळे तो कामकाजात नव्याने समाविष्ट होतच नाही. त्यामुळे जी तरतूद मा.नगरसचिव यांनी वाचून दाखवली. ती याठिकाणी लागू होतच नाही असा माझा स्पष्ट आरोप आहे. वारंवार खुलासा करा म्हणून सांगितले. आचारसंहिता लागली म्हणून डॉ.माने यांनी खुलासा केला होता. धोरणात्मक निर्णय घेता येत नाही. परंतू हा निर्णय गेल्या तीन सभा तहकूब सभांतला निर्णय आहे. आयुक्त साहेबांनी उभे राहून सभागृहात वाचन केले होते. त्यांनी सांगितले होते, याठिकाणी विठ्ठल-रुक्मिणी मूर्तीच्या संदर्भातील अहवाल ठेवतोय. फक्त चर्चा बाकी होती. हा त्यांच्या कामकाजाचा पार्ट असल्यामुळे नवीन विषय सभागृहात येत नाहीए. त्यादिवशी आमचे स्पष्ट म्हणणे होते, ते आम्ही वाचणार आहोत. म्हणजे आयुक्त तुम्ही वाचणार आहात. म्हणजे आयुक्त साहेब, आज खरेतर या अहवालाचे वाचन सभागृहात व्हायला पाहिजे. असे आमचे म्हणणे आहे. तुमचे म्हणणे होते की,ते तुम्ही सभागृहाच्या कामकाजात दाखल करुन घ्या. तो त्याच दिवशी सभागृहाच्या कामकाजात दाखल झालेला आहे. आम्ही मागणी करतोय, अहवालाचे वाचन करा. आम्ही दाखल करा असे म्हटलेलो नाही. त्यादिवशीच दाखल केलेले आहे. आजची ही तिसरी

सभा आहे. मा.नगरसचिव यांनी जी तरतूद वाचून दाखवली. त्याचा व याचा काहीही संबंध नाही. आपण सभागृहात त्याठिकाणी उभे राहून सांगितले होते की, याठिकाणी सभागृहात अहवाल वाचणार आहे. त्यादिवशी कामकाज पहिले करणार,नंतर वाचणार असे सांगितले आणि सभा तहकूब केली.

**मा.महापौर-**मा.आयुक्त साहेब तुम्हाला आदेश दिले आहेत. मग बाकीच्यांना बोलायला देण्यापेक्षा तुम्ही तेवढे काम करा.

**मा.आर.एस.कुमार**–मा.महापौर साहेब, आयुक्त साहेबांनी सभागृहात स्पष्ट सांगितले होते, मा.नगरसचिव यांच्याकडे अहवाल सुपूर्द करा. मग नगरसचिव जर त्यांच्या इन्स्ट्रक्शन्स ओबे करत नसतील तर तुम्ही इमॅजिन करा. तुम्हाला कमिशनरांच्या ऑर्डर्स फॉलो कराव्याच लागतील.

**मा.नगरसचिव-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,सभेच्या कामकाजाच्या तरतुदी सन्मा.सभागृहाच्या निदर्शनाला आणून दिल्या आहेत. यामध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या अनुसूची प्रकरण २ कलम १ओ प्रमाणे असे नमूद केले आहे की, एखाद्या सभेपुढे नोटीस न देता तातडीचे कामकाज आणण्यास स्थायी समितीस, परिवहन समितीस किंवा आयुक्तास परवानगी द्यावी किंवा कसे या प्रश्नाव्यतिरिक्त अन्य प्रत्येक प्रश्नावर, या अधिनियमात किंवा त्याअन्वये अन्यथा तरतूद करण्यात आली नसेलतर, सभेत उपस्थित असलेल्या व त्या प्रश्नावर मतदान करणा-या पालिका सदस्यांच्या बहुमताने निर्णय घेण्यात आला पाहिजे आणि समसमान मते पडतील तेव्हा अध्यक्षस्थानी असलेल्या प्राधिका-यास दुसरे किंवा निर्णायक मत असेल.

परंतू मला आदरणीय महापौर मॅडम, मा.आयुक्त साहेबांनी जो आदेश दिला आहे, सभागृहात अहवाल सादर करायचा. माझ्याकडे त्याच्या प्रती प्राप्त झाल्या नाहीत. त्या प्रती प्राप्त झाल्यातर मला त्या सन्मा.सदस्यांना देता येतील.

**मा.शमिम पठाण**–मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,आत्ताच सन्मा. सदस्यांनी सांगितले की, हा अहवाल यापूर्वी सभागृहात ठेवला आहे. सभागृहात आम्हीही आहोत. सभागृह म्हणजे फक्त मा.आयुक्त नाहीत. आम्ही सभासद आहोत. सर्वांनी मिळून हे सभागृह चालवतो. अहवाल आमच्यापुढे आलेला नाही. कसा ते म्हणाले अहवाल ठेवला म्हणून. अहवाल ठेवणे याचा अर्थ तो आमच्याकडे येणे. तो पूर्वी ठेवलेला नाही. तुम्हाला बोलत नाही. तुम्ही फार तज्ज्ञ आहात. आम्हाला काहीच कळत नाही म्हणून आम्ही विचारतो.

**मा.महापौर-**मा.आयुक्त साहेब, अहवाल कोणाकडे आला आहे. तुम्ही ठेवायला सांगितलाय पण तो अहवाल तुम्ही मा.नगरसचिव यांच्याकडे ठेवायला सांगायला पाहिजे होता. आज किती दिवस झाले आहेत. कोणी कोणाशी भांडू नका. शांत रहा. आत्ता आयुक्त साहेबांना आदेश दिले आहेत. त्यांना त्या अहवालाचे बघू द्यात.

**मा.सिमा सावळे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, मा.महापौर साहेब, आपण कमिशनरांना आदेश केला, कमिशनर यांनी नगरसचिव यांना सांगितले. कमिशनरांनी सांगितल्यानंतर सुद्धा सन्मा.नगरसचिव यांनी याठिकाणी त्यांच्या आदेशाचे पालन केलेले नाही.

**मा.महापौर-**सहा.आयुक्त,प्रशासन यांनी हा अहवाल वाचून दाखवावा. मा.नगरसचिव यांनी त्याची प्रत सदस्यांना वाटावी.

**मा.डॉ.महेशकुमार डोईफोडे (सहा.आयुक्त,प्रशासन विभाग)** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,दिंडी प्रमुखाला देण्यात आलेल्या विठ्ठल-रुक्मिणी मूर्ती खरेदी संदर्भातील भ्रष्टाचाराच्या चौकशीकरीता द्विसदस्यी समिती नेमण्यात आली होती. त्याअनुषंगाने मा.महापौर यांनी आदेश दिले आहेत. त्यानुसार मी मा.आयुक्त यांच्या वतीने हा चौकशी अहवाल सभागृहापुढे वाचून दाखवितो आहे.

(मा.डॉ.महेशकुमार डोईफोडे,सहा.आयुक्त,प्रशासन विभाग यांनी विठ्ठल-रुक्मिणी मूर्ती खरेदी संदर्भातील द्विसदस्यी समितीचा अहवाल सभागृहासमोर वाचून दाखवला.)

**मा.मंगलाताई कदम** -.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,एक म्हण आहे, डोंगर मोठा-मोठा पोखरला आणि काय झाले. यात काय होते. मा.महापौर यात काय आहे. कारण आज जर अशी परिस्थिती असेल, काही सदस्यांना यात असे वाटत असेल की यात फार मोठा चोर आहे. किंवा काय आहे. आत्ताच्या वाचनात मी जेवढे बघितले किंवा मला जेवढे ऐकायला आले, त्या पद्धतीने यात तुम्ही मला सांगा, काय काय काय आणि शेवटी काय. साहेब, तुम्ही पहिल्यांदा खुलासा करायचा. अधिका-यांना त्यांच्याकडील उत्तरे आम्हाला प्राप्त झाली आहेत. त्यावर आम्ही निर्णय घेतलेला नाही. तोपर्यंत हा अहवाल अपूर्ण आहे. हे जर सांगितले असते तर, सभागृहाचा वेळ गेला नसता. एक तास झाला, आम्ही इथे बसलेलो आहोत. आणि आत्ता अक्षरशः आमच्या एक भगिनी कोणाला म्हणाल्यात ते माहित नाही. आम्ही कशाला आम्हाला म्हणवून घेऊ. त्या म्हणाल्या म्हणून आम्हाला लागायची गरज नाही. परंतू सभागृहात असे

शब्द येत असतील तर तुम्ही पहिल्यांदा सांगितले असते, याबाबतीत अधिका-यांना कारणे दाखवा नोटीस दिली आहे. आम्हाला त्यांच्याकडून उत्तर प्राप्त होते आहे. आम्हाला ते उत्तर प्राप्त झाल्यानंतर आम्ही तुम्हाला देतोय. असे सांगितले असतेतर मग एवढा वेळ गेला नसता. सभागृहात एरवी आपण कोरम मागतो. आम्हाला असेही म्हणायचे नाहीए. जे काही सत्तेसमोर आहे ते येऊ दे. राष्ट्रवादी पक्षाच्या वतीने आम्हाला असे सांगायचेच नाही की, कोणती गोष्ट झाकून ठेवा. कोणती गोष्ट अशी ठेवा. आणि म्हणून तुम्हाला यात काय पारदर्शकता, तुम्हाला काय करायचेय ते यात करा. कोणाच्या मनात जी शंका आहे त्याचे निरसन करा. मा.महापौर, माझी सर्वांच्या वतीने विनंती आहे की, आजची मिटींग दि.२३/११/२०१६ रोजी दुपारी २.०० वा. पर्यंत तहकुब करण्यात यावी.

**मा.सुजाता पालांडे** – मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन आहे.

(सभागृहात गोंधळ)

**मा.मंगलाताई कदम** – मा.महापौर साहेब, सभेच्या नियमाप्रमाणे कामकाज चालवा. तुम्ही मिटींग तहकूब करणार आहात का नाही ते सांगा. निर्णय द्या. तहकूबीची सूचना मांडली आहे. मा.नगरसचिव तुम्ही सभेचे कामकाज नियम सांगा.

**मा.महापौर** – मला सभेचे कामकाज सगळे माहिती आहे. माझे अधिकार कोणी हिसकावून घ्यायचा प्रयत्न करु नका. मला सभागृह चालवता येते. मी सगळ्यांचे विचार ऐकते. मला सभेचे नियम कोणी सांगू नयेत. कोणी हात वर केला नाही. सगळे उभे राहिले आहेत. ही काय सभागृहाची पद्धत झाली का. आपण नगरसेवक आहोत, आपण कशापद्धतीने सभेत काम करावे ते तुम्हाला कळत नाही का. तुम्ही सभागृहाचे नियम पाळावेत.

**मा.सिमा सावळे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,तुम्ही मला बोलायला संधी दिली आहे म्हणून मी बोलते आहे.

**मा.शमिम पठाण**–मा.महापौर, तुम्ही त्यांना बोलायला सांगितले आहे का. मग तहकुबीचे काय झाले.

**मा.महापौर**–हो मी त्यांना बोलायला सांगितले आहे. तहकूबी स्विकारायची का नाही ते सुद्धा मला कळतेय. मघाशी मी तहकूबी स्विकारली नव्हती. त्यांना फक्त दोन शब्द बोलायला लावा.

सगळे बाहेर गेले होते. तुम्ही असे काय करताय. आपले एवढे काय चुकले आहे. सभागृह हे शेवटी महापौरांचे सुद्धा आहे.

**मा.शमिम पठाण**–मा.महापौर, पक्षनेत्यांनी तहकूबी दिली होती. ती त्यांना देऊ द्या.

**मा.महापौर** – बाई तुम्ही खाली बसा. महापौरांचे आदेश आहेत. तुम्ही खाली बसा.

**मा.शमिम पठाण**–मा.महापौर, आम्ही खाली बसायचे आणि लोकांनी आमच्या डोक्यावर मि-या वाटायच्या.

**मा.सिमा सावळे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, तुमचे याठिकाणी मनापासून कौतुक करते की, तुम्ही आज सन्मा.आयुक्तांना अहवाल मांडायला सांगितलात. अहवाल मांडला गेला. तुमच्यावर अनेक दिवसांपासून टिका होत असताना तुम्ही ही शांतता दाखवलीत. तुमचे मनापासून स्वागत करते.

**मा.शमिम पठाण**–मा.महापौर,तुम्ही पक्षाचा विडा उचलला आहे. आमचा तुमच्यावर आरोप आहे.

**मा.महापौर**–माझाचं विडा उचलला आहे. मला सत्य बोलता येते. सत्य वागता येते. मी पक्षाचे वाट्टोळे केलेले नाही. मी सतत पक्षाच्या बाजूने लढत राहीले आणि तुम्ही मात्र पक्षाचे वाट्टोळे करुन महापौरांचा नेहमी अपमान केलेला आहे. सन्मा.सभागृह, सन्मा.नगरसेवक, अधिकारी वर्ग, आयुक्त साहेब, पत्रकार बंधू, कामगार वर्ग, यांचे आभार मानून आजची सभा बुधवार, दि.२३/११/२०१६ रोजी दुपारी २.०० वा. पर्यंत तहकूब करण्यात येत आहे.

(धराडे शकुंतला भाऊसाहेब)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

**<u>पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८</u>**

**<u>मा.महापालिका सभा</u>**

**<u>कार्यपत्रिका क्रमांक – ६४</u>**

**<u>सभावृत्तांत</u>**

**<u>(दिनांक १७.१०,२०१६, १८.१०.२०१६, २०.१०.२०१६ (दु.४.०० वा.) ची तहकूब सभा)</u>**

<u>दिनांक – २३.११.२०१६</u> <u>वेळ – दुपारी २.०० वाजता</u>

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.२०.१०.२०१६ दुपारी ४.०० वा. (माहे ऑक्टोबर २०१६) ची तहकूब मा.महापालिका सभा बुधवार दि.२३.११.२०१६ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव - उपमहापौर
२. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
३. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
४. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
५. मा.थोरात वनिता एकनाथ
६. मा.जाधव साधना रामदास
७. मा.जाधव राहुल गुलाब
८. मा.आल्हाट मंदा उत्तम
९. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१०. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
११. मा.पात्रे राम संभाजी
१२. मा.बाबर शारदा प्रकाश
१३. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
१४. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
१५. मा.उल्हास शेट्टी
१६. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर

१७. मा.पवार संगीता शाम

१८. मा.ऊबाळे सुलभा रामभाऊ

१९. मा.बो-हाडे शुभांगी संजय

२०. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर

२१. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित

२२. मा.भारती फरांदे

२३. मा.आर.एस.कुमार

२४. मा.चारुशीला प्रभाकर कुटे

२५. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

२६. मा.पांढरकर निलेश शंकरराव

२७. मा.नंदा विकास ताकवणे

२८. मा.नेटके सुमन राजेंद्र

२९. मा.तरस बाळासाहेब जयवंत

३०. मा.भोंडवे संगिता राजेंद्र

३१. मा.मोरेश्वर महादू भोंडवे

३२. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

३३. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

३४. मा.शमीम पठाण (पठाणबाई)

३५. मा.ॲड.संदीप गुलाब चिंचवडे

३६. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

३७. मा.अपर्णा निलेश डोके

३८. मा.अनंत सुभाष को-हाळे

३९. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

४०. मा.जयश्री वसंत गावडे

४१. मा.पवार मनीषा काळूराम

४२. मा.प्रसाद शेट्टी

४३. मा.श्रीमती टेकवडे सुजाता अविनाश

४४. मा.काळभोर वैशाली जालिंदर

४५. मा.सौ.साळुंके सविता सुरेश

४६. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन

४७. मा.मासुळकर समीर मोरेश्वर

४८. मा.वाबळे संजय मल्हारराव

४९. मा.मडिगेरी वर्षा विलास

५०. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे

५१. मा.सुपे आशा रविंद्र

५२. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके

५३. मा.मोहिनीताई विलास लांडे

५४. मा.अजित दामोदर गव्हाणे

५५. मा.गोफणे अनुराधा देविदास

५६. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे

५७. मा.श्रध्दा बाजीराव लांडे

५८. मा.लोंढे शुभांगी संतोष

५९. मा.विश्वनाथ विठोबा लांडे

६०. मा.ननवरे जितेंद्र बाबा

६१. मा.सावळे सिमा रविंद्र

६२. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ

६३. मा.भोसले राहूल हनुमंतराव

६४. मा.पालांडे सुजाता सुनिल

६५. मा.बहल योगेश मंगलसेन

६६. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद

६७. मा.कदम सदगुरु महादेव

६८. मा.गिता सुशील मंचरकर

६९. मा.कैलास महादेव कदम

७०. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास

७१. मा.टाक अरुण मदन

७२. मा.वाघेरे सुनिता राजेश

७३. मा.आसवानी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम

७४. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

७५. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ

७६. मा.काळे विमल रमेश

७७. मा.पाडाळे निता विलास

७८. मा.विनोद जयवंत नढे

७९. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

८०. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे

८१. मा.विमलताई सुरेश जगताप

८२. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार

८३. मा.बारणे निलेश हिरामण

८४. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

८५. मा.बारणे माया संतोष

८६. मा.यमुनाताई रमणनाना पवार

८७. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड

८८. मा.कलाटे स्वाती मयुर

८९. मा.चौंधे आरती सुरेश

९०. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

९१. मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

९२. मा.बोकड रामदास गेणभाऊ

९३. मा.जवळकर वैशाली राहुल

९४. मा.जगताप राजेंद्र गणपत

९५. मा.शितोळे शैलजा बाबुराव

९६. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र

९७. मा.जम सोनाली पोपट

९८. मा.प्रशांत शितोळे

९९. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी

१००. मा.काटे रोहितअप्पा सुदाम

१०१. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

१०२. मा.शेंडगे आशा सुखदेव

१०३. मा.मोटे किरण बाळासाहेब

१०४. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

१०५. मा.संजय केशवराव काटे

१०६. मा.धुमाळ बाबासाहेब निवृ-त्ती

१०७. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब

१०८. मा.पाटील सुजित वसंत

१०९. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.दिलीप गावडे-सहआयुक्त, मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.दुधेकर,मा.पठाण-सहशहर अभियंता,मा.दुरगुडे-सहा.आयुक्त, मा.कांबळे-प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक), मा.लावंड-कायदा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

**------**

**(सभा भरविणेसाठी नेमलेल्या वेळी मा.महापौर हे सभागृहात उपस्थित नसल्यामुळे आजच्या सभेचे अध्यक्षस्थान उपमहापौर मा.प्रभाकर नामदेव वाघेरे यांनी स्विकारले.)**

**मा.उपमहापौर -** उपस्थित मा.नगरसेवक व मा.नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.उल्हास शेट्टी-**मा.महापौर साहेब,मी सभागृहाला विनंती करतो की, ही सभा सोमवार दि.२८ नोव्हेंबर २०१६ रोजी दुपारी २.०० वा. पर्यंत तहकूब करण्यात यावी.

**मा.अपर्णा डोके-**मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.उपमहापौर–**ही सभा बुधवार,दि.२८/११/२०१६ रोजी दुपारी २.०० वा. पर्यंत तहकूब करण्यात येत आहे. सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर करण्यात येत आहे.

(वाघेरे प्रभाकर नामदेव)

**उपमहापौर**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी - ४११०१८

**<u>पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८</u>**

**<u>मा.महापालिका सभा</u>**

**<u>कार्यपत्रिका क्रमांक – ६४</u>**

**<u>सभावृत्तांत</u>**

**<u>(दिनांक १७.१०,२०१६, १८.१०.२०१६, २०.१०.२०१६ (दु.४.०० वा.),</u>**

**<u>२३.११.२०१६ (दु.२.०० वा.) ची तहकूब सभा)</u>**

<u>दिनांक – २८.११.२०१६</u> <u>वेळ – दुपारी २.०० वाजता</u>

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.२३.११.२०१६ दुपारी २.०० वा. (माहे ऑक्टोबर-२०१६) ची तहकूब मा.महापालिका सभा सोमवार दि.२८.११.२०१६ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब - महापौर

२. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव - उपमहापौर

३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

४. मा.भालेकर अरुणा दिलीप

५. मा.सौ.स्वाती प्रमोद साने

६. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)

७. मा.थोरात वनिता एकनाथ

८. मा.जाधव साधना रामदास

९. मा.जाधव राहुल गुलाब

१०. मा.आल्हाट मंदा उत्तम

११. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर

१२. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर

१३. मा.पात्रे राम संभाजी

१४. मा.बाबर शारदा प्रकाश

१५. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव

१६. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम

१७. मा.उल्हास शेट्टी

१८. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर

१९. मा.पवार संगीता शाम

२०. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

२१. मा.तानाजी विठ्ठल खाडे

२२. मा.बो-हाडे शुभांगी संजय

२३. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर

२४. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित

२५. मा.भारती फरांदे

२६. मा.आर.एस.कुमार

२७. मा.जावेद रमजान शेख

२८. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

२९. मा.पांढरकर निलेश शंकरराव

३०. मा.नंदा विकास ताकवणे

३१. मा.नेटके सुमन राजेंद्र

३२. मा.तरस बाळासाहेब जयवंत

३३. मा.भोंडवे संगिता राजेंद्र

३४. मा.मोरेश्वर महादू भोंडवे

३५. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

३६. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

३७. मा.शमीम पठाण (पठाणबाई)

३८. मा.ॲड.संदीप गुलाब चिंचवडे

३९. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

४०. मा.अपर्णा निलेश डोके

४१. मा.अनंत सुभाष को-हाळे

४२. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

४३. मा.जयश्री वसंत गावडे

४४. मा.पवार मनीषा काळूराम

४५. मा.प्रसाद शेट्टी

४६. मा.श्रीमती टेकवडे सुजाता अविनाश

४७. मा.काळभोर वैशाली जालिंदर

४८. मा.सौ.साळुंके सविता सुरेश

४९. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन

५०. मा.मासुळकर समीर मोरेश्वर

५१. मा.वाबळे संजय मल्हारराव

५२. मा.मडिगेरी वर्षा विलास

५३. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे

५४. मा.सुपे आशा रविंद्र

५५. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके

५६. मा.मोहिनीताई विलास लांडे

५७. मा.अजित दामोदर गव्हाणे

५८. मा.गोफणे अनुराधा देविदास

५९. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे

६०. मा.श्रध्दा बाजीराव लांडे

६१. मा.लोंढे शुभांगी संतोष

६२. मा.विश्वनाथ विठोबा लांडे

६३. मा.सावळे सिमा रविंद्र

६४. मा.बनसोडे शकुंतला काशिनाथ

६५. मा.भोसले राहूल हनुमंतराव

६६. मा.पालांडे सुजाता सुनिल

६७. मा.बहल योगेश मंगलसेन

६८. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद

६९.मा.कदम सदगुरु महादेव

७०. मा.गिता सुशील मंचरकर

७१. मा.कैलास महादेव कदम

७२. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास

७३. मा.टाक अरुण मदन

७४. मा.वाघेरे सुनिता राजेश

७५. मा.आसवानी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम

७६. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

७७. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ

७८. मा.काळे विमल रमेश

७९. मा.विनोद जयवंत नढे

८०. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

८१. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे

८२. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार

८३. मा.बारणे निलेश हिरामण

८४. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

८५. मा.बारणे माया संतोष

८६. मा.यमुनाताई रमणनाना पवार

८७. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड

८८. मा.कलाटे स्वाती मयुर

८९. मा.चौंधे आरती सुरेश

९०. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

९१. मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

९२. मा.बोकड रामदास गेणभाऊ

९३. मा.जवळकर वैशाली राहुल

९४. मा.जगताप राजेंद्र गणपत

९५. मा.शितोळे शैलजा बाबुराव

९६.मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र

९७. मा.अतुल अरविंद उर्फ नानासाहेब शितोळे

९८. मा.प्रशांत शितोळे

९९.मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी

१००. मा.काटे रोहितअप्पा सुदाम

१०१. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

१०२. मा.शेंडगे आशा सुखदेव

१०३. मा.मोटे किरण बाळासाहेब

१०४. मा.संजय केशवराव काटे

१०५. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती

१०६. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब

१०७. मा.पाटील सुजित वसंत

१०८. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.गावडे-सहआयुक्त,मा.उल्हास जगताप-नगरसचिव,मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.चव्हाण-प्र.शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय-आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.ठाकूर-उपसंचालक नगररचना,मा.लांडे-मुख्य लेखापाल,मा.पाटील,मा.दुधेकर,मा.पठाण-सहशहर अभियंता, मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.डोईफोडे, मा.माने, मा.खोसे, मा.दंडवते, मा.कडूसकर, मा.माछरे, मा.दुरगुडे, मा.आष्टीकर, मा.इंदलकर-सहा.आयुक्त, मा.पवार-कायदा सल्लागार, मा.साळुंके-मुख्य उदयान अधिक्षक,मा.कांबळे-प्र.शिक्षण अधिकारी (माध्यमिक), मा.तांबे, मा.कुलकर्णी, मा.कांबळे -कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

------

**<u>प्रश्नोत्तरे</u>**

**मा.नगरसचिव –** मा.सुलभाताई रामभाऊ उबाळे, नगरसदस्या यांना विचारावयाचे प्रश्न.

**मा.महापौर** – मा.सुलभाताई उबाळे.

**मा.सुलभाताई ऊबाळे –** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, मुख्य उद्यान अधिक्षक यांची एँजोप्लास्टी किंवा एँजोग्राफी झालेली आहे. त्यांचे प्रकृति अस्वास्थ्यामुळे मानवतेचा दृष्टिकोण ठेऊन त्यांना जास्त त्रास देण्याचा माझा अजिबात हेतू नाही. परंतू उद्यान विभाग हा प्रत्येक नगरसेवकाच्या प्रभागातील जिव्हाळ्याचा विषय आहे. मा.महापौर, पहिला प्रश्न होता की, २०१२ पासून आजपर्यंत शहरात किती वृक्षारोपण केले गेले. त्याची जी उत्तरे दिली गेली आहेत. त्यात सन २०१२ पासून आजपर्यंत २,४०,००० झाडे लावली व ६२,६४३ झाडे विक्री व वाटप केले. म्हणजे २५ टक्के झाडे वाटली गेली आहेत. महापालिकेने २००३-२००४ ला वृक्षगणना केली, तेव्हा १७,५९,०१२ इतकी झाडांची संख्या असल्याचे सांगितले गेले. गेले दहा ते बारा वर्षांमध्ये वृक्षगणनाच झालेली नाही. म्हणजे एवढ्या मोठ्या शहरात वृक्षगणनाच झालेली नाही. त्यात महत्वाचे हे सांगितले गेले की, जीआयएस किंवा जीपीएस वापरुन वृक्षगणना करायची आहे. मग एखादे तंत्र वापरायचे तर असे तंत्र वापरायचे ते आपल्याला अवगत होत नाही किंवा काही अडचणी येतात. मग याचा अर्थ असा होत नाही की,वृक्षगणनाच करायची नाही. त्यांना कुणी सांगितले होते का, जीपीएसद्वारेच वृक्षगणना करायची, बाकी प्रकारे करायचीच नाही. परंतू वृक्षगणनेकडे पूर्णपणे दूर्लक्षच केले गेले आहे

मा.महापौर साहेब, तुम्हालाही माहितच असेल की, आपल्याकडे वृक्षारोपण सप्ताह राबविला जातो. त्यात नगरसेवकांच्या मागणीनुसार किंवा आपण दाखवतोय की, निम्म्यापेक्षा जास्त रोपे वाटण्यातच धन्यता मानतो. आपण स्वतः किती झाडे लावतो, हा संशोधनाचाच विषय आहे. उद्यान विभागात किती झाडे लावलीत किंवा किती रोपे वाटलीत यात खरेतर पांढ-याचे काळे करुन त्याच्या फाईली बनवल्या गेल्या आहेत. यात सांगितले गेले आहे की, ७५ टक्के वृक्ष अस्तित्वात आहेत. जर गेले १०/१२ वर्षांपासून वृक्षगणना झालेली नाहीतर तुम्ही कसे काय सांगू शकता की, ७५ टक्के वृक्ष अस्तित्वात आहेत म्हणजे यांनी बिनधास्तपणे मागितलेल्या प्रश्नांची अंदाजे रेटून खोटी उत्तरे दिली आहेत. आपल्याला माहित आहे की, आपल्याकडे शहरात १७८ उद्याने आहेत. ११७ उद्याने ठेकेदारामार्फत चालवली गेली आहेत. ४८ उद्याने लहान आहेत, ती मनपाकडे आहेत. माळ्यांची संख्या कमी आहे. सहाय्यक उद्यान अधिक्षक कमी आहेत. हे सगळे आम्हाला मान्य आहे. परंतू आपल्याकडे जे माळी आहेत,त्यांना सुद्धा तुम्ही उद्यानांत तिकिट विक्रि करण्यासाठी बसवले आहे. मग जे स्किल्ड् लोक आहेत त्यांचा तुम्ही वापर करुन घेतला नाहीतर तुमचा उपयोग काय. म्हणजे आपली

जेवढी गादी आहे, तेवढ्याच गादीचा वापर करायचा आणि खाली जे काम चालले आहे त्याच्याकडे कोणाचेही लक्ष नाही. मा.महापौर साहेब, बिल्डींग परमिशन सारख्या ठिकाणी एका गुंठ्यामागे एक झाड लावायचे अशाप्रकारचा नियम आहे. आणि तीन गुंठ्यापुढे गेलो की तीन ऐवजी चार झाडे लावायची. हा नियम कशासाठी आहे. तीन वर्षानंतर ही झाडे जगली का नाही जगली याचे व्हेरीफिकेशन करुन लोक जी अनामत रक्कम भरतात. एका झाडा पाठिमागे दोन हजार रुपये रक्कम भरतात. मा.महापौर साहेब, आपल्याकडे अशा प्रकारची रक्कम जमा आहे. कुठेही बिल्डींग परमिशन दिल्यानंतर बिल्डींग बांधून पूर्ण झाल्यानंतर, आपला कोणताही उद्यान विभागाचा अधिकारी ही लावलेली झाडे जिवंत आहेत का नाहीत, झाडे लावली आहेत का नाहीत, हे बघायला जात नाही. मग यांची जबाबदारी काय आहे. रु.६,३५,००,०००/-, आपण बजेटमध्ये बघितले तर ही अनामत रक्कम जप्त केलेली आहे. ही रक्कम उद्यान विभागात भरली गेली होती. अशा प्रकारच्या रकमा फक्त जप्त करण्यातच धन्यता मानतो. तुम्हालाही माहित असेल की, बिल्डरला मानांकनानुसार नाहरकत दाखला लागतो. नाहरकत दाखला नसेलतर त्याला बिल्डींग परमिशन मिळत नाही. ही खालून वर जी साखळी आहे. यात उद्यान विभागाचे एक कुरण आहे. फक्त मानांकन बघून बिल्डींग परमिशन द्यायची. ती झाडे वाढलीत का नाहीत किंवा त्या डिपॉझिटचे काय केले याकडे कोणाचेच लक्ष नाही. मा.महापौर साहेब, सन २०१२-१३ मध्ये वृक्षारोपणावर एकून किती खर्च केला या प्रश्नाचे उत्तर त्यांनी टेन्टेटिव्ह दिले आहे की, सन २०१२-१३ ते २०१६-१७ या काळात साधारणपणे रु.१०७ कोटी खर्च केला आहे. यात त्यांनी सांगितले आहे की, खड्डे खोदणे, माती भरणे, रोपे खरेदी करणे, ट्री गार्ड खरेदी करणे आणि दुरुस्तीची कामे करणे. तुम्हाला माहित आहे की, यात खड्डे कसे खोदतात. खड्डे खोदायचे काम कुठल्या स्तरावर होते. उद्यान विभागाचा जो कारभार आहे तो फक्त एवढ्याच विषयाभोवती फिरतो. याठिकाणी ट्री गार्डच्या बाबतीत फक्त ठेकेदार पोसण्यासाठी ट्री गार्डची खरेदी करत असतो. माझ्या वॉर्डबाबत मी सांगते, उद्यान विभागाने वृक्षारोपण केल्यानंतर तिस-या/चौथ्या दिवशी हे ट्रीगार्ड गायब होतात. मग ते कोणी नेले, भंगारवाल्याने नेले का चोरांनी नेले हे माहित नाही. परंतू तेच ट्रीगार्ड पुन्हा फॅब्रिकेट करुन, रंग लावून पुन्हा विकले जातात. पुन्हा तेच नव्याने येऊन लावले जातात. म्हणजे अशा प्रकारची साखळी ट्री गार्ड बाबतीत वापरली जाते. मा.महापौर साहेब, तुम्ही इकडे तिकडे फिरयाला जाता. बाहेरच्या देशात जातो, बाहेरच्या राज्यात जातो. मुंबईत सुद्धा ट्री गार्ड म्हणून सिमेंटच्या जाळ्या वापरतात. या जाळ्या एकमेकांना तारेने बांधून सुद्धा त्याचा ट्री गार्ड सारखा वापर करु शकतो. परंतू आपल्याकडे पैशांची बचत करायची, आपण ज्या जागेवर काम करतोय, ज्या हुद्यावर काम करतोय, त्या संस्थेचा रुपयान रुपया आपण कशाप्रकारे वाचवू शकतो, तशी काळजी घेताना कोणीही दिसत नाही. आपल्याला माहित आहे की, आपल्या प्रभाग स्तरावरच्या मिटींग चालतात. प्रभाग स्तरावरच्या मिटींगला उद्यान विभागातले कोण हजर असतात. नगरसेवकांना

काही मागणी करायची असेलतर प्रत्येक नगरसेवक मा.महापालिका सभेत बोलू शकत नाही. त्याठिकाणी उद्यान विभागाचा कोणीही उपस्थित नसतो. मी तुम्हाला हे सांगू इच्छिते की, आपले जे मुख्य उद्यान अधिक्षक आहेत, त्यांना त्याचा अभिमान आहे की, त्यांचा जो पे स्केल आहे, त्यांचा ग्रेड पे आहे हा अतिरिक्त आयुक्त मा.तानाजी शिंदे यांच्याएवढा आहे. त्यांच्या एवढा पगार त्यांना मिळत असतो. महाराष्ट्र शासनाचे जे डेप्युटी सेक्रेटरी असतात, म्हणजे कुठल्यातरी मंत्र्यांचे जे पी.एस. असतात, त्यांना जो पे स्केल पगार आहे तो आपल्याकडे मुख्य उद्यान अधिक्षक यांना आहे. एक मंत्र्याचा पी.एस. हा राज्याचा कारभार त्या मंत्र्याबरोबर सांभाळत असतो मग तुम्हाला पिंपरी चिंचवड शहरातल्या एवढ्या शुल्लक गोष्टी सुद्धा सांभाळता येत नाहीत. दरवेळी आम्ही चर्चा करायचा प्रयत्न करतो, त्यावेळी माणुकसीच्या दृष्टीकोणातून म्हणतो की,ठिक आहे, आज नाहीतर उद्या होईल. अकार्यक्षमतेमुळे जे जे कोणी अधिकारी यांच्या हाताखाली आहेत. २ उद्यान अधिक्षक आहेत, त्यांच्या हाताखाली ६ सहाय्यक उद्यान अधिक्षक आहेत. तुम्ही सांगा, त्यांच्याकडे काय-काय कामे वाटली आहेत. त्यांनी काय-काय कामे केली पाहिजेत. वृक्षप्राधिकरण समिती आहे. यात मा.पठाण बाई असतील तर त्या सुद्धा सांगतील की, या वृक्षप्राधिकरण समितीत कुठले महत्वाचे विषय मंजूर होतात. फक्त झाडे तोडायची, फांद्या छाटायच्या. त्याची मंजूरी ज्याच्याकडे आहे तो वृक्ष अधिकारी. हा वृक्ष अधिकारी म्हणून त्याची मंजूरी देत असतो. मुख्य उद्यान अधिक्षकांनी खुलासा करावा की, झाडे तोडण्याचा वृक्ष अधिकारी म्हणजे कोण. माझ्या मते वृक्ष अधिकारी म्हणजे सुपर क्लास वन अधिका-याची सही त्या ऑर्डरवर पाहिजे. झाडे तोडण्याबाबतीत एवढे कठोर कायदे आहेत. परंतू मुख्य उद्यान अधिक्षक स्वतःच्या सहीने या सगळ्या कारवाया करत असतात. या महापालिकेत सुपर क्लासवन अधिकारी कोण आहेत. वृक्षतोडीचा काय कायदा आहे. आणि किती प्रकरणे या वृक्ष प्राधिकरण समितीत मंजूर केली जातात, याचा सुद्धा खुलासा याठिकाणी झाला पाहिजे. खरेतर सगळ्यांच्याच वॉर्डात खेळणी बसवली जातात. प्रत्येक नगरसेवक मागणी करतो की, आमच्या वॉर्डमधील उद्यानांत खेळणी बसवली जावीत. परंतू मा.महापौर साहेब, तोंड बघून ज्याची जेवढी कुवत आहे त्या त्याप्रमाणे त्या त्या उद्यानात कामे होत असतात. एक मागणी करायची म्हटले तरी एका नगरसेवकाला खेळण्यांचे टेंडरच नाही. अवघ्या चार पाच वर्षात ९० लाख, एक कोटी इतका खर्च केवळ खेळण्यांवर दाखवला आहे. मग नक्की त्या खेळण्यांसंदर्भात काय केले आहे. तोच प्रकार लॉनबाबत आहे. लॉन किती जगतात, किती ठिकाणी लॉन लावले आहेत. त्याचे रेट काय आहेत. काही ठिकाणी जवळजवळ ४/५ फूटापर्यंत झाडे लावतो. जर आपण केरळ आणि तामिळनाडू सारख्या ठिकाणांहून ही रोपे आणत असू तर ती रोप इथल्या मातीत मॅच होत नाहीत. मग ती मरतात. मूळ धरत नाहीत. झाडे जळली जातात. हा नैसर्गिक विषय आहे. दोन तीन हजार पर्यंत एक रोप आणत असूतर आपले लक्ष कोणत्या गोष्टीकडे आहे. उद्यान अधिक्षक व त्यांचे सहकारी हे सगळे अत्यंत शिक्षित आहेत. महापालेकेचे जे

असेटस् आहेत, महापालिकेच्या ज्या गोष्टी आहेत त्या वाचवण्यासाठी कोणी प्रयत्न केला पाहिजे. मला मुख्य उद्यान अधिक्षक यांच्याकडून खुलासा हवा आहे की, जे प्रश्न विचारले आहेत, त्यापैकी वृक्षगणना हा विषय आहे त्याची अंमलबजावणी कधी होणार. वृक्षगणना कधी सुरु होणार आहे. लोखंडी ट्री गार्ड बंद करुन आपण सिमेंटचे ट्री गार्ड करु शकतो का नाही याचा खुलासा आपण करावा. रेडझोनमधील उद्यानांसंदर्भात विचारले होते. मा.श्रीकर परदेशी हे आयुक्त असताना त्यावेळी काही अडचणी झाल्या होत्या. त्यावेळी त्यांनी सांगितले होते की, अशा भागांत रेडझोनमध्ये उद्याने करायला काही हरकत नाही. एवढे आदेश देऊन सुद्धा रेडझोन भागात काही ठिकाणी रिझर्वेशन्स आहेत, तेथे त्यांनी या भागात काहीही कारवाई केलेली नाही. म्हणजे स्वतःचे स्किल वापरुन तिथे काम करणे अपेक्षित असताना जी आहे ती कामे न करता समोरासमोर तोंड दाखवायचं, तोंडाला पाने पुसायची आणि रिकामे व्हायचे अशा प्रकारचे काम या विभागाकडून सुरु आहे. मा.मुख्य उद्यान अधिक्षक यांनी याचा खुलासा करावा अशी मी त्यांना विनंती करते. धन्यवाद.

**मा.सुरेश साळुंके (मुख्य उद्यान अधिक्षक)** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, ताईंनी आत्ता म्हटले होते की, वृक्ष अधिकारी म्हणजे कोण? वृक्ष अधिका-याची नेमणूक कोण करतो? वृक्ष अधिकारी म्हणून नेमणूक करताना कोणताही प्रभाग अधिकारी यापेक्षा कमी दर्जाचा असणार नाही. व इतर नगरपालिका क्षेत्रांत असा अधिकारी हा सहाय्यक नगरपालिका आयुक्ताच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा असणार नाही. प्रत्येक नगरपालिका क्षेत्रांत संबंधित नगरपालिकेचा मुख्य अधिकारी हा वृक्ष अधिकारी असेल आणि त्या नगरपरिषदेत एक किंवा अधिक इतर अधिका-याची वृक्ष अधिकारी म्हणून नेमणूक करेल. ज्यावेळी आपण वृक्ष प्राधिकरण समिती नेमतो, त्याचवेळी आपण विषयपत्रात टाकतो की, वृक्ष अधिका-याचे अधिकार द्यावेत. आणि तसे अधिकार वृक्ष अधिका-याला दिलेले आहेत. प्रत्येक अजेंडात टाकतो. आपल्याकडे ज्यावेळी मा.महापालिका समिती स्थापन होते त्यावेळी आपण हे टाकतो.

दूसरा प्रश्न असा होता की, आपण वृक्षगणना कधी करणार आहोत? – वृक्षगणना करण्यासाठी २०११ पासून प्रस्ताव ठेवत होतो. सुरुवातीला रेग्युलर पद्धतीने प्रस्ताव ठेवला होता. त्यावेळी पुण्यातले काही लोक हायकोर्टात गेले. त्यांनी हायकोर्टाकडून स्टे आणला. कोर्टाने सांगितले की, पुण्याने एक पायलेट प्रोजेक्ट करावा. त्यानंतर तो कोर्टाला परत दाखवावा. जीपीएस करता येईल का नाही. त्याप्रमाणे त्यांनी प्रोजेक्ट केला. त्यांनी तो कोर्टाला दाखवला. त्यानंतर त्यांनी निविदा काढली होती. आपण सुद्धा तशी निविदा फ्लोट केलेली आहे. आपली निविदा सुद्धा आज किंवा उद्या प्रसिद्धीला जाईल. महाराष्ट्रात कोणीच वृक्षगणना केलेली नाही. कोर्टाचा स्टे असल्यामुळे आपण केलेली नाही, कोणीच केलेली नाही.

**मा.मंगलाताई कदम**-मा.मुख्य उद्यान अधिक्षक आपण हे सांगावे की, ज्याच्याकडे टेंडर होते, त्यांनी ट्री गार्ड बसवलेत का, ट्री गार्ड का बसवले नाहीत. चार वर्षांपूर्वी ट्री गार्डचे टेंडर काढले होते. त्याने तेवढी क्वांटीटी पुरवली का.

**मा.सुरेश साळुंके (मुख्य उद्यान अधिक्षक)** – आपण जेवढ्या क्वांटीटीचे टेंडर काढतो, तेवढे ट्री गार्ड ठेकेदार पुरवतो.

**मा.मंगलाताई कदम**- त्याने बेंचेस आणि ट्री गार्ड दोन्ही पुरवलेत का.

**मा.सुरेश साळुंके (मुख्य उद्यान अधिक्षक)** – काही ठिकाणी बेंचेस आणि ट्री गार्ड चोरीला जातात. तेव्हा आम्ही लगेच पोलिसांत कम्पलेण्ट करतो. रिमोट एरियात थोडा जरा प्रॉब्लेम आहे. त्यावर आम्ही कंट्रोलिंग करायचा प्रयत्न करतोय. आपल्या या ट्री गार्डची कॉस्ट रु.९७२/- आलेली आहे. सिमेंट ट्री गार्डची किंमत रु.१५०० ते १६०० पर्यंत जाते. आणि ती बसवायला खाली फाऊंडेशन करावे लागते. चार वर्षांपूर्वी याचा प्रयोग केला होता. २/३ ट्री गार्ड बसवून बघितले होते. परंतू त्याचा एक पाय जरी नसलातरी प्रॉब्लेम होतो.

**मा.तानाजी खाडे-**मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, सुलभाताईंनी उद्यान संदर्भात बरेचसे प्रश्न विचारले आहेत. साळुंके साहेबांनी ब-यापैकी माहिती दिलेली आहे. आजच वृक्षप्राधिकरणाची मिटींग होती. त्यात विषय होता की, वृक्षगणना झाली पाहिजे. कारण आज शहरात किती झाडे आहेत. आज ढोबळमानाने सांगितले तरी आज आपण वर्षाला दोन दोन लाख झाडे लावतोय. त्यातील किती झाडे जगली आहेत, हे आपल्याला माहिती असणे गरजेचे आहे. मागे मिटींगला विषय घेतला होता. शहरात जी झाडे आहेत. परंतू ती कुठली आहेत. वृक्षगणना करताना त्या झाडांना पट्टया लावल्या पाहिजेत. माझी साळुंके साहेबांना विनंती आहे की, आपण टेंडर काढणार आहोत. तो विषय त्यात टाकणे गरजेचे आहे. नंबरींग करणे गरजेचे आहे. कुठले झाड आहे, त्याचे नाव त्यावर असावे. शहरात कुठली झाडे आहेत, याची माहिती लोकांना नसते. कधी कधी ज्येष्ठ नागरीक आम्हाला सांगतात की, तुम्ही वृक्षप्राधिकरण समितीत काम करता. अमुक अमुक रस्त्याला जी झाडे लावली आहेत, ती झाडे कोणत्या पद्धतीची लावली आहेत, त्या झाडांवर त्याची नावे टाकावीत. कुठले झाड आहे, मुलांना त्याची माहिती कशी होणार याची सुद्धा जबाबदारी घेणे गरजेचे आहे. नागरीकांची मागणी आहे. ते आपण करणे गरजेचे आहे. वृक्षगणना चालू असताना नाव, नंबरींग, कुठली झाडे किती आहेत याची सुद्धा माहिती असणे गरजेचे आहे. मधल्या काळात काही पर्यावरण प्रेमींची मिटींग घेतली होती, त्यानुसार विषय आला होता की, शहरात जिथे निर्जीव वनस्पती आहेत, तिथे वृक्षारोपण

झाले पाहिजे. गार्डन विकसित झाले पाहिजे. तसा प्रस्ताव सुद्धा ठेवला होता. त्यांनी सुद्धा त्याला मान्यता दिली होती. हा विषय प्रगतीपथावर आहे. शहरातील विद्यार्थ्यांना याची माहिती होईल. आपण जो कापूर देवापुढे पेटवतो त्याचे देखील झाड असते हे आपल्याला सुद्धा माहित नाही. रुद्राक्षाचे झाड आहे, रक्तचंदनाचे झाड आहे. याच्यासुद्धा अशाप्रकारच्या दोनशे प्रजाती आहेत. त्याचे शहरात वृक्षारोपण होणे गरजेचे आहे. या झाडांवर येणारे पक्षी सुद्धा त्या त्या पद्धतीचे त्याठिकाणी येऊन बसतात. या सगळ्या गोष्टींकडे पर्यावरणाच्या दृष्टिकोणातून बघणे गरजेचे आहे. मा.सुलभाताई ऊबाळे यांनी जी माहिती मागितली होती. त्यासंदर्भात मला आत्ता सांगणे गरजेचे वाटले. आपण शहरात जी दोन अडीच लाख झाडे लावलीत, पावसाळ्यानंतर जी झाडे लावलीत, त्यांना पाणी देण्यासाठी टँकर आहे पण ड्रायव्हर नाही. मध्ये मी आयुक्त साहेबांशी चर्चा केली होती. मा.आयुक्त साहेब, पाऊस येऊन दोन/तीन महिने झाले आहेत, त्यानंतर आजपर्यंत झाडांना पाणी देण्यासाठी टँकरला ड्रायव्हर नसल्यामुळे टँकर पडून आहेत. त्यामुळे झाडे वाळून चालली आहेत. ही सुद्धा खबरदारी प्रशासनाने घेतली पाहिजे. जो ड्रायव्हर होता त्याची एकतर्फी बदली करण्यात आली. दुसरा ड्रायव्हर दिला नाही. अशा छोट्या-छोट्या गोष्टींचा विचार न करता एकतर्फी बदल करतो. त्याचे दुष्परिणाम काय होतो हे दोन तीन महिन्यांत पाहणी करताना निदर्शनास आहे आहे. बांधकाम परवानगी देताना एक अट टाकलेली असते की, बिल्डरने झाडे लावायची आहेत. पण मी ब-यापैकी चौकशी केली आहे. माहिती घेतली. झाडे तोडायची असतीलतर आम्ही स्वतः जागेवर जाऊन व्हिजिट देतो. काही ठिकाणी विनाकारण झाडे तोडायला लावतात. तर काही ठिकाणी नारळाची झाडे आहेत. आम्ही नारळाची झाडे तोडायला परवानगी देत असतो. कारण ही झाडे खूप जुनी झाली आहेत. त्याचा पाला पडतो. नारळ पडतात. एखाद्याचे डोके फुटते. त्यामुळे आम्ही सध्या नारळाची झाडे तोडायला परवानगी देत असतो. बांधकाम परवाना विभागाच्या पठाण साहेबांशी मी एकदा बोललो होतो. त्यांना बोलवले होते. आम्ही त्यांना सांगितले की, मानांकनानुसार झाडे लावलीत का नाही हे बघत नाही. आपण बांधकाम परवाना देतोय. आपण याची देखील खबरदारी घेतली पाहिजे. कंपाऊंडपासून एक मीटरपर्यंत झाडे लावली पाहिजेत. ब-याचशा ठिकाणी भिंतींला लागून झाडे लावतात. भिंतीला चिरा पडलेल्या आहेत. भिंती तुटतात. म्हणून नागरीक झाडे तोडायला परवानगी मागत आहेत. मग सांगा आम्ही काय करायचे. पाण्याची टाकी असते किंवा ड्रेनेज लाईन असते, तिथे झाडे लावलेली असतात. त्या झाडांची मुळे ड्रेनेजमध्ये जातात. मग ते खराब होते. म्हणून नागरीक झाड तोडायची मागणी करतात. सोसायटीत जी पाण्याची टाकी बांधतो. त्या टाकीच्या बाजूला एक फूटावर झाड असते. ते तोडायला परवानगी मागतात. मग आम्हाला नाईलाजास्तव परवानगी द्यावी लागते. गाड्यांच्या पार्किंगसाठी ती झाडे काढली जातात. मोठी जागा होते. मग बिल्डर ती जागा विकतो हे नंतर लक्षात येते. अशा पद्धतीने कामे चाललेली आहेत. ही अतिशय खेदजनक गोष्ट आहे. बांधकाम परवानगी विभागाला माझी

विनंती आहे. मा.महापौर साहेब, आपण आदेश द्यावेत की, इथून पुढे बांधकाम परवानगी देताना कंपाऊंड वॉलच्या एक मीटर पुढे झाडे लावावीत. अशा प्रकारे झाडे लावली आहेत का नाही हे बघितल्याशिवाय पूर्णत्वाचा दाखला देऊ नये अशी विनंती करतो. धन्यवाद.

**मा.दत्ता साने** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, मा.सुलभाताई ऊबाळे यांनी प्रश्न विचारले आहेत. त्यासंदर्भात यापूर्वी मी सुद्धा उद्यानांसंदर्भात काही प्रश्न विचारले होते. मी प्रश्न विचारला होता की, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्षेत्रात सन २००७ पासून २०१२ या कार्यकाळात किती वृक्ष लावले आहेत आणि त्यातील किती वृक्ष जगले आहेत. आज जसे उत्तर दिले आहे, तसेच उत्तर त्या काळात देखील मला उद्यान विभागाकडून दिले गेले होते. मी सन्मा.सभागृहाच्या हे निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, चिखली गायरान भागात दरवर्षी वृक्षारोपणाचा कार्यक्रम केला जातो. त्या भागात खूप मोठी नर्सरी आहे. आत्ता जशी या प्रश्नांची उत्तरे देण्यात आली की, २०१२ ते २०१७ या दरम्यान ७५ टक्के झाडे ही आजही जिवंत आहेत. असे उत्तर देण्यात आले आहे. माझी मा.उद्यान अधिक्षक साळुंके साहेबांना विनंती आहे की, जी ७५ टक्के झाडे जगली आहेत, ती सभागृहातील काही नगरसेवकांना घेऊन किंवा महापालिकेच्या १०/१२ नगरसेवकांची कमिटी करुन खरोखर ही झाडे जगलेली आहेत का हे पहावे. किंवा हि झाडे जगवण्यापाठिमागे कोणाला जगवायचा प्रयत्न केला जातो आहे का काय, हा माझा साळुंके साहेबांना प्रश्न आहे. आपल्या माध्यमातून झाडे जगवायचे काम न करता, वृक्षप्राधिकरण समितीचे काम न करता आपण काही ठेकेदार किंवा आपल्याला जो काही आर्थिक मलिदा यातून मिळणार आहे, ते जगवायचे काम आदरणीय साळुंके साहेब करतात असा माझा जाहिर आरोप आहे. मी पुराव्यासहित देण्याचा प्रयत्न करणार आहे. थरमॅक्स चौक ते टेल्को चौक या रस्त्यात अतिशय चांगल्या पद्धतीची झाडे एका नामांकित ठेकेदाराच्या म्हणजे ज्याला महापालिकेच्या उद्यान विभागाने जावई म्हणून आजपर्यंत सांभाळलेले आहे, त्याच्याच माध्यमातून कुठलेही काम करायचे असेलतर त्याच्या पायाला हात लावल्याशिवाय उद्यान विभाग चालत नाही. अशा माणसाकडून उद्यान विभागाची खरेदी केली जाते. शंभर रुपयाचे झाड असेलतर त्याच्याकडून किती रुपयांना घेतले जाते. त्याची मूळ किंमत काय, मूळ खरेदी काय. आपल्याकडे टेंडर प्रोसेसला घेतले जाते, त्यावेळी फक्त या एकाच ठिकाणाहून ही खरेदी केली जाते. पूर्वी आमच्या प्रभागात आजूबाजूच्या परिसरात आणि टेल्को चौक ते थरमॅक्स चौक या भागात सिन्नर नावाची झाडे लावलेली होती. या एका झाडाची किंमत कमीत कमी दहा ते पंधरा हजार रुपये लावली होती. ही झाडे ग्रामिण भागात, शेतात सुद्धा मिळतात. त्याची किंमत कमीत कमी पंधरा ते वीस हजार रुपये लावली आहे. जसे मा.तानाजी खाडे यांनी सांगितले की, प्रत्येक झाडाला त्याचे नावाची पाटी लावली जावी. परंतू नावाबरोबर त्या झाडाची किंमत सुद्धा त्या पाटीवर लावली जाणे गरजेचे आहे. दहा रुपयाच्या झाडाची किंमत

शंभर रुपये लावली आहे. सर्वसामान्यांना सुद्धा त्याची किंमत कळेल. त्या काळात लावलेले एक सुद्धा झाड जगलेले नाही. आत्ता सुद्धा हिच झाडे लावलेली आहेत. त्याचे फोटो सुद्धा माझ्याकडे आहेत. चार झाडे जगली आहेत तर पन्नास झाडे मेली आहेत. आपल्या भागात किंवा प्रभागात जी झाडे जगणार नाहीत, ज्यांचा उपयोग होणार नाही, ज्यांचा प्रदूषणावर किंवा वातावरणावर कसलाही परिणाम होणार नाही, अशी नको ती झाडे लावायचे काम उद्यान विभागाकडून केले गेले आहे. ठिक आहे शंभर झाडांपैकी दहा झाडे मेली आम्ही हे मान्य करु. पण ती नव्वद झाडे तरी जगली पाहीजेत. जी झाडे लावली, ती अजिबात जगवलेली नाहीत. झाड लावताना ते ज्या कुंडीत असते, त्याच्या खाली प्लास्टीक बॅग असते. चिखली गावात पाण्याच्या टाकीसाठी मी अधिकृत पत्र देऊन जी काही वीस/एकवीस झाडे लावलेली होती, ती काढायचा प्रयत्न केला. त्यावेळी ती झाडे कागदासहित लावलेली होती. मी मा.अति. आयुक्तांना ते कागदाचे गठ्ठे दाखवले आहेत. वृक्ष लावल्याचे दाखवायचे आणि महापालेकची लूट करायचे काम साळुंके साहेब व त्यांच्या पाठिमागील सगळी टिम यांचे मिळून चालू आहे. मी हे पुराव्यासहित दाखवले आहे. आजपर्यंत त्या माणसावर कुणीही कसलीही कारवाई करायचे काम कोणी केलेले नाही. कोण काय करतो, कोण किती खातो. यापेक्षा महानगरपालिकेत येणारा अधिकारी इमानदारीने काम करतो का नाही हे सुद्धा बघायचे आपले काम नाही. जिथे वृक्षारोपण चालू आहे, तिथे ती झाडे जगणार आहेत का नाही हे पहायला पाहिजे. झाडं लावलं म्हणजे संपले का. झाड लावल्यानंतर त्याला पाणी घालणे ही माझी जबाबदारी आहे. कुठल्याही महापालिकेचा जो कोणी ठेकेदार असेल तर, ज्याला कोणाला काम दिले असेलतर तो ते काम कधीही पूर्ण करत नाही. मग आम्ही सांगायचे का, पाच लाख झाडे लावली, दहा लाख झाडे लावली. कशाला पेपरला फोटो द्यायला सांगायचे का. फक्त पेपरबाजी करायला का, यांना पोसण्यासाठी का, आम्ही एवढे काम केले आहे ते सांगायला. या विभागाचा शून्य कारभार चालला आहे. मी अनेक वेळा आरोप केला आहे. पण यांच्यासारखा निगरगट्ट दूसरा नाही. आत्ता सुलभाताईंनी सांगितले, यांची अँजोग्राफी झाली आहे. काही कोणाची अँजोग्राफी झालेली नाही. ज्यांची झाली असेल त्यांनी घरी थांबावे. वयाप्रमाणे काम झेपत नसेलतर त्यांनी घरी थांबावे. कशाला कोणाची जागा अडवायची. ते सगळ्यांचा बायपास करतात, त्यांचा बायपास करायची गरज आहे. त्यांना कुठलेही काम सांगायचे म्हटले, त्यांना कामाच्या कुठल्याही पद्धतीने काम करायला सांगितले तर गोड बोलणार. त्यांच्या फक्त तोंडात साखर आहे. पण ज्याला गंध लावायचा त्याला बरोबर गंध लावणार. मा.महापौर साहेब, त्या पदावर बसायला लायक तो अधिकारी नाही, तुम्हाला फक्त एवढेच सांगतो. फक्त एकच काम ठेकेदार एके ठेकेदार. त्याच्याकडून मलिदा मिळवणे. त्याच्याकडून काय मिळेल ते मिळेल. या माणसाचे इथल्या कामापेक्षा गावाकडे, त्याच्या हॉटेल व्यवसायावर जास्त लक्ष आहे. तिथे यांचे फोर स्टार हॉटेल आहे. मा.महापौर साहेब, यांची खातेनिहाय चौकशी करा. यांची प्रॉपर्टी चेक करा. यांनी गावाला चार/पाच मजली हॉटेल बांधले

आहे. ते कुठल्या जीवावर, महानगरपालिकेच्या माध्यमातून यांनी हॉटेल बांधले आहे ना. साईकृपा उद्यानात नवीन पाईपलाईन टाकून दोन वर्षे झालीत. पण त्या पाईपलाईनला पाणीच आले नाही. उद्यानांत पाणी जात नसेलतर काही ठेकेदारांच्या माध्यमातून ठेकेदारी पद्धतीने गार्डन देण्याचे काम चालू होते. काम करत असताना एका ठेकेदाराला काम देण्यासाठी काही अटीशर्तीत बदल करायचे काम जेव्हा टेंडर प्रोसेसला निविदा टाकतो, त्या निविदेत ज्या अटीशर्ती टाकल्या होत्या, त्या अटीशर्तीत फक्त काही लोकांना काम देण्यासाठी. जेव्हा टेंडर झाले. त्यानंतर सुद्धा अटी शर्ती बदलायचे काम. एक एकरच्या गार्डनचे काम करणा-याला आठ एकरच्या गार्डनचे काम द्यायचे, असा प्रकार या विभागात चालू आहे. माझी विनंती आहे की, इथे काही ठेकेदार सांभाळायचे काम होते आहे. तावरे या नावाचा ठेकेदार सांभाळण्यासाठी या विभागाचा सगळा आटापिटा चालू हे. ज्या खरेदी-विक्री केल्या जातात त्या या एका व्यक्तीला सांभाळण्यासाठी या विभागाचा खूप मोठा उद्योग चालू असतो. एखादा ठेकेदार गरीब असेल किंवा एखादा चार कामे करायचा प्रयत्न करत असेल तर याला डावलून त्याला काम कसे मिळेल, त्यात आपल्याला मलिदा कसा मिळेल हेच काम उद्यान विभागात चालू आहे. मा.महापौर साहेब, माझी आपल्याला विनंती राहील की, थरमॅक्स चौक ते टेल्को चौक इथे पूर्वी रस्त्याच्या कडेने जी झाडे लावली होती, जी झाडे मेली आहेत किंवी जी काढून पुन्ही नवीन झाडे लावायचा प्रयत्न केला गेला आहे. ती झाडे मरायला व त्यावर होणा-या खर्चाला कोण जबाबदार. मा.महापौर साहेब, माझा प्रश्न आहे की,ज्यांनी ही झाडे खरेदी केली आहेत, ज्या माध्यमातून खरेदी केली आहेत, त्यांच्यावर आरोप सिद्ध करावा. यांनी झाडे न जगवता ती मारायचे काम केले आहे. फक्त पैसे कमवायचे काम केले आहे. यासाठी या विभागाला जबाबदार धरुन त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी अशी विनंती करतो व थांबतो.

------------

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १वर पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ९४० विषय क्रमांक-१

दिनांक-२८.११.२०१६ विभाग-मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.क्रीडा/७/कावि/२०३/२०१६ दि.७/९/२०१६

२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.१७३६२ दि.२०.९.२०१६

मा.क्रीडा,कला,साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्र.८० दि.१२/९/२०१६ अन्वये इंडियन ऑलिंम्पिक असोशिएनशची मान्यता, संलग्नता प्राप्त असलेल्या राष्ट्रीय अपंग फेडरेशनव्दारे आयोजित अधिकृत स्पर्धा, तसेच महाराष्ट्र ऑलिंम्पिक असोशिएशनची मान्यता,

संलग्नता प्राप्त असलेल्या महाराष्ट्र राज्य अपंग असोशिएशनव्दारे आयोजित राज्यस्तर, राष्ट्रीयस्तर स्पर्धेत तसेच पॅराऑलिंम्पिक स्विमिंग असोशिएशनव्दारे आयोजित राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी खेळाडूंना खेळाडू दत्तक योजनेत समावेश करणेस तसेच खेळाडू दत्तक योजना या मध्ये अट क्र.१९ मध्ये एका खेळाडूस एका आर्थिक वर्षात क्रीडा शिष्यवृत्ती व क्रीडा प्रबोधिनीचा लाभ घेता येईल. क्रीडा प्रबोधिनीचे खेळाडूस दत्तक योजनेचा लाभ घेता येणार नाही अथवा खेळाडू दत्तक योजनेच्या खेळाडूस क्रीडा प्रबोधिनीचा लाभ घेता येणार नाही परंतु क्रीडा शिष्यवृत्तीचा लाभ घेता येईल अशा दुरुस्तीसह मान्यता देणेत येत आहे

**मा.नंदा ताकवणे** - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २वर पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक-२

दिनांक-२८.११.२०१६ विभाग-मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.तानाजी खाडे, मा.जावेद शेख यांचा प्रस्ताव-

२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.१७३६४ दि.२०.९.२०१६

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्र.८२ दि.१२/९/२०१६ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्रीडा विभागामार्फत दरवर्षी खेळाडू दत्तक योजना राबविली जाते. या योजने अंतर्गत दरवर्षी लॉन टेनिस खेळाडूंना लाभ दिला जात होता. परंतु या वर्षीपासून मनपाच्या खेळाडू दत्तक योजनेमधून लॉन टेनिस खेळाडूंना वगळण्यात आले आहे. तरी दरवर्षी प्रमाणे खेळाडू दत्तक योजनेत लॉन टेनिस खेळाडूंचाही समावेश करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.नंदा ताकवणे** - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.भाऊसाहेब भोईर-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, हा विषय महापालिकेच्या उमेद मान्यतेवर ऑलरेडी मंजूर झाला आहे. दि.८ ऑगस्ट १९९६ पासून अखिल

भारतीय नाट्यपरिषदेचे ऑफीस रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह इथे आहे. त्याचे नुतनीकरण करुन वाढीव जागा, सगळे झाले आहे, दिले आहे. मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो की, पिं.चिं.मनपा सभा ठराव क्र.३१५२ दि.२४/१/१६ अन्वये रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहामध्ये बुकिंग ऑफिस असलेल्या १४ X९ मापाचे चटई क्षेत्र व मा.स्थायी समिती सभा ठराव क्र. १५३९६ दिनांक २६/२/१६ अन्वये अतिरिक्त १२६ स्क्वे.फुट व समोरील २८० स्क्वे.फुट जागावरील ठरावान्वये प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहातील ऑफीसची सद्यस्थितीतील जागा स्थायी समितीने मंजूर केलेले असून त्या ठरावान्वये दुरुस्ती करुन पिं.चिं.मनपा व अखिल भारतीय मराठी नाटय परिषद, पिंपरी चिंचवड शाखा यांना संयुक्त विद्यमाने (JV) नाटयपरिषद व कार्यशाळा चालविणेसाठी मनपाच्या मुख्य सभेच्या उमेद मान्यतेवर ३० वर्षासाठी विनामुल्य उपलब्ध करुन देणेस जी मान्यता देणेत आली होती त्या ठरावास मान्यता देणेत यावी.

**मा.सदगुरु कदम** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.तानाजी खाडे**-मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- १) खेळाडू दत्तक योजनेत क्रिकेट, हॉकी, कबड्डी, बॅडमिंटन, रायफल शुटींग, जलतरण कुस्ती, कराटे, बॉक्सिंग, मैदानी खेळ, खो खो, रोलर स्केटिंग ११ खेळासाठी राबविण्यात येते यामध्ये आणखी लॉनटेनिस व सायकलिंग या २ खेळांचा समावेश करण्यास मान्यता देणेत यावी. तसेच १) मा.महापालिका सभा ठराव क्र. ४२१ दि.१८/१/२०१४ व मा.महापालिका सभा ठराव क्र. ४८० दि.२०/५/२०१४ अन्वये मनपा क्रीडा धोरण व क्रीडा सुविधा दरास मान्यता दिलेली आहे यामध्ये भाग १-ड क्रीडा शिष्यवृत्ती व आर्थिक सहाय्य यामध्ये अ.क्र.२-राष्ट्रीय व अंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व वयोगटातील खेळाडूंना आर्थिक सहाय्य अथवा क्रीडा शिष्यवृत्ती अदा करणेबाबतचे धोरण यामध्ये, "ज्या खेळाच्या महाराष्ट्र राज्य संबंधित क्रीडा संघटना या महाराष्ट्र ऑलिम्पिकशी संलग्न आहे तसेच ज्या खेळाच्या राष्ट्रीय संबंधित क्रिडा संघटना या इंडियन ऑलिम्पिक असोसिएशनशी संलग्न आहेत अशा खेळाच्या खेळाडूंनाच अटी शर्तीनुसार वरील योजनेचा लाभ देणेस मान्यता देणेत यावी. तसेच महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन व इंडियन ऑलिम्पिंक असोसिएशन या संघटनेशी संलग्न, खेळ व खेळ संघटनेच्या खेळाडूंना अटी शर्तीनुसार वरील योजनेचा लाभ देणेत यावा" या अटीचा समावेश करण्यास मान्यता देणेत यावी तसेच १) मा.महापालिका सभा ठराव क्र.४२१ दि.१८/१/२०१४ व मा.महापालिका सभा ठराव क्र. ४८० दि.२०/५/२०१४ अन्वये मनपा क्रीडा धोरण व क्रीडा सुविधा दरास मान्यता दिलेली आहे यामध्ये भाग १-ड क्रीडा शिष्यवृत्ती व आर्थिक सहाय्य यामध्ये अ.क्र. ३-आंतरराष्ट्रीय स्तरावरील सर्व वयोगटातील खेळाडूंना स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आर्थिक सहाय्य करणे, यामध्ये, "ज्या खेळाच्या, महाराष्ट्र राज्य संबंधित क्रीडा संघटना या महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनशी संलग्न आहेत ज्या खेळाच्या राष्ट्रीय संबंधित क्रिडा संघटना या इंडीयन

ऑलिम्पिक असोसिएशनशी संलग्न आहेत अशा खेळाच्या खेळाडूनाच अटी शर्तीनुसार वरील योजनेचा लाभ देणेत यावा तसेच महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन व इंडियन ऑलिम्पिक असोसिएशन या संघटनेशी संलग्न, खेळ व खेळ संघटनेच्या खेळाडूंना अटी शर्तीनुसार वरील योजनेचा लाभ देणेत यावा. या अटीचा समावेश करण्यास मान्यता देणेत यावी. २) क्रीडा धोरणात आवश्यक ते बदल करण्याचा अधिकार मा.आयुक्त यांना राहील यास मान्यता देणेत यावी. तसेच १) मा.महापालिका सभा ठराव क्र. ४२१ दि.१८/१/२०१४ व मा.महापालिका सभा ठराव क्र. ४८० दि.२०/५/२०१४ अन्वये म.न.पा. क्रीडा धोरण व क्रीडा सुविधा दरास मान्यता दिलेली आहे. यामध्ये भाग १-ग-अनुदान, यामध्ये मा.महापालिका सभा ठराव क्र.३०६ दि.१८/०३/२००८ अन्वये पिंपरी चिंचवड महापालिका परिसरातील (हद्दीतील) ख-या अर्थाने मानव हिताच्या दृष्टिकोनातून काम करणा-या सर्व संस्था/सार्व.ट्रस्ट इत्यादी मतीमंद, अपंग, अंध कुष्ठरोगी, मुकबधीर, वृध्दाश्रम, अनाथालय अशा संस्थाना मा.आयुक्त यांनी समक्ष पाहणी करुन चांगले काम करणा-या संस्था प्रसंगी अटी शर्ती शिथिल करुन चांगले काम करणा-या संस्थाना त्यांची मागणी लक्षात घेता प्रत्यक्ष पाहणी करुन तेथील संख्या व इतर बाबी लक्षात घेता ऑडीटच्या अटी व शर्ती शिथील करुन अनुदान मंजूर करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना दिले आहेत. या ठरावाप्रमाणे दरवर्षी ठरावात नमुद कार्य करणा-या संस्थाना कमाल र.रु. २,९९,००० पर्यंत अनुदान दिले जाईल. वैयक्तिक व्यक्तीस अनुदान अदा करता येणार नाही अशी मान्यता दिलेली आहे.

म.न.पा.परिसरातील सार्व.संस्था/मंडळे यांना दयावयाचे अनुदान याबाबत खालीलप्रमाणे नियम ठरविण्यात आले आहेत या नंतरचा

“१)खालील ध्येय धोरणाचे वर्णन व त्यांना सहाय्य करणा-या सर्व किंवा काही संस्था/मंडळ यांना म.न.पा.ठरविल त्याप्रमाणे ऐच्छिक अनुदान देता येईल.

**अ**) प्राथमिक शिक्षण तसेच अंध मुकबधिर व अपंग मुलांची देखभाल व प्रशिक्षण

ब) माध्यमिक शिक्षण तसेच संग्रहालये, तांत्रिक शाळा, वाचनालये, ग्रंथालये, उद्योग शाळा, यांच्या इमारतीचे बांधकाम व साहित्य खरेदी

क) क्रीडा व व्यायामशाळा

ड) सामाजिक सेवा, बालकल्याण केंद्र, आरोग्य केंद्र तसेच पाळणा घरे, पूर्व प्राथमिक शाळा, बालवाडया, बालनाटय केंद्र, बालसाहित्य, ग्रंथालय या सारखे महिलांनी चालविलेले सामाजिक व शैक्षणिक उपक्रम

इ) गरीब व अनाथ व्यक्ती, बहिष्कृत स्त्रिया व गुन्हेगार यांचे पुर्नवसन

फ) रुग्णालये, दवाखाने, कुष्ठरोग, शुषुश्रा केंद्र मनोरुग्णालये, प्रसुतिगृह यासारखे संस्था वैदयकिय मदत किंवा अशा प्रकारचे कोणतीही सर्व सामान्य मदत ज्याची गणना सामाजिक सुरक्षितता, आरोग्यसुविधा किंवा मार्गदर्शन यांच्या वाढीसाठी होईल." हा मजकुर वगळण्यास मान्यता देणेत यावी. तसेच १) मा.महापालिका सभा ठराव क्र. ४२१ दि.१८/१/२०१४ व मा.महापालिका सभा ठराव क्र. ४८० दि.२०/५/२०१४ अन्वये मनपा क्रीडा धोरण व क्रीडा सुविधा दरास मान्यता दिलेली आहे यामध्ये भाग ४- विविध सुविधा दरपत्रकास मान्यता दिलेली आहे.

म.न.पा.परिसरातील मतिमंद, अपंग, मुकबधिर व अंध विदयार्थी, खेळाडू, नागरिक यांना म.न.पा.च्या विविध क्रीडा सुविधा (उदा.बॅडमिंटन हॉल, लॉनटेनिस कोर्ट, जलतरण तलाव, मैदाने ई.) विनामुल्य उपलब्ध करुन देणेत येईल परंतु अशा मतिमंद, अपंग, मुकबधिर व अंध विदयार्थी, खेळाडू, नागरिक यांकडे ४० टक्के अपंगत्वाचे सक्षम वैदयकीय अधिकारी यांनी दिलेले प्रमाण पत्र असणे आवश्यक आहे. याकामी विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे. विद्यालयामार्फत एकत्रित विद्यार्थी सरावासाठी येणेपुर्वी रीतसर अर्ज देऊन परवानगी घेऊन ४ विद्यार्थ्यामागे १ शिक्षक सह विद्यार्थ्यांना सरावासाठी आणणे आवश्यक आहे. त्यांची सर्व प्रकारची जबाबदारी संबंधित विदयालयाची राहील तसेच व्यक्तिगत मतिमंद, अपंग, मुकबधिर व अंध विद्यार्थी, खेळाडू, नागरिक, सरावासाठी येताना त्याचे समवेत १ पालक सोबत असणे आवश्यक राहील. व्यक्तिगत मतिमंद, अपंग, मुकबधिर व अंध विद्यार्थी, खेळाडू, नागरिक, सरावासाठी येताना सर्व प्रकारची जबाबदारी ही संबंधित खेळाडू, नागरीक व पालक यांची राहील असा मजकूर समाविष्ट करण्यास मान्यता देणेत यावी. तसेच १) मा.महापालिका सभा ठराव क्र. ४२१ दि.१८/१/२०१४ व मा.महापालिका सभा ठराव क्र. ४८० दि.२०/५/२०१४ अन्वये मनपा क्रीडा धोरण व क्रीडा सुविधा दरास मान्यता दिलेली आहे यामध्ये भाग २- विविध क्रीडा सुविधा, १०- जलतरण तलाव, अट क्र. १२ मतिमंद, अपंग, मुकबधिर व अंध यांना विशेष सवलतीच्या दराने सकाळी ११.३० ते १२.३० या वेळात सरावासाठी जलतरण तलाव उपलब्ध करुन देणेत येईल या अटी मध्ये, "मतिमंद, अपंग, मुकबधिर व अंध विद्यार्थी, खेळाडू, नागरिक यांना विनामुल्य सरावासाठी जलतरण तलाव उपलब्ध करुन देणेत येईल. परंतु अशा मतिमंद, अपंग, मुकबधिर व अंध विद्यार्थी, खेळाडू, नागरिक यांकडे ४० टक्के अपंगत्वाचे सक्षम वैद्यकीय अधिकारी यांनी दिलेले प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे याकामी विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे. विद्यालयामार्फत एकत्रित विद्यार्थी पोहोण्याच्या सरावासाठी येणेपुर्वी रीतसर अर्ज देऊन परवानगी घेऊन ४ विद्यार्थ्यांमागे १ शिक्षक सह विद्यार्थ्यांना सरावासाठी आणणे आवश्यक आहे. त्यांची सर्व प्रकारची जबाबदारी संबंधित विद्यालयाची राहील तसेच व्यक्तिगत मतिमंद, अपंग, मुकबधिर व अंध विद्यार्थी, खेळाडू, नागरिक, पोहोण्यासाठी येताना त्याचे समवेत १ पालक सोबत असणे आवश्यक राहील. व्यक्तिगत मतिमंद, अपंग,

मुकबधिर व अंध विद्यार्थी, खेळाडू, नागरिक, पोहोण्यासाठी येताना सर्व प्रकारची जबाबदारी ही संबंधित पोहणारी व्यक्ती व पालक यांची राहील अशी दुरुस्ती करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.दत्ता साने** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.मंगलाताई कदम-**मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, आत्ताचा क्रिडाचा जो विषय आहे, यात मागील वर्षाला पिंपरी चिंचवड शहरात अपंग विद्यार्थ्यांना तीन गोल्ड मेडल मिळाले होते. या विद्यार्थ्यांना प्रॅक्टीससाठी सरावासाठी शुल्क आकारु नये. त्यांच्याकडून शुल्क घेऊ नये. त्यांना जागा उपलब्ध करुन दिली पाहिजे. अमेरीकेत जाऊन आपली मुले गोल्ड मेडल घेऊन आली आहेत तर त्यांना सरावासाठी स्विमिंग टँक असेल, ग्राऊंड असेल ते त्यांना उपलब्ध व्हावे. अंध, अपंग अशी जी विशेष मुले आहेत, त्यांना शुल्क आकारु नये. त्यांचे टायमिंग ठरवून द्यावे. त्यांच्याबरोबर त्यांचे पालक असले पाहिजेत. ऍथलेटीक्सच्या ट्रॅकला सुद्धा शुल्क घेतात. या विशेष मुलांना त्यांच्या तब्येतीनुसार वेळ देण्यात यावी. त्यांना ठराविक ग्राऊंड ठरवून द्यावेत. या या ग्राऊंडवर तुम्ही ठराविक ठिकाणी प्रॅक्टिस करु शकता. गोल्ड मेडलिस्ट खेळाडूंना चांगल्या ग्राऊंडवर विनाशुल्क प्रॅक्टीस करायची परवानगी दिली गेली पाहिजे, अशी विनंती करते.

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारल्या आहेत.

**मा.महापौर** – शहरात बरेच खेळाडू गरीब कुटूंबातील आहेत. त्यांना आर्थिस सहाय्य मिळत नाही. अशा खेळाडूंना सुद्धा अर्थसहाय्य मिळावे. हा विषय उपसूचनेसहित मंजूर करण्यात येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता –

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक - ९४१ | विषय क्रमांक-२ |
| दिनांक-२८.११.२०१६ | विभाग-मा.आयुक्त |

संदर्भ :- १) मा.तानाजी खाडे, मा.जावेद शेख यांचा प्रस्ताव-

२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.१७३६४ दि.२०.९.२०१६

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्र.८२ दि.१२/९/२०१६ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्रीडा विभागामार्फत दरवर्षी खेळाडू दत्तक योजना राबविली

जाते. या योजनेअंतर्गत दरवर्षी लॉन टेनिस खेळाडूंना लाभ दिला जात होता. परंतु यावर्षीपासून मनपाच्या खेळाडू दत्तक योजनेमधून लॉन टेनिस खेळाडूंना वगळण्यात आले आहे. तरी दरवर्षी प्रमाणे खेळाडू दत्तक योजनेत लॉन टेनिस खेळाडूंचाही समावेश करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिं.चिं.मनपा सभा ठराव क्र.३१५२ दि.२४/१/१६ अन्वये रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहामध्ये बुकिंग ऑफिस असलेल्या १४ X९ मापाचे चटई क्षेत्र व मा.स्थायी समिती सभा ठराव क्र. १५३९६ दिनांक २६/२/१६ अन्वये अतिरिक्त १२६ स्क्वे.फुट व समोरील २८० स्क्वे.फुट जागावरील ठरावान्वये प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहातील ऑफीसची सद्यस्थितीतील जागा स्थायी समितीने मंजूर केलेले असून त्या ठरावान्वये दुरुस्ती करुन पिंचिं.मनपा व अखिल भारतीय मराठी नाटय परिषद, पिंपरी चिंचवड शाखा यांना संयुक्त विद्यमाने (JV) नाटयपरिषद व कार्यशाळा चालविणेसाठी मनपाच्या मुख्य सभेच्या उमेद मान्यतेवर ३० वर्षासाठी विनामुल्य उपलब्ध करुन देणेस जी मान्यता देणेत आली होती त्या ठरावास मान्यता देणेत येत आहे. तसेच १) खेळाडू दत्तक योजनेत क्रिकेट, हॉकी, कबड्डी, बॅडमिंटन, रायफल शुटींग, जलतरण कुस्ती, कराटे, बॉक्सिंग, मैदानी खेळ, खो खो, रोलर स्केटिंग ११ खेळासाठी राबविण्यात येते यामध्ये आणखी लॉनटेनिस व सायकलिंग या २ खेळांचा समावेश करण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच १) मा.महापालिका सभा ठराव क्र. ४२१ दि.१८/१/२०१४ व मा.महापालिका सभा ठराव क्र. ४८० दि.२०/५/२०१४ अन्वये मनपा क्रीडा धोरण व क्रीडा सुविधा दरास मान्यता दिलेली आहे यामध्ये भाग १-ड क्रीडा शिष्यवृत्ती व आर्थिक सहाय्य यामध्ये अ.क्र.२- राष्ट्रीय व अंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व वयोगटातील खेळाडूंना आर्थिक सहाय्य अथवा क्रीडा शिष्यवृत्ती अदा करणे बाबतचे धोरण यामध्ये, "ज्या खेळाच्या महाराष्ट्र राज्य संबंधित क्रीडा संघटना या महाराष्ट्र ऑलिम्पिकशी संलग्न आहे तसेच ज्या खेळाच्या राष्ट्रीय संबंधित क्रिडा संघटना या इंडियन ऑलिम्पिक असोसिएशनशी संलग्न आहेत अशा खेळाच्या खेळाडूंनाच अटी शर्तीनुसार वरील योजनेचा लाभ देणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन व इंडियन ऑलिम्पिंक असोसिएशन या संघटनेशी संलग्न, खेळ व खेळ संघटनेच्या खेळाडूंना अटी शर्तीनुसार वरील योजनेचा लाभ देणेत यावा" या अटीचा समावेश करण्यास मान्यता देणेत येत आहे तसेच १) मा.महापालिका सभा ठराव क्र. ४२१ दि.१८/१/२०१४ व मा.महापालिका सभा ठराव क्र. ४८० दि.२०/५/२०१४ अन्वये मनपा क्रीडा धोरण व क्रीडा सुविधा दरास मान्यता दिलेली आहे यामध्ये भाग १-ड क्रीडा शिष्यवृत्ती व आर्थिक सहाय्य यामध्ये अ.क्र. ३- आंतरराष्ट्रीय स्तरावरील सर्व वयोगटातील खेळाडूंना स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आर्थिक सहाय्य करणे, यामध्ये, "ज्या खेळाच्या, महाराष्ट्र राज्य संबंधित क्रीडा संघटना या महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनशी संलग्न आहेत ज्या खेळाच्या राष्ट्रीय संबंधित क्रिडा संघटना या इंडीयन ऑलिम्पिक असोसिएशनशी संलग्न आहेत अशा खेळाच्या खेळाडूनाच अटी शर्तीनुसार वरील योजनेचा लाभ देणेत यावा तसेच महाराष्ट्र

ऑलिम्पिक असोसिएशन व इंडियन ऑलिम्पिक असोसिएशन या संघटनेशी संलग्न, खेळ व खेळ संघटनेच्या खेळाडूंना अटी शर्तीनुसार वरील योजनेचा लाभ देणेत यावा. या अटीचा समावेश करण्यास मान्यता देणेत येत आहे. २) क्रीडा धोरणात आवश्यक ते बदल करण्याचा अधिकार मा.आयुक्त यांना राहील यास मान्यता देणेत येत आहे. तसेच १) मा.महापालिका सभा ठराव क्र. ४२१ दि.१८/१/२०१४ व मा.महापालिका सभा ठराव क्र. ४८० दि.२०/५/२०१४ अन्वये म.न.पा. क्रीडा धोरण व क्रीडा सुविधा दरास मान्यता दिलेली आहे यामध्ये भाग १-ग-अनुदान, यामध्ये मा. महापालिका सभा ठराव क्र.३०६ दि.१८/०३/२००८ अन्वये पिंपरी चिंचवड महापालिका परिसरातील (हद्दीतील) ख-या अर्थाने मानव हिताच्या दृष्टिकोनातून काम करणा-या सर्व संस्था/सार्व.ट्रस्ट इत्यादी मतीमंद, अपंग, अंध कुष्ठरोगी, मुकबधीर, वृध्दाश्रम, अनाथालय अशा संस्थाना मा.आयुक्त यांनी समक्ष पाहणी करुन चांगले काम करणा-या संस्था प्रसंगी अटी शर्ती शिथिल करुन चांगले काम करणा-या संस्थाना त्यांची मागणी लक्षात घेता प्रत्यक्ष पाहणी करुन तेथील संख्या व इतर बाबी लक्षात घेता ऑडीटच्या अटी व शर्ती शिथील करुन अनुदान मंजूर करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना दिले आहेत. या ठरावाप्रमाणे दरवर्षी ठरावात नमुद कार्य करणा-या संस्थाना कमाल र.रु. २,९९,००० पर्यंत अनुदान दिले जाईल. वैयक्तिक व्यक्तीस अनुदान अदा करता येणार नाही अशी मान्यता दिलेली आहे.

म.न.पा.परिसरातील सार्व.संस्था/मंडळे यांना दयावयाचे अनुदान याबाबत खालीलप्रमाणे नियम ठरविण्यात आले आहेत या नंतरचा

"१)खालील ध्येय धोरणाचे वर्णन व त्यांना सहाय्य करणा-या सर्व किंवा काही संस्था/मंडळ यांना म.न.पा.ठरविल त्याप्रमाणे ऐच्छिक अनुदान देता येईल.

**आ**)प्राथमिक शिक्षण तसेच अंध मुकबधिर व अपंग मुलांची देखभाल व प्रशिक्षण

ब) माध्यमिक शिक्षण तसेच संग्रहालये, तांत्रिक शाळा, वाचनालये, ग्रंथालये, उद्योग शाळा, यांच्या इमारतीचे बांधकाम व साहित्य खरेदी

क) क्रीडा व व्यायामशाळा

ड) सामाजिक सेवा, बालकल्याण केंद्र, आरोग्य केंद्र तसेच पाळणा घरे, पूर्व प्राथमिक शाळा, बालवाडया, बालनाटय केंद्र, बालसाहित्य, ग्रंथालय या सारखे महिलांनी चालविलेले सामाजिक व शैक्षणिक उपक्रम

इ) गरीब व अनाथ व्यक्ती, बहिष्कृत स्त्रिया व गुन्हेगार यांचे पुर्नवसन

फ) रुग्णालये, दवाखाने, कुष्ठरोग, शुषुश्रा केंद्र मनोरुग्णालये, प्रसुतिगृह यासारखे संस्था वैदयकिय मदत किंवा अशा प्रकारचे कोणतीही सर्व सामान्य मदत ज्याची गणना सामाजिक सुरक्षितता, आरोग्यसुविधा किंवा मार्गदर्शन यांच्या वाढीसाठी होईल." हा

मजकुर वगळण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच १) मा.महापालिका सभा ठराव क्र. ४२१ दि.१८/१/२०१४ व मा.महापालिका सभा ठराव क्र. ४८० दि.२०/५/२०१४ अन्वये मनपा क्रीडा धोरण व क्रीडा सुविधा दरास मान्यता दिलेली आहे यामध्ये भाग ४- विविध सुविधा दरपत्रकास मान्यता दिलेली आहे.

म.न.पा.परिसरातील मतिमंद, अपंग, मुकबधिर व अंध विदयार्थी, खेळाडू, नागरिक यांना म.न.पा.च्या विविध क्रीडा सुविधा (उदा.बॅडमिंटन हॉल, लॉनटेनिस कोर्ट, जलतरण तलाव, मैदाने ई.) विनामुल्य उपलब्ध करुन देणेत येईल परंतु अशा मतिमंद, अपंग, मुकबधिर व अंध विदयार्थी, खेळाडू, नागरिक यांकडे ४० टक्के अपंगत्वाचे सक्षम वैदयकीय अधिकारी यांनी दिलेले प्रमाण पत्र असणे आवश्यक आहे. याकामी विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे. विद्यालयामार्फत एकत्रित विद्यार्थी सरावासाठी येणेपुर्वी रीतसर अर्ज देऊन परवानगी घेऊन ४ विद्यार्थ्यामागे १ शिक्षक सह विद्यार्थ्यांना सरावासाठी आणणे आवश्यक आहे. त्यांची सर्व प्रकारची जबाबदारी संबंधित विदयालयाची राहील तसेच व्यक्तिगत मतिमंद, अपंग, मुकबधिर व अंध विद्यार्थी, खेळाडू, नागरिक, सरावासाठी येताना त्याचे समवेत १ पालक सोबत असणे आवश्यक राहील. व्यक्तिगत मतिमंद, अपंग, मुकबधिर व अंध विद्यार्थी, खेळाडू, नागरिक, सरावासाठी येताना सर्व प्रकारची जबाबदारी ही संबंधित खेळाडू, नागरीक व पालक यांची राहील असा मजकूर समाविष्ट करण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच १) मा.महापालिका सभा ठराव क्र. ४२१ दि.१८/१/२०१४ व मा.महापालिका सभा ठराव क्र. ४८० दि.२०/५/२०१४ अन्वये मनपा क्रीडा धोरण व क्रीडा सुविधा दरास मान्यता दिलेली आहे यामध्ये भाग २- विविध क्रीडा सुविधा, १०- जलतरण तलाव, अट क्र. १२ मतिमंद, अपंग, मुकबधिर व अंध यांना विशेष सवलतीच्या दराने सकाळी ११.३० ते १२.३० या वेळात सरावासाठी जलतरण तलाव उपलब्ध करुन देणेत येईल या अटी मध्ये, “मतिमंद, अपंग, मुकबधिर व अंध विद्यार्थी, खेळाडू, नागरिक यांना विनामुल्य सरावासाठी जलतरण तलाव उपलब्ध करुन देणेत येईल. परंतु अशा मतिमंद, अपंग, मुकबधिर व अंध विद्यार्थी, खेळाडू, नागरिक यांकडे ४० टक्के अपंगत्वाचे सक्षम वैद्यकीय अधिकारी यांनी दिलेले प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे याकामी विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे विद्यालयामार्फत एकत्रित विद्यार्थी पोहोण्याच्या सरावासाठी येणेपुर्वी रीतसर अर्ज देऊन परवानगी घेऊन ४ विद्यार्थ्यामागे १ शिक्षक सह विद्यार्थ्यांना सरावासाठी आणणे आवश्यक आहे. त्यांची सर्व प्रकारची जबाबदारी संबंधित विद्यालयाची राहील तसेच व्यक्तिगत मतिमंद, अपंग, मुकबधिर व अंध विद्यार्थी, खेळाडू, नागरिक, पोहोण्यासाठी येताना त्याचे समवेत १ पालक सोबत असणे आवश्यक राहील. व्यक्तिगत मतिमंद, अपंग, मुकबधिर व अंध विद्यार्थी, खेळाडू, नागरिक, पोहोण्यासाठी येताना सर्व प्रकारची जबाबदारी ही संबंधित पोहणारी व्यक्ती व पालक यांची राहील अशी दुरुस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३वर पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ९४२ विषय क्रमांक-३

दिनांक-२८.११.२०१६ विभाग-मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक
क्र.निवडणूक/१/कावि/५११/२०१६ दि.१४/९/२०१६
२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.१७३६७ दि.२०.९.२०१६

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०१७ साठी निवडणूक विभागाचे सन २०१६-१७ चे पुस्तक क्रमांक २ मध्ये निवडणूक खर्च या लेखा शिर्षावर निवडणूकीचे कामाकरीता र.रू.१,९२,१०,०००/- इतकी तरतूद करण्यात आलेली आहे. या तरतूदीमधून सार्वत्रिक निवडणूकी करीता होणारा खर्च करण्यात येणार आहे. तथापि, मा.राज्य निवडणूक आयोगाचे सुचनेनुसार प्रति मतदार रक्कम रुपये १००/- इतका खर्च मतदार जनजागृती अभियान तसेच निवडणूकीचे कामाकरीता करण्याकामी सुचना दिलेल्या आहेत. सार्वत्रिक निवडणूक २०१७ करीता अपेक्षीत मतदार १३,५०,००० असून प्रती मतदार १००/- रुपये खर्च धरल्यास रक्कम रुपये १३,५०,००,०००/- इतकी तरतूद आवश्यक असल्याने पाणी पुरवठा विभागाकडील सन २०१६-१७ चे पुस्तक क्रमांक १ पान क्रमांक २१७ अनुक्रमांक १३ या पुस्तकातील पाणी पुरवठा विशेष योजना निधीमधील कामाचे नाव आंद्रा व भामा आसखेड धरणातून पिंपरी चिंचवड शहरासाठी पाणी आणणे व अनुषंगीक कामे करणे या कामाचे तूरतूदीसाठी केलेली रक्कम रुपये १९,८५,००,०००/- मधून र.रू.११,५७,९०,०००/- निवडणूक विभागाकडील निवडणूक खर्च या लेखाशिर्षावर वर्गीकरण करणेकरिता मान्यता देणेत येत आहे.

**मा.अमिना पानसरे** - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.तानाजी खाडे-**मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी तसेच कुटुंब व्याख्येनुसार त्यांचेवर अवलंबुन असणारे कुटुंबीय आणि सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी (पती/पत्नी) यांचेसाठी धन्वंतरी स्वास्थ्य योजना दिनांक १ सप्टेंबर २०१५ पासून सुरु करणेत आलेली आहे.

त्यानुसार दिनांक १ एप्रिल २०१६ ते ३१ ऑक्टोबर २०१६ या कालावधीत धन्वंतरी योजनेमध्ये अधिकारी/कर्मचारी आणि त्यांचे अवलंबित तसेच सेवानिवृत्त कर्मचारी व त्यांचे अवलंबित यांनी उपचार घेतले असून त्यांची बिलांची संख्या ५१६५ इतकी झाली आहे. त्यापैकी अद्यापपर्यंत ३२४१ रुग्णांवर उपचारापोटी केलेल्या बिलांची रक्कम अदा करणे प्रलंबित आहे. ९७०/- ची अदायगी धन्वंतरी पॅनलवरील रुग्णालयांना अदा करणे आवश्यक आहे. वरीलप्रमाणे झालेले खर्च हा पॅनलवरील रुग्णालयांमार्फत महानगरपालिकेच्या कर्मचा-यांवर झालेला असल्यामुळे सदरची बिले रुग्णालयांना अदा करणे क्रमप्राप्त आहे.

धन्वंतरी स्वास्थ्य योजना या लेखाशिर्षावर सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी र.रु.९,६७९/- इतकी तरतूद शिल्लक आहे.

धन्वंतरी योजनेअंतर्गत दरमहा प्राप्त होणा-या कर्मचारी वर्गणी व महापालिकेचा हिस्सा याचा विचार करता धन्वंतरी स्वास्थ्य योजनेचे लेखाशिर्षावर अतिरिक्त किमान र.रु.११ कोटींची तरतूद वर्ग करणे आवश्यक आहे. सदरची रक्कम आर्थिक अनुदान (Cross Subsidy) स्वरुपात वैद्यकीय विभागाचे इतर लेखाशिर्षावरुन धन्वंतरी योजनेचे लेखाशिर्षावर वर्ग करणे आवश्यक आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे –

| | | | |
|---|---|---|---|
| स्थायी आस्थापना | - ३ कोटी | | |
| अस्थायी आस्थापना | - १ कोटी | | |
| उपकरणे खरेदी | - ६ कोटी | | |
| एन.यु.एच.एम. | - १ कोटी | - | एकूण र.रु.११ कोटी |

वर नमूद केल्याप्रमाणे एकूण र.रु.११ कोटी इतकी रक्कम धन्वंतरी स्वास्थ्य योजना या लेखाशिर्षावर वर्ग करण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.दत्ता साने** - मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.वैशाली काळभोर –** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारलेली नाही.

**मा.महापौर** – ही उपसूचना पुढील मिटींगला घेण्यात यावी. मूळ विषय मंजूर करण्यात येत आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४वर पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक-४

दिनांक-२८.११.२०१६ विभाग-मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.भूजि/९/कावि/२३६/२०१६ दि.१७/९/२०१६

२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.१७४८० दि.२७.९.२०१६

महाराष्ट्र शासन निर्णय सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र.कृपम०८१६/प्रक्र११९/२१ स दिनांक १२ ऑगष्ट, २०१६ नुसार शेतकरी बाजारामध्ये शेतक-याला चांगला भाव, ग्राहकांना ताजी फळे व भाजीपाला वाजवी दरात उपलब्ध होतो अशी संकल्पना राज्यात सुरु करावी. यासाठी “संत शिरोमणी श्री.सावतामाळी शेतकरी आठवडे बाजार” अभियान राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. सदर अभियानासाठी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ पुणे यांची समन्वय संस्था (NODAL AGENCY) म्हणून शासनाने नियुक्ती केली आहे. सदर अभियानाअंतर्गत मनपाने शेतक-यांना त्यांचे भाज्या, फळे, अन्नधान्य व इतर कृषी उत्पादने थेट विक्रीसाठी मनपा कार्यालयाच्या आवारात, भाजीमंडईत, व मनपा क्षेत्रात 3 ते ४ मैदाने दर शनिवारी किंवा रविवारी प्रस्तावात नमूदप्रमाणे उपलब्ध करून देणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.नंदा ताकवणे** - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.सुलभाताई ऊबाळे** – मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, शहरात ब-याच वॉर्डमध्ये आठवडे बाजार भरतोय. आता स्थायी समितीकडून नव्याने विषय आला आहे, “संत शिरोमणी श्री.सावतामाळी शेतकरी आठवडे बाजार” याचा उल्लेख केला आहे. आठवडे बाजार आहे तो त्यांचा त्यांना भरवू द्यात. कारण विकएंडला जमत नाही. बरेच जण बाहेरगावी गेलेले असतात. त्या भागातल्या नगरसेवकांच्या शिफारशीने जागा ठरवू द्यात. हा आठवडे बाजार नगरसेवकांसाठी किंवा अधिका-यांसाठी भरत नाहीतर त्या प्रभागातल्या नागरीकांसाठी भरत असतो. प्रभागातील मध्यवर्ती ठिकाणी फक्त एक दिवसासाठी संध्याकाळचे चार तासांसाठी भरवावा. जिथे बाजार भरणार आहे, त्या ठिकाणी त्यांच्याकडून कोणत्याही प्रकारची हानी होणार नाही, असे त्यांच्याकडून लेखी लिहून घ्या. आणि तशा प्रकारची परवानगी त्यांना द्या. मी पुढीलप्रमाणे उपसूचना करते-सन्मा.नगरसदस्य सांगतील त्याठिकाणी तसेच मनपाचे प्रभागात नगरसदस्य (स्थानिक) शिफारस करतील त्याठिकाणी मनपाचे स्थावर मालमत्तेचे

नुकसान न करता आठवडयाच्या कोणत्याही दिवशी परवानगी देणे तसेच मागेल त्याला परवानगी देणेत यावी. याशिवाय सर्व शेतक-यांना आठवडे बाजारात थेट माल विकण्यास परवानगी द्यावी.

**मा.शारदा बाबर** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.मंगलाताई कदम-**मा.महापौर साहेब, यात नावानिशी आहे ते काढून टाका. ज्याने मागितले त्याला द्या.

**मा.शमिम पठाण** – मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, मी दोन/तीन वाक्ये वाचते, कृषी उत्पादने थेट विक्रीसाठी मनपा कार्यालयाच्या आवारात, भाजीमंडईत, व मनपा क्षेत्रात, आत कार्यालयाच्या आवारात म्हणजे आपल्या मनपा इमारतीच्या पोर्चमध्ये बसणार आहेत का. इथे भाजी मंडई भरणार आहे का. मनपा क्षेत्रातील ३ ते ४ मैदाने, ती तयार करायला महापालिकेने कोट्यावधी रुपये खर्च केले आहेत. या विषयात उल्लेख केलेले मनपा आवार, उद्याने व मैदाने हे वगळा. मी उपसूचना देते की, आठवडे बाजार महापालिकेच्या आवार मैदाने व उदयाने वगळून मा.नगरसदस्यांच्या संमतीने योग्य त्या ठिकाणी आठवडे बाजार भरविण्यात यावा. ठराविक एका संस्थेला परवानगी न देता सर्व शेतक-यांना आठवडे बाजारात थेट माल विकण्यास परवानगी द्यावी.

**मा.अनुराधा गोफणे** - मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, दोन्ही उपसूचना स्विकारल्या आहेत.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - ९४३ | विषय क्रमांक-४

दिनांक-२८.११.२०१६ | विभाग-मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.भूजि/९/कावि/२३६/२०१६ दि.१७/९/२०१६

२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.१७४८० दि.२७.९.२०१६

महाराष्ट्र शासन निर्णय सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र.कृपम ०८१६/प्रक्र११९/२१ स दिनांक १२ ऑगष्ट, २०१६ नुसार शेतकरी बाजारामध्ये शेतक-याला चांगला भाव, ग्राहकांना ताजी फळे व भाजीपाला वाजवी दरात उपलब्ध होतो अशी संकल्पना राज्यात सुरु करावी. यासाठी "संत शिरोमणी श्री.सावतामाळी शेतकरी आठवडे बाजार" अभियान राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. सदर अभियानासाठी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ पुणे यांची समन्वय संस्था (NODAL AGENCY) म्हणून शासनाने नियुक्ती केली आहे. सदर अभियानाअंतर्गत मनपाने शेतक-यांना त्यांचे भाज्या, फळे, अन्नधान्य व इतर कृषी उत्पादने थेट विक्रीसाठी मनपा कार्यालयाच्या आवारात, भाजीमंडईत, व मनपा क्षेत्रात 3 ते ४ मैदाने दर शनिवारी किंवा रविवारी प्रस्तावात नमूद प्रमाणे उपलब्ध करून देणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच सन्मा.नगरसदस्य सांगतील त्याठिकाणी तसेच मनपाचे प्रभागात नगरसदस्य (स्थानिक) शिफारस करतील त्याठिकाणी मनपाचे स्थावर मालमत्तेचे नुकसान न करता आठवडयाच्या कोणत्याही दिवशी परवानगी देणेस तसेच मागेल त्याला परवानगी देणेस मान्यता देणेत येत आहे याशिवाय सर्व शेतक-यांना आठवडे बाजारात थेट माल विकण्यास परवानगी देणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच आठवडे बाजार महापालिकेच्या आवार मैदाने व उदयाने वगळून मा.नगरसदस्यांच्या संमतीने योग्य त्या ठिकाणी आठवडे बाजार भरविण्यास मान्यता देणेत येत आहे ठराविक एका संस्थेला परवानगी न देता सर्व शेतक-यांना आठवडे बाजारात थेट माल विकण्यास परवानगी देणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५वर पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक-५

दिनांक-२८.११.२०१६ विभाग-मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशा/१८/कावि/१४६६/२०१६ दि.२३/९/२०१६

२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.१७५२७ दि.२७.९.२०१६

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कर्मचारी महासंघ यांनी सन २०१५-२०१६ आणि त्यापुढील चार वर्षासाठी महापालिका आस्थापनेवरील अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रथा बोनस व सानुग्रह अनुदान मिळण्याकामी मागणी केलेली आहे. प्रथा बोनस व सानुग्रह अनुदानाच्या

मागणीसंदर्भात मा.महापौर यांचे अध्यक्षतेखाली, मा.उपमहापौर. मा.आयुक्त, मा.अध्यक्ष-स्थायी समिती, मा.पक्षनेते, मा.विरोधीपक्ष नेते व इतर पदाधिकारी, अधिकारी आणि कर्मचारी महासंघाचे प्रतिनिधी यांच्यामध्ये दिनांक ०९/०९/२०१६ रोजी चर्चा आयोजित करण्यात आली होती. या चर्चेमध्ये महापालिका व शिक्षण मंडळ आस्थापनेवरील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना तसेच रजा राखीव वैद्यकिय अधिकारी व रजा राखीव नर्सेस यांना सन २०१५-२०१६ या वर्षासह पुढील ४ वर्षासाठी ८.३३% प्रथा बोनस व र.रु. १५,०००/- सानुग्रह अनुदान म्हणून मान्यताप्राप्त संघटनेबरोबर करारनामा करुन मंजूर करावे, असा निर्णय झालेला आहे. तसा दिनांक ०९/०९/२०१६ रोजीचा सभावृत्तांत प्राप्त झालेला आहे. प्रथा बोनस व सानुग्रह अनुदान अदायगीकामी खालीलप्रमाणे निकष प्रस्तावित करण्यात येत आहेत.

१) सन २०१५-१६ मध्ये जे कार्यरत अधिकारी / कर्मचारी वेतनश्रेणीमध्ये आहेत, त्यांना व रजा राखीव वैद्यकिय अधिकारी आणि रजा राखीव नर्सेस यांना एक महिन्याच्या वेतनाइतकी वित्तलब्धी (इतर भत्ते वगळून) म्हणजेच ८.३३% इतकी रक्कम प्रथा बोनस म्हणून व र.रु.१५,०००/- सानुग्रह अनुदानापोटी देय राहील. एका वर्षामध्ये सहा महिन्यापासून पूर्ण वर्षापर्यंत सलग सेवेचा कालावधी यथाप्रमाण प्रथा बोनस आणि यथाप्रमाण सानुग्रह अनुदान देय राहील. सहा महिन्यापेक्षा कमी सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांना प्रथा बोनस व सानुग्रह अनुदान देय राहणार नाही. तथापि ज्या रजा राखीव वैद्यकिय अधिकारी आणि रजा राखीव नर्सेस यांच्या नेमणुका वेतनश्रेणीत करण्यात आलेल्या आहेत व त्यांना काही दिवस ब्रेक देऊन पुन्हा वेतनश्रेणीत नेमणुका देण्यात आल्या आहेत, अशांच्या बाबतीत खंडित सेवेचा कालावधी वगळता यथाप्रमाण प्रथा बोनस व यथाप्रमाण सानुग्रह अनुदान अनुज्ञेय राहील.

२) प्रथा बोनसची रक्कम ही मार्च २०१६ च्या वित्तलब्धीवर अदा करण्यात येईल, त्यामध्ये वेतनमर्यादा राहणार नाही.

३) महापालिकेतील अधिकारी/कर्मचा-यांना दि.०२/०३/२०१६ ते दि.३१/०३/२०१६ या कालावधीत पदोन्नती किंवा सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेतंर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी लागु केली आहे, अशा कर्मचा-यांना प्रथा बोनस अदा करण्याकामी त्यांचे मूळ पदावरील वेतन विचारात घ्यावे. पदोन्नतीच्या पदाचे वेतन किंवा वरिष्ठ वेतनश्रेणीमधील वेतन विचारात घेऊ नये. तसेच एल.एस.जी.डी. /एल.जी.एस./डी.एल.जी.एफ.एम. च्या आगाऊ वेतनवाढी दि.०२/०३/२०१६ ते दि.३१/०३/२०१६ या कालावधीत लागु झाल्या असल्यास संबधितास प्रथा बोनस

अदा करताना सदर आगाऊ वेतनवाढी लागू करण्यापुर्वीचे मुळ वेतन विचारात घेण्यात यावे.

४) वित्तलब्धी या संज्ञेत मूळवेतन, ग्रेडवेतन, महागाई भत्ता, प्रतिनियुक्तीवरील भत्ता, व्यवसायरोध भत्ता याचा समावेश असेल. तथापि घरभाडे भत्ता, पूरक भत्ता, वैद्यकीय भत्ता व इतर बाबीचा समावेश करण्यात येऊ नये.

५) बालवाडी शिक्षकांना खालील सुत्रानुसार सानुग्रह अनुदान देय राहील.
सानुग्रह अनुदान ÷ ३६५× हजर दिवस = द्यावयाचे सानुग्रह अनुदान
(र.रु. १५०००÷३६५× हजर दिवस = द्यावयाचे सानुग्रह अनुदान)

६) सन २०१५-१६ या वर्षामध्ये सहा महिन्यापासून संपूर्ण आर्थिक वर्षात ज्या अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी यात मानधनावरील अधिकारी/कर्मचारी, मानधनावरील वैद्यकीय अधिकारी आणि समूह संघटकांसह महापालिका आस्थापनेवर करार पध्दतीने/मानधनावर नेमलेल्या तसेच शासनाकडून पगारापोटी अनुदान मिळणा-या सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी काम केले आहे. त्यांना र.रु.१५०००/- सानुग्रह अनुदान यथाप्रमाण देय राहील. मात्र दोन नेमणुकीच्या दरम्यान काही खंडित कालावधी असेल तर तो वगळून यथाप्रमाण सानुग्रह अनुदान देय राहील.

७) महानगरपालिका आस्थापनेवरील जे अधिकारी व कर्मचारी सेवानिलंबित आहेत, अशा अधिका-यांना/ कर्मचाऱ्यांना त्यांना देण्यात येणाऱ्या निर्वाह वेतनाच्या ८.३३% रक्कम यथा प्रमाण प्रथा बोनस व र.रु.१५,०००/- इतके यथाप्रमाण सानुग्रह अनुदान देय राहील. तसेच जे अधिकारी/कर्मचारी सन २०१५-१६ मध्ये सेवानिलंबित झाले आहेत, अशांच्या बाबतीत त्यांची वेतनश्रेणीतील सेवा व सेवानिलंबन कालावधीतील निर्वाह वेतन विचारात घेऊन यथाप्रमाण प्रथा बोनस व सानुग्रह अनुदान देय राहील. तसेच गैरहजर/विनावेतनी रजेवरील कर्मचाऱ्यांचे बाबतीत यथाप्रमाण प्रथा बोनस व यथाप्रमाण सानुग्रह अनुदान देय राहील.

८) जे अधिकारी/कर्मचारी सन २०१५-१६ या वर्षात महापालिका सेवेत होते, तथापि नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त, मयत किंवा स्वेच्छा व वैद्यकिय कारणास्तव सेवानिवृत्त झाले आहेत, राजीनामा दिलेले, सेवेतून कमी केलेले/सेवा समाप्त केलेले तसेच बदली झालेले प्रतिनियुक्तीवरील अधिकारी/कर्मचारी यांचा सहा महिन्यापेक्षा जास्त असलेला सेवाकाल विचारात घेऊन त्यांना यथाप्रमाण प्रथा बोनस व यथाप्रमाण सानुग्रह अनुदान देय राहील.

९) महापालिका अधिकारी व कर्मचा-यांना ज्या प्रमाणे प्रथा बोनस व सानुग्रह अनुदान मंजूर करण्यात आले आहे त्याच दराने शिक्षण मंडळातील अधिकारी व कर्मचारी यांना प्रथा बोनस व सानुग्रह अनुदान मंजूर करण्याची कार्यवाही शिक्षण मंडळाने करावी. तसेच रोजंदारीवरील कर्मचा-यांच्या बाबतीत क्रं–५ चे सुत्रानुसार सानुग्रह अनुदानाबाबत कार्यवाही करावी.

१०) प्रति अधिकारी व कर्मचा-यांचे प्रथा बोनस व सानुग्रह अनुदान देय रकमेमधून कर्मचारी संघटना निधी म्हणून २% रक्कम कपात करण्यात यावी. अधिकारी व कर्मचारी यांचेकडून कपात करणेत आलेला निधी लेखा विभागाने १५ दिवसाचे आत कर्मचारी महासंघाला देणेत यावा.

उपरोक्त निकषानुसार महापालिका व शिक्षण मंडळ आस्थापनेवरील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना सन २०१५-१६ करिता व पुढील ४ वर्षासाठी मान्यताप्राप्त संघटनेशी करारनामा करुन प्रथा बोनस व सानुग्रह अनुदान तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका कर्मचारी महासंघ व मा.आयुक्त यांचेमध्ये झालेल्या करारनाम्यानुसार महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कार्यरत असणा-या अधिकारी/कर्मचारी यांना सन २०१५-१६ चा बोनस व सानुग्रह अनुदान देय आहे. त्यामुसार महानगरपालिका आस्थापनेवरील पर्यवेक्षक अन्न, अन्न निरिक्षक यांना प्रथा बोनस व सानुग्रह अनुदान तसेच शासनाकडील DAY - NULM या योजनेअंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागाकडे ०६ समुहसंघटक, ०३ व्यवस्थापक व ०१ सहा.प्रकल्प अधिकारी एकूण १० कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आली असून शासनाकडून प्राप्त होणा-या अनुदानातुन त्यांना मानधन अदा करण्यात येत असल्याने त्यांना मनपा निधीतून सानुग्रह अनुदान मा.महापालिका सभेच्या उमेद मान्यतेवर अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.अमिना पानसरे** - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.तानाजी खाडे** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो – पिंपरी चिंचवड महानगरपालिका कर्मचारी महासंघाबरोबर प्रथा बोनस व सानुग्रह अनुदाना संदर्भात चर्चा झाली असून त्या अनुषंगाने आदेश क्र.प्रशा/१८/कावि/१६१३ अन्वये अधिकारी व कर्मचा-यांना ८.३३% प्रथा बोनस व रक्कम रु.१५,०००/- सानुग्रह अनुदान निकषानुसार मान्य करण्यात आलेले आहे. सदर निकष क्र.५ मध्ये सानुग्रह अनुदान ÷ ३६५ (लिप वर्षासाठी ३६६ दिवस) X हजर दिवस = द्यावयाचे सानुग्र अनुदान देणेस व निकष क्र.८ मध्ये जे अधिकारी/कर्मचारी सन २०१५-१६ या वर्षात महापालिका सेवेत होते, तथापि नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त, मयत किंवा स्वेच्छा व वैद्यकीय कारणास्तव सेवानिवृत्त झाले आहेत, राजीनामा दिलेले, सेवेतून कमी केलेले/सेवा समाप्त केलेले अधिकारी/कर्मचारी यांचा सेवा काल विचारात घेऊन तसेच बदली झालेले प्रतिनियुक्तीवरील अधिकारी/कर्मचारी यांचा सहा महिन्यांपेक्षा जास्त असलेला सेवाकाल

विचारात घेऊन त्यांना यथाप्रमाण प्रथा बोनस व यथाप्रमाण सानुग्रह अनुदान देय राहील अशी दुरुस्ती करणेस मान्यता देणेत यावी. तसेच पिंपरी चिचवड महानगरपालिका कर्मचारी महासंघाबरोबर प्रथा बोनस व सानुग्रह अनुदाना संदर्भात चर्चा झाली असून त्या अनुषंगाने आदेश क्र. प्रशा/१८/कावि/१६१३ अन्वये अधिकारी व कर्मचा-यांना ८.३३% प्रथा बोनस व रक्कम रु.१५,०००/- सानुग्रह अनुदान निकषानुसार मान्य करण्यात आलेले आहे. त्याअनुषंगाने शिक्षण मंडळामध्ये मानधनावर, सफाई कामगार या पदावर गेली १२ वर्षापासून काम करणा-या सफाई कामगारांना सानुग्रह अनुदान म्हणून घंटागाडी कर्मचा-यांना ज्या प्रमाणे देण्यात आलेले त्याप्रमाणे देण्यास मान्यता देण्यात यावी.

**मा.दत्ता साने** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - ९४४ विषय क्रमांक-५
दिनांक-२८.११.२०१६ विभाग-मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशा/१८/कावि/१४६६/२०१६ दि.२३/९/२०१६
२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.१७५२७ दि.२७.९.२०१६

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कर्मचारी महासंघ यांनी सन २०१५-२०१६ आणि त्यापुढील चार वर्षासाठी महापालिका आस्थापनेवरील अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रथा बोनस व सानुग्रह अनुदान मिळण्याकामी मागणी केलेली आहे. प्रथा बोनस व सानुग्रह अनुदानाच्या मागणीसंदर्भात मा. महापौर यांचे अध्यक्षतेखाली, मा.उपमहापौर. मा.आयुक्त, मा.अध्यक्ष-स्थायी समिती, मा.पक्षनेते, मा.विरोधीपक्ष नेते व इतर पदाधिकारी, अधिकारी आणि कर्मचारी महासंघाचे प्रतिनिधी यांच्यामध्ये दिनांक ०९/०९/२०१६ रोजी चर्चा आयोजित करण्यात आली होती. या चर्चेमध्ये महापालिका व शिक्षण मंडळ आस्थापनेवरील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना तसेच रजा राखीव वैद्यकिय अधिकारी व रजा राखीव नर्सेस यांना सन २०१५-२०१६ या वर्षासह पुढील ४ वर्षासाठी ८.३३% प्रथा बोनस व र.रु. १५,०००/- सानुग्रह अनुदान म्हणून मान्यताप्राप्त संघटनेबरोबर करारनामा करुन मंजूर करावे, असा निर्णय झालेला आहे. तसा दिनांक ०९/०९/२०१६ रोजीचा सभावृत्तांत प्राप्त झालेला आहे. प्रथा बोनस व सानुग्रह अनुदान अदायगीकामी खालीलप्रमाणे निकष प्रस्तावित करण्यात येत आहेत.

१) सन २०१५-१६ मध्ये जे कार्यरत अधिकारी / कर्मचारी वेतनश्रेणीमध्ये आहेत, त्यांना व रजा राखीव वैद्यकिय अधिकारी आणि रजा राखीव नर्सेस यांना एक महिन्याच्या वेतनाइतकी वित्तलब्धी (इतर भत्ते वगळून) म्हणजेच ८.३३% इतकी रक्कम प्रथा बोनस म्हणून व र.रु.१५,०००/- सानुग्रह अनुदानापोटी देय राहील. एका वर्षामध्ये सहा महिन्यापासून पूर्ण वर्षापर्यंत सलग सेवेचा कालावधी यथाप्रमाण प्रथा बोनस आणि यथाप्रमाण सानुग्रह अनुदान देय राहील. सहा महिन्यापेक्षा कमी सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांना प्रथा बोनस व सानुग्रह अनुदान देय राहणार नाही. तथापि ज्या रजा राखीव वैद्यकिय अधिकारी आणि रजा राखीव नर्सेस यांच्या नेमणुका वेतनश्रेणीत करण्यात आलेल्या आहेत व त्यांना काही दिवस ब्रेक देऊन पुन्हा वेतनश्रेणीत नेमणुका देण्यात आल्या आहेत, अशांच्या बाबतीत खंडित सेवेचा कालावधी वगळता यथाप्रमाण प्रथा बोनस व यथाप्रमाण सानुग्रह अनुदान अनुज्ञेय राहील.

२) प्रथा बोनसची रक्कम ही मार्च २०१६ च्या वित्तलब्धीवर अदा करण्यात येईल, त्यामध्ये वेतनमर्यादा राहणार नाही.

३) महापालिकेतील अधिकारी/कर्मचा-यांना दि.०२/०३/२०१६ ते दि.३१/०३/२०१६ या कालावधीत पदोन्नती किंवा सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेतंर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी लागु केली आहे, अशा कर्मचा-यांना प्रथा बोनस अदा करण्याकामी त्यांचे मूळ पदावरील वेतन विचारात घ्यावे. पदोन्नतीच्या पदाचे वेतन किंवा वरिष्ठ वेतनश्रेणीमधील वेतन विचारात घेऊ नये. तसेच एल.एस.जी.डी./एल.जी.एस./डी. एल.जी.एफ.एम. च्या आगाऊ वेतनवाढी दि.०२/०३/२०१६ ते दि.३१/०३/२०१६ या कालावधीत लागु झाल्या असल्यास संबधितास प्रथा बोनस अदा करताना सदर आगाऊ वेतनवाढी लागू करण्यापुर्वीचे मुळ वेतन विचारात घेण्यात यावे.

४) वित्तलब्धी या संज्ञेत मूळवेतन, ग्रेडवेतन, महागाई भत्ता, प्रतिनियुक्तीवरील भत्ता, व्यवसायरोध भत्ता याचा समावेश असेल. तथापि घरभाडे भत्ता, पूरक भत्ता, वैद्यकीय भत्ता व इतर बाबीचा समावेश करण्यात येऊ नये.

५) बालवाडी शिक्षकांना खालील सुत्रानुसार सानुग्रह अनुदान देय राहील.
सानुग्रह अनुदान ÷ ३६५× हजर दिवस = द्यावयाचे सानुग्रह अनुदान
(र.रु. १५०००÷३६५× हजर दिवस = द्यावयाचे सानुग्रह अनुदान)

६) सन २०१५-१६ या वर्षामध्ये सहा महिन्यापासून संपूर्ण आर्थिक वर्षात ज्या अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी यात मानधनावरील अधिकारी/कर्मचारी, मानधनावरील वैद्यकीय अधिकारी आणि समूह संघटकांसह महापालिका आस्थापनेवर करार पध्दतीने/मानधनावर नेमलेल्या तसेच शासनाकडून पगारापोटी अनुदान मिळणा-या सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी काम केले आहे. त्यांना र.रु.१५०००/- सानुग्रह अनुदान यथाप्रमाण देय राहील. मात्र दोन नेमणुकीच्या दरम्यान काही खंडित कालावधी असेल तर तो वगळून यथाप्रमाण सानुग्रह अनुदान देय राहील.

७) महानगरपालिका आस्थापनेवरील जे अधिकारी व कर्मचारी सेवानिलंबित आहेत, अशा अधिका-यांना/ कर्मचाऱ्यांना त्यांना देण्यात येणाऱ्या निर्वाह वेतनाच्या ८.३३% रक्कम यथा प्रमाण प्रथा बोनस व र.रु.१५,०००/- इतके यथाप्रमाण सानुग्रह अनुदान देय

राहील. तसेच जे अधिकारी/कर्मचारी सन २०१५-१६ मध्ये सेवानिलंबित झाले आहेत, अशांच्या बाबतीत त्यांची वेतनश्रेणीतील सेवा व सेवानिलंबन कालावधीतील निर्वाह वेतन विचारात घेऊन यथाप्रमाण प्रथा बोनस व सानुग्रह अनुदान देय राहील. तसेच गैरहजर / विनावेतनी रजेवरील कर्मचाऱ्यांचे बाबतीत यथाप्रमाण प्रथा बोनस व यथाप्रमाण सानुग्रह अनुदान देय राहील.

८) जे अधिकारी/कर्मचारी सन २०१५-१६ या वर्षात महापालिका सेवेत होते, तथापि नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त, मयत किंवा स्वेच्छा व वैद्यकिय कारणास्तव सेवानिवृत्त झाले आहेत, राजीनामा दिलेले, सेवेतून कमी केलेले/सेवा समाप्त केलेले तसेच बदली झालेले प्रतिनियुक्तीवरील अधिकारी/कर्मचारी यांचा सहा महिन्यापेक्षा जास्त असलेला सेवाकाल विचारात घेऊन त्यांना यथाप्रमाण प्रथा बोनस व यथाप्रमाण सानुग्रह अनुदान देय राहील.

९) महापालिका अधिकारी व कर्मचा-यांना ज्या प्रमाणे प्रथा बोनस व सानुग्रह अनुदान मंजूर करण्यात आले आहे त्याच दराने शिक्षण मंडळातील अधिकारी व कर्मचारी यांना प्रथा बोनस व सानुग्रह अनुदान मंजूर करण्याची कार्यवाही शिक्षण मंडळाने करावी. तसेच रोजंदारीवरील कर्मचा-यांच्या बाबतीत क्रं–५ चे सुत्रानुसार सानुग्रह अनुदानाबाबत कार्यवाही करावी.

१०) प्रति अधिकारी व कर्मचा-यांचे प्रथा बोनस व सानुग्रह अनुदान देय रकमेमधून कर्मचारी संघटना निधी म्हणून २% रक्कम कपात करण्यात यावी. अधिकारी व कर्मचारी यांचेकडून कपात करणेत आलेला निधी लेखा विभागाने १५ दिवसाचे आत कर्मचारी महासंघाला देणेत यावा.

उपरोक्त निकषानुसार महापालिका व शिक्षण मंडळ आस्थापनेवरील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना सन २०१५-१६ करिता व पुढील ४ वर्षासाठी मान्यताप्राप्त संघटनेशी करारनामा करुन प्रथा बोनस व सानुग्रह अनुदान तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका कर्मचारी महासंघ व मा.आयुक्त यांचेमध्ये झालेल्या करारनाम्यानुसार महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कार्यरत असणा-या अधिकारी/कर्मचारी यांना सन २०१५-१६ चा बोनस व सानुग्रह अनुदान देय आहे. त्यानुसार महानगरपालिका आस्थापनेवरील पर्यवेक्षक अन्न, अन्न निरिक्षक यांना प्रथा बोनस व सानुग्रह अनुदान तसेच शासनाकडील DAY - NULM या योजनेअंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागाकडे ०६ समुहसंघटक, ०३ व्यवस्थापक व ०१ सहा.प्रकल्प अधिकारी एकूण १० कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आली असून शासनाकडून प्राप्त होणा-या अनुदानातुन त्यांना मानधन अदा करण्यात येत असल्याने त्यांना मनपा निधीतून सानुग्रह अनुदान मा.महापालिका सभेच्या उमेद मान्यतेवर अदा करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका कर्मचारी महासंघाबरोबर प्रथा बोनस व सानुग्रह अनुदाना संदर्भात चर्चा झाली असून त्या अनुषंगाने आदेश क्र. प्रशा/१८/कावि/१६१३ अन्वये अधिकारी व कर्मचा-यांना ८.३३% प्रथा बोनस व रक्कम रु. १५,०००/- सानुग्रह अनुदान निकषानुसार मान्य करण्यात आलेले आहे. सदर निकष क्र. ५ मध्ये सानुग्रह अनुदान ÷ ३६५ ऐवजी ३६५ (लिप वर्षासाठी ३६६ दिवस) × हजर दिवस = द्यावयाचे सानुग्रह अनुदान देणेस व निकष क्र. ८ मध्ये जे अधिकारी / कर्मचारी सन २०१५-१६

या वर्षात महापालिका सेवेत होते तथापि नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त, मयत किंवा स्वेच्छा व वैद्यकीय कारणास्तव सेवानिवृत्त झाले आहेत. राजीनामा दिलेले, सेवेतून कमी केलेले/सेवा समाप्त केलेले अधिकारी/कर्मचारी यांचा सेवाकाल विचारात घेऊन तसेच बदली झालेले प्रतिनियुक्तीवरील अधिकारी/कर्मचारी यांचा सहा महिन्यापेक्षा जास्त असलेला सेवाकाल विचारात घेऊन त्यांना यथाप्रमाण प्रथा बोनस व यथाप्रमाण सानुग्रह अनुदान देय राहील अशी दुरुस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिचवड महानगरपालिका कर्मचारी महासंघाबरोबर प्रथा बोनस व सानुग्रह अनुदाना संदर्भात चर्चा झाली असून त्या अनुषंगाने आदेश क्र. प्रशा/१८/कावि/१६१३ अन्वये अधिकारी व कर्मचा-यांना ८.३३% प्रथा बोनस व रक्कम रु.१५,०००/- सानुग्रह अनुदान निकषानुसार मान्य करण्यात आलेले आहे. त्याअनुषंगाने शिक्षण मंडळामध्ये मानधनावर, सफाई कामगार या पदावर गेली १२ वर्षापासून काम करणा-या सफाई कामगारांना सानुग्रह अनुदान म्हणून घंटागाडी कर्मचा-यांना ज्या प्रमाणे देण्यात आलेले त्याप्रमाणे देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६वर पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक-६

दिनांक-२८.११.२०१६ विभाग-मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नवियो/९/कावि/२०२/२०१६ दि.०४/१०/२०१६

२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.१७६६५ दि.४.१०.२०१६

शासन निर्णय क्र.एनयूएएल २०१४/प्र.क्र.१०४ नवि-३३ दि.२८ ऑगष्ट २०१४ अन्वये राज्यातील ५३ शहरामध्ये दिनयो राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियानाची (DAY NULM) अंमलबजावणी करण्यात येत आहे. सदर अभियानामध्ये शहरी बेघरांना निवारा हा एक घटक आहे. तसेच शासन नगरविकास विभाग निर्णय क्र.संकीर्ण २०१०/प्र.क्र.४५/नवि-२० दि.१४ जुलै २०११ अन्वये रात्रनिवारा कार्यान्वित करणे व त्याचे संचलन व देखभाल विषयी मार्गदर्शक तत्वे निश्चिंत करणेत आलेले आहेत. यानुसार शहरातील बेघर निराश्रीत नागरीकाकरिता मनपाच्या स्थापत्य विभागा मार्फत खालील सुविधा भूखंडावर १. पिंपरी मोरवाडी सर्व्हे नं. २९ पैकी सि.स.नं.४६९५ पैकीच्या ६८१ चौ.मी. भूखंड क्षेत्रावर व तसेच २. पिंपरी सर्व्हे नं. ३६ पैकी

५१९.४४ चौ.मी. भूखंड क्षेत्रावर असे एकूण दोन रात्र निवारा केंद्र बांधणेचा विस्तृत प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणेत आलेला आहे. अनुक्रमे १३६ व ५७ असे एकूण १९३ बेघरांसाठी र.रु.१,०८,१४,९७५.०० व ७३,२७,१९४.०० चा विस्तृत प्रकल्प अहवाल (DPR) आहे. या योजनेअंतर्गत र.रु. २५८ लाख इतका शासन निधी उपलब्ध आहे. तसेच या रात्रनिवारा केंद्र इमारतीस देखभाल दुरुस्तीसाठी ५ वर्षे वार्षीक र.रु. ६ लाख निधी उपरोक्त योजनेअंतर्गत उपलब्ध होणार आहे.

सबब, शहरी बेघरांना रात्रनिवारा शासनाच्या दिनयो राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान योजनेअंतर्गत १ पिंपरी मोरवाडी सर्वे नं. २९ पैकी सिटी सर्वे नं. ४६९५ पैकीच्या ६८१ चौ.मी. भूखंड क्षेत्रावर १३६ बेघरांसाठी र.रु. १,०८,१४,९७५.०० व २. पिंपरी सर्वे नं. ३६ पैकी ५१९.४४ चौ.मी.भूखंड क्षेत्रावर ५७ बेघरांसाठी र.रु. ७३,२७,१९४.०० असे एकूण दोन रात्र निवारा केंद्र बांधणेचा स्थापत्य विभागामार्फत तयार करणेत आलेल्या विस्तृत प्रकल्प अहवाल (DPR) नुसार बांधकाम खर्चास व त्या अनुषंगाने देखभाल दुरुस्तीसाठी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

**मा.अमिना पानसरे** - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.महापौर** – अधिका-यांनी या विषयाची माहिती द्यावी.

**मा.अष्टिकर (सहा.आयुक्त, भूमि आणि जिंदगी विभाग)** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, दिनयो राष्ट्रीय नागरी उपजिवीका या अभियानाअंतर्गत महापालिकेकडे जो निधी मंजूर आहे. त्या निधीअंतर्गत रात्र निवारा बांधणे यासाठीचे दोन डीपीआर राज्य शासनाकडे मान्यतेसाठी सादर करावयाचे आहेत. या अनुषंगाने १ पिंपरी मोरवाडी सर्वे नं. २९ पैकी सिटी सर्वे नं. ४६९५ पैकीच्या ६८१ चौ.मी. भूखंड क्षेत्रावर १३६ बेघरांसाठी र.रु. १,०८,१४,९७५.०० व २. पिंपरी सर्वे नं. ३६ पैकी ५१९.४४ चौ.मी.भूखंड क्षेत्रावर ५७ बेघरांसाठी र.रु.७३,२७,१९४.०० असे या किंमतीचे दोन डीपीआर राज्य शासनाकडे सादर करावयाचे आहेत. ते मंजूरीसाठी सभागृहापुढे सादर केले आहेत.

**मा.मंगलाताई कदम** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, त्यांना विषयाचे वाचन करायला अजिबात सांगितलेले नाही. पिंपरी इथे रात्रनिवारा आजपर्यंत बनवलेला आहे. तुम्ही पिंपरीत त्याठिकाणी जाऊन बघा. इतकी वाईट अवस्था आहे. त्याच्यावर अंमलबजावणी होते का ते विचारा. नुसता विषय आणायचा का.

**मा.महापौर** – पिंपरीमध्ये जो रात्रनिवारा केला आहे तिथे अधिका-यांचे अजिबात लक्ष नाही.

**मा.मंगलाताई कदम** - मा.महापौर साहेब, तिथे अधिका-यांचे अजिबात लक्ष नाही. लोकं इतकी तक्रार करतात. तिथे दारू पिणे, सिगरेट ओढणे सगळे चालू आहे.

**मा.महापौर** – खरोखर ही परिस्थिती आहे. तिथे ख-या अर्थाने बेघरांना आश्रय मिळतो का.

**मा.मंगलाताई कदम**-मा.महापौर साहेब, जिथे लोकांना खरोखरच गरज आहे तिथे करा. वायसीएम हॉस्पिटल आहे, भोसरीचे हॉस्पिटल होणार आहे. थेरगावचे, मोरवाडीचे हॉस्पिटल होणार आहे. जिथे लोकांना खरोखरच रात्री निवारा करायची गरज आहे, तिथे करा. नको तिथे करुन उपयोग होणार आहे का. हा विषय फेटाळावा. अधिका-यांनी पुढील मा.महापालिका सभेपर्यंत सगळी कारवाई करावी. अधिकारी सभा कामकाजाप्रमाणे खुलासा करणार असतील तर त्यांना जाहीर खुलासा करु द्यात. हा विषय फेटाळायचा आहे. पिंपरीतील रात्र निवा-यात आत्ता काय चालले आहे, ते त्यांना सांगू द्यात. नाहीतर त्यांना फोटोसुद्धा दाखवू यात.

**मा.माछरे (सहा.आयुक्त,झो.नि.पू. विभाग)**–मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा. सभागृह, भोसरीतल्या एका एजन्सीला काम दिले आहे. तिथे संध्याकाळी लोक ठेवले आहेत. एखाद दुसरी व्यक्ती तिथे निवा-यासाठी येते.

**मा.मंगलाताई कदम** - मा.महापौर साहेब, तिथे कोणी येत नसेलतर ती जागा त्या संस्थेकडून परत घ्या.

**मा.मंगलाताई कदम** - मा.महापौर साहेब, तिथे लोक जात नसतीलतर त्या संस्थेकडून ती जागा परत घ्या. त्या संस्थेचे बील किती मोठे आहे. इतर लोक तिथे जाऊन, दारू, चरस, गांज्याचे प्रकार चालतात. हे म्हणतात, एकही माणूस तिथे जात नाही, मग ती संस्था तिथे कामकाज करते का नाही. त्या संस्थेला ब्लॅकलिस्ट करा.

**मा.महापौर** – अधिका-यांनी आहे त्याकडे लक्ष दिलेले नाही.

**मा.योगेश बहल**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,संत तुकारामनगर इथे वायसीएम हॉस्पिटलला रात्रनिवा-याचे काम आपण हाती घेतलेलेच आहे. आणि आता जिजामाता हॉस्पिटल इथे सुद्धा काम चालू आहे. तिथे आपली सुरक्षा व्यवस्था आहे. तिथे

देखरेख करु शकतो. त्या जागेचा दुरुपयोग होणार नाही. भगिनी, स्त्रिया असतील त्यांना कोणत्याही प्रकारचा धोका होणार नाही. वास्तूचा गैरवापर होणार नाही अशा ठिकाणीच रात्र निवारा केला पाहिजे. म्हणून वायसीएम हॉस्पिटल इथे नाईट शेल्टर करायचे नियोजन केले आहे. किंवा मोठे हॉस्पिटल असेल तिथे केले पाहिजे. प्रायव्हेट सिक्युरीटी दिली तरीसुद्धा आपल्याकडे राजमाता जिजाऊ नावाने जे सांस्कृतिक भवन केलेले आहे. असे आढळून आले आहे की, तिथे सुरक्षा व्यवस्था नसली की अनेक वेळा गैरप्रकार होतात. सुरक्षा व्यवस्था नसली की असे गैरप्रकार होता कामा नये. म्हणून हा विषय आपण न केलेलाच बरा.

आधीच्या विषयात घंटागाडीच्या विषयाला मंजूरी दिली आहे. त्याचप्रमाणे राष्ट्रीय श्रमिक आघाडीचा सुप्रिम कोर्टात जो निकाल लागलेला आहे. ठेकेदारी पद्धतीच्या लोकांना कायम करण्याचा व त्यांना देय रक्कम देण्याचा. वास्तविक पाहता, या सभागृहाने मग तो पक्ष कोणताही असू द्यात, कामगारांना नेहमीच उचलून धरले आहे, कामगारांना मदत केली आहे. ही भूमिका महापौरांची आहे, सभागृहाची आहे. घंटागाडी कर्मचारी असो, आपला कर्मचारी असो, ठेकेदाराचे कर्मचारी असो, अनेक वर्षे न्यायालयात चाललेला, विलंब लागलेला तो विषय होता. आता सुप्रिम कोर्टाने आदेश दिला आहे. तरीसुद्धा आपण यात रिट पिटीशन टाकलेले आहे. मा.महापौर साहेब, अशा पद्धतीने ते निकाली लावावे. व ही देय रक्कम कशी देता येईल याचा प्रशासनाने प्रयत्न करावा,अशी मी विनंती करतो.

**मा.मंगलाताई कदम** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ दप्तरी दाखल करणेत यावा, अशी सूचना मांडते.

**मा.सविता साळुंके** – मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन आहे.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक – ९४५ | विषय क्रमांक-६ |
| दिनांक-२८.११.२०१६ | विभाग-मा.आयुक्त |

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नवियो/९/कावि/२०२/२०१६ दि.०४/१०/२०१६

२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.१७६६५ दि.४.१०.२०१६

विषय क्र.६ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७वर पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक – ९४६ विषय क्रमांक-७

दिनांक-२८.११.२०१६ विभाग-मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.सविता साळूंके व मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव-

२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.१७६६६ दि.४.१०.२०१६

भक्ति-शक्ती चौक निगडी ते दापोडी हा रस्ता महानगरपालिकेने विकसीत केला असुन या मार्गावर सार्वजनिक बीआरटी बस वाहतूक सुरु करण्याचे मनपाचे नियोजन आहे तसेच याठिकाणी चौक असल्यामुळे लहानमोठे अपघात वारंवार घडत असतात. त्यामुळे याठिकाणी नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी व वाहनाची रहदारी सुरळीत होण्यासाठी ग्रेडसेपरेटर, रोट्री व उड्डाणपुल बांधणेकामी मा.आयुक्त व नगरसदस्य यांनी तत्वत: मान्यता दिलेली आहे.

भक्ति–शक्ती चौक येथे ग्रेडसेपरेटर व उड्डाणपुल बांधणेचे कामाची अंदाजपत्रकीय र.रु.१,३५,००,००,०००/- इतकी येत आहे. सदर कामाची निवीदा प्रसिध्द करणेकामी र.रु. १,३५,००,००,०००/- या रक्कमेस मा.महापालिका सभेची प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे. तरी र.रु.१,३५,००,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे तसेच मनपाच्या सन २०१६-१७ चे अंदाजपत्रकात पान क्र. ५७ अ.क्र.१०९ वर ‘दापोडी येथे मुंबई पुणे रस्त्यावर FOB (पादचारी पुल) बांधणे व स्थापत्य विषयक अनुषंगीक कामे करणे’ या कामास मा.महापालिका सभा ठ.क्र. ८५० दि २०/४/२०१६ अन्वये प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. सदर कामातील FOB (पादचारी पुल) बांधण्याऐवजी सब-वे बांधणे असा बदल करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.भारती फरांदे** - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८वर पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक-८

दिनांक-२८.११.२०१६ विभाग-मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.सविता साळूंके व मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव-
२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.१७६६७ दि.४.१०.२०१६

प्रभाग क्र.४४ मधील साई चौक येथील जुनी मुतारी पाडून नवीन सुलभ पध्दतीने शौचालय करणेचे नियोजन आहे. तथापि २०१६-१७ चे अंदाजपत्रकात सदर कामाचा सामावेश नाही. सदयस्थितीत प्रभाग क्र. ४३ मध्ये कमला नेहरु शाळे लगत सुलभ पध्दतीने शौचालय बांधणेचे काम मे.सुलभ इन्टरनॅशनल सोशिएल सर्व्हिस ऑर्गनायझेशन यांचे मार्फत चालू आहे. सदर अंदापजत्रकास मा.महापालिका सभा ठराव क्र. ६६३ दि. ०६/०४/२०१५ अन्वये, र.रु. ४५,००,०००/- इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. प्रभाग क्र. ४४ मधील साईचौक येथे नवीन सुलभ पध्दतीने शौचालय बांधणेचे कामाची अंदाजपत्रकीय र.रु.३०,१२,०००/- इतकी आहे.

तरी प्रभाग क्र.४४ साई चौक येथील जुनी मुतारी पाडून नवीन सुलभ पध्दतीने शौचालय बांधणेकामी सध्या चालू असलेल्या प्रभाग क्र. ४३ कमला नेहरु शाळेलगत सुलभ शौचालय व मुतारी बांधणेचे कामास सध्याची प्रशासकीय मान्यता (र.रु. ४५,००,०००/-)+ नवीन कामाकरिता आवश्यक ती प्रशासकीय मान्यता (र.रु.३०,१२,०००/-) अशी एकूण र.रु.७५,१२,०००/- सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

**मा.नंदा ताकवणे** - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.नारायण बहिरवाडे** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो – प्रभाग क्र.४५ पिंपरी वाघेरे आरक्षण क्र.१६७ मध्ये जलतरण तलावास चेंजिंग रूम व इतर सुविधा विषयक इमारत बांधणे व अनुषंगिक कामे करणेचे काम (निविदा क्र.०५/०१/२०१२-१३) सुरू आहे. सदर कामास र.रू.१,८०,००,०००/- इतकी प्रशासकीय मान्यता देणेत आलेली आहे.

सदर कामांतर्गत सदर इमारतीच्या सिमाभिंतीची उंची वाढविणे, इमारतीच्या परिसरात पेव्हींग ब्लॉक बसविणे, वॉचमन केबीन उभारणे, व इमारतीस ए.सी.पी. क्लॅडीग करणे, इत्यादी बाबींचा नव्याने समावेश करणे आवश्यक आहे. सदर सुधारीत करावयाच्या बाबींची अंदाजपत्रकीय र.रू.३६,००,०००/- इतकी येत असल्याने एकूण अंदाजपत्रकीय रक्कम रू.१,८०,००,०००/- + र.रू.३६,००,०००/- (वाढीव खर्च) = र.रू.२,१६,००,०००/- इतकी येत आहे.

सदरचे काम २५.८१ % जादा दराने असल्याने सदर कामासाठी र.रू.२,१६,००,०००/- X १.२५८१ = २,७१,७४,९६०/- इतकी प्रशासकीय मान्यता आवश्यक आहे.

तरी प्रभाग क्र.४५ मधील पिंपरी वाघेरे आरक्षण क्र.१६७ मध्ये जलतरण तलावास चेंजिंग रूम व इतर सुविधा विषयक इमारत बांधणे व अनुषंगिक कामे करणेचे कामास एकूण र.रु.२,७२,००,०००/- (अक्षरी र.रू. दोन कोटी बहात्तर लाख) या खर्चास सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

**मा.संदिप चिंचवडे** - मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन देतो.

**मा.शमिम पठाण** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते – प्रभाग क्र. २१ पांढरकर चाळी जवळ नवीन सार्वजनिक स्वच्छतागृहे (१६ सीट) सुलभ पध्दतीने बांधुन पुर्ण झाली आहेत त्या ठिकाणची पुर्वीची जुनी शौचालये (शाळेच्या प्रवेशव्दाराजवळची) पाडण्यास प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

**मा.सुजाता टेकावडे** - मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन देते.

**मा.कैलासभाऊ थोपटे** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो – साई चौक रहाटणी येथे नाशिक फाटा ते वाकड व सांगवी ते किवळे या दोन बीआरटी रस्त्यांवर मोठया प्रमाणावर वाहतूकीची वर्दळ आहे. या चौकात प्रामुख्याने नाशिक फाटा, रहाटणी, पिंपरी,पिंपळेसौदागर पासून औंध, हिंजवडी, वाकड, डांगे चौकाकडे जाणा-या वाहनांस तसेच औंध वरुन डांगे चौक, रहाटणीकडे जाणा-या वाहनांस वाहतूक कोंडीमुळे खूप वेळ लागतो. या ठिकाणी सांगवी, किंवळे रस्त्यावर पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणामार्फत उड्डाणपूल बांधण्यात येणार आहे नाशिक फाटा, वाकड या रस्त्यावर साई चौक रहाटणी येथे वाहतूक कोंडी टाळण्यासाठी महानगरपालिके मार्फत ४४० मी. लांबीचा समतल वितलग (ग्रेड सेपरेटर) बांधणे आवश्यक आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकातील यु.टी.एफ. फंड या लेखाशिर्षातील पान क्र. ६२३ अनु.क्र.६ मनपा मेट्रो प्रकल्प या कामाच्या सन २०१६-१७ च्या र.रु. ५ कोटी तरतूदी पैकी र.रु. २ कोटी या कामासाठी तरतूद उपलब्ध होणे शक्य आहे. पुढील आर्थिक वर्षात ग्रेड सेपरेटरच्या कामासाठी महानगरपालिके मार्फत आवश्यक तरतूद करण्याची कार्यवाही करावी तसेच या कामाच्या नावाचा समावेश महानगरपालिकेच्या

अंदाजपत्रकामध्ये करण्यासाठी र.रु.४० कोटीचे अंदाजपत्रकीय रकमेस प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

**मा.अतुल शितोळे** - मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन देतो.

**मा.राजेंद्र जगताप** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो – प्रभाग क्र. ५७ पिंपळे गुरव येथील डायनासोर उदयानासमोरील प्राथमिक शाळेचे विस्तारीकरण करणे व इतर अनुषंगिक कामे करणेचे काम सन २०१६-१७ चे अंदाजपत्रकात पान क्र. ६५, अनु.क्र.६५ वर असून सदर कामास मा.महापालिका सभा ठराव क्र. ८५०, दि.२०/०४/२०१६ अन्वये र.रु. ३,००,००,०००/- (अक्षरी र.रु. तीन कोटी फक्त) इतकी प्रशासकीय मंजुरी मिळाली आहे.

तथापि सद्या अस्तित्वात असलेल्या शाळा इमारतीवर एफ.एस.आय.च्या मर्यादेत राहून दोन मजले वाढविणेचे नियोजन असल्याने तसेच जुन्या इमारतीस आवश्यक ती दुरुस्ती करावी लागणार आहे. तसेच सदर कामाकरीता वास्तुविशारद (आर्किटेक्ट) यांची नेमणूक केलेली असून त्यांनी सदर कामाकरीता सुमारे र.रु.६,००,००,०००/- इतका अंदाजपत्रकीय खर्च येत असलेबाबत अंदाजपत्रक दिलेले आहे. त्यामुळे सदर कामास मुळ प्रशासकीय मान्यता र.रु.३,००,००,०००/- + वाढीव प्रशासकीय मंजुरी र.रु. ३,००,००,०००/- अशी एकूण र.रु. ६,००,००,०००/- (अक्षरी र.रु. सहा कोटी फक्त) इतक्या रक्कमेस सुधारीत प्रशासकीय मान्यतेची आवश्यकता आहे.

प्रभाग क्र.५७ पिंपळे गुरव येथील डायनासोर उदयानासमोरील प्राथमिक शाळेचे विस्तारीकरण करणे व इतर अनुषंगिक कामे करणे या कामासाठी र.रु. ३,००,००,०००/- (अक्षरी र.रु. तीन कोटी फक्त) चे वाढीव खर्चासह एकूण र.रु.६,००,००,०००/- (अक्षरी र.रु. सहा कोटी फक्त) इतक्या रक्कमेस सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेत यावी. तसेच प्रभाग क्र. ५७ पिंपळेगुरव येथील आरक्षण क्र. ३४७ खेळाचे मैदान विकसित करणे, प्रेक्षक गॅलरी व व्यापारी गाळे विकसित करणे काम सन २०१६-१७ चे अंदाजपत्रकात पान क्र. ६७ अनु क्र. २३ वर असून सदर कामास मा.महापालिका सभा ठराव क्र. ८५०, दि.२०/०४/२०१६ अन्वये र.रु. ४,००,००,०००/- (अक्षरी र.रु. चार कोटी फक्त) इतकी प्रशासकीय मंजुरी मिळाली आहे.

तथापि सदरच्या कामाच्या नावात आरक्षण क्र. ३४४ व ३४४ अ खेळाचे मैदान उल्लेख करावयाचा राहून गेला असल्यामुळे त्याचा अंतर्भाव करणे आवश्यक असल्याने नावात दुरुस्ती करणेस सुधारीत मान्यता देणेत यावी. तरी प्रभाग क्र.५७ पिंपळे गुरव येथील आरक्षण क्र. ३४७ खेळाचे मैदान विकसित करणे, प्रेक्षक गॅलरी व व्यापारी गाळे विकसित करणे ऐवजी, “प्रभाग क्र. ५७ पिंपळे गुरव येथील आरक्षण क्र. ३४७, ३४४ व ३४४ अ खेळाचे मैदान विकसित करणे, प्रेक्षक गॅलरी व व्यापारी गाळे विकसित करणे.” कामाच्या नावास दुरुस्ती करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.संजय काटे** - मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन देतो.

**मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो – पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंतर्गत ब क्षेत्रीय कार्यालयाचा समावेश होतो. 'ब' क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत प्र.क्र. २४ मध्ये प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, अंदाजपत्रक -३ सन २०१६-१७ मध्ये पान क्र. ६०, अ.क्र.२१ वरती प्र.क्र.२४ (रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह) येथील रामकृष्ण मोरे नाटयगृहाचे नुतनीकरण करणे काम आहे. सदर कामास वास्तुविशारद मे. किमया आर्किटेक्ट यांची नेमणूक केलेली आहे. सदर कामास अंदाजपत्रकीय रक्कम रु. ८.७३ कोटी एवढी कमी पडत असल्याने वाढीव कामाची प्रशासकीय मान्यता आवश्यक आहे.

तरी सदर कामास सुधारित प्रशासकीय मान्यता १२.५० कोटी रक्कमेस देणेत यावी.

**मा.जयश्री गावडे** - मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन देतो.

**मा.सुलभाताई ऊबाळे** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते – सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पातील फ क्षेत्रीय कार्यालयाकडील प्रभाग क्र.११ यमुनानगर मध्ये संभाजीराजे क्रिडांगण परिसरातील उर्वरीत ठिकाणी रस्त्याचे कडेने पेव्हींग ब्लॉक बसविणेच्या कामास मा.महापालिका सभा ठराव ८५० दि.२०/०४/२०१६ अन्वये र.रु. ५०,००,०००/- प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार सदर कामाची निविदा काढून काम सुरु करण्यात आलेले आहे. परंतु यमुनानगर परिसरामध्ये अदयाप पर्यंत ब-याच ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविणेचे काम बाकी आहे. फेब्रुवारी २०१७ मध्ये महानगरपालिकेची निवडणूक असल्यामुळे यमुनानगर परिसरामध्ये बाकी असलेले पेव्हींग ब्लॉक बसविणे आवश्यक आहे.

सद्यस्थितीत पेव्हींग ब्लॉक बसविणेचे दुसरे काम नसल्यामुळे याच कामातून पेव्हींग ब्लॉक बसविणेचे काम करणेचे झाल्यास या कामाचे सुधारीत अंदाजपत्रकास र.रु.१,५०,००,०००/- ला सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

**मा.शारदा बाबर** - मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन देते.

**मा.आरती चोंधे** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते – प्रभाग क्र. ५४ पिंपळे निलख येथील रक्षक चौक ते भैरवनाथ मंदीर पर्यंतच्या मुख्य रस्त्याची सुधारणा करुन डांबरीकरण करणेचे काम सन २०१६-१७ चे अंदाजपत्रकात पान क्र. ४२, अनु.क्र.१४७ वर असुन

सदर कामास मा.महापालिका सभा ठराव क्र.८५०, दि.२०/०४/२०१६ अन्वये र.रु. २,००,००,०००/- (अक्षरी र.रु. दोन कोटी फक्त) इतकी प्रशासकीय मंजुरी मिळाली आहे.

सद्यस्थितीत सदरचा रस्ता १२.०० मी. रुंदीचा अस्तित्वात आहे. उर्वरीत रस्ता विकास आराखडयाप्रमाणे १८.०० रुंदीचा विकसीत करणेसाठीची आवश्यक जागा महानगरपालिकेने संरक्षण विभागास र.रु.१२,९४,६३,३५६/- (अक्षरी रक्कम रुपये बारा कोटी चौ-यान्नव लक्ष त्रेसष्ठ हजार तीनशे छप्पन फक्त) इतका मोबदला देऊन ताब्यात घेतलेली आहे. संरक्षण विभागाने ८ फुट उंचीची सिमाभिंत बांधुन दोन्ही बाजूने सब-वे करुन मिळणेच्या अटीस अधिन राहून सदरचे रस्त्याचे काम करणेसाठी परवानगी दिलेली आहे.

त्याअनुषंगाने सदर कामाअंतर्गत संरक्षण विभागाच्या अटीनुसार व आवश्यक बाबींचा समावेश करुन कामाचे अंदाजपत्रक तयार केले असून सुमारे र.रु.८,००,००,०००/- इतका अंदाजपत्रकीय खर्च अपेक्षित आहे. सदर कामास असलेली मुळ प्रशासकीय मान्यता र.रु.२,००,००,०००/- ही अपुरी पडत आहे. त्यामुळे सदर कामास मुळ प्रशासकीय मान्यता र.रु.२,००,००,०००/- + वाढीव प्रशासकीय मंजुरी र.रु.६,००,००,०००/- अशी एकूण र.रु.८,००,००,०००/- (अक्षरी र.रु.आठ कोटी फक्त) इतक्या रक्कमेस सुधारीत प्रशासकीय मान्यतेची आवश्यकता आहे.

तरी प्रभाग क्र. ५४ पिपळे निलख येथील रक्षक चौक ते भैरवनाथ मंदीर पर्यंतच्या मुख्य रस्त्याची सुधारणा करुन डांबरीकरण करणे या कामासाठी र.रु. २,००,००,०००/- (अक्षरी र.रु. दोन कोटी फक्त्) चे वाढीव खर्चासह एकूण र.रु. ८,००,००,०००/- (अक्षरी र.रु. आठ कोटी फक्त) इतक्या रक्कमेस सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

**मा.आशा शेंडगे** - मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन देते.

**मा.सदगुरु कदम**–मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो– मनपा अंदाजपत्रकातील स्थापत्य 'JNNURM केंद्रशासन योजना' या लेखाशिर्षाअंतर्गत पान क्र. ६२३ अ.क्र.१७ प्रभाग क्र. ४१ गांधीनगर मधील भागवतगीता वडार समाज मंदिरामध्ये काम करणे या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम चुकीने ०/- इतकी झाली असून त्याऐवजी सदर कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ४५,५०,०००/- इतकी समजण्यात येऊन प्रशासकीय मान्यता देणेत यावी. त्यानुसार सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता निविदा कार्यवाही करण्यात यावी. मनपा अंदाजपत्रकातील स्थापत्य 'JNNURM केंद्रशासन योजना' या लेखाशिर्षाअंतर्गत पान क्र. ६२३ अ.क्र.१८ प्रभाग क्र. ४० खराळवाडीमध्ये बालसंस्कार केंद्र व परिक्षा मार्गदर्शन केंद्र इमारत बांधणे या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम चुकीने ०/- इतकी झाली असून त्याऐवजी सदर

कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ४५,५०,०००/- ला प्रशासकीय मान्यता देणेत यावी. त्यानुसार सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता निविदा कार्यवाही करण्यात यावी.

**मा.प्रसाद शेट्टी** - मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन देतो.

**मा.आशा सूर्यवंशी** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते – मोशी प्रभागाचे भौगोलिक क्षेत्रफळ मोठे आहे. सदर प्रभागामध्ये ठिकठिकाणी, चौकामध्ये, गर्दीच्या ठिकाणी स्त्री-पुरुषासाठी स्वच्छता गृह बांधणे आवश्यक आहे. तसेच सदर कामाबाबत सदर भागातील नागरीकांची देखील मागणी आहे. सार्वजनिक स्वच्छता व आरोग्याच्या दृष्टीने स्त्री व पुरुषांसाठी ठिकठिकाणी शौचालयाच्या सुविधा पुरविणे आवश्यक आहे. केंद्र सरकारच्या स्वच्छ भारत अभियानांतर्गत देखील आशा प्रकारच्या सुविधा देणे आवश्यक व बंधनकारक आहे. या सर्व बाबींचा विचार करता तसेच सदर कामाची तातडीची गरज व आवश्यकता लक्षात घेता मे.सुलभ एंटरनॅशनल सोशल सर्व्हिस ऑर्गनाझेशन यांचे मार्फत सध्या चालू असलेल्या वरील विषयांकित कामातून (मोशी गावठाणातील जुना संडास ब्लॉक पाडून नविन सुलभ शौचालय पध्दतीने संडास ब्लॉक करणे. कामाची निविदा रक्कम रु.-४२,६१,०००/- सुधारीत प्रशासकीय मान्यता र.रु.- १,४८,००,०००/-) सदर वाढीव कामे करणेसाठी सदर कामास र.रु. १,४८,००,०००/- एवढी सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेस व त्या अनुषंगाने होणा-या वाढीव खर्चास मान्यता देणेत यावी. तसेच प्रभाग क्र.२० मध्ये बिजलीनगर रेल्वे लाईनच्या लगतच्या भागात सर्वांसाठी सार्वजनिक शौचालय बांधण्यास मान्यता देणेत यावी .

**मा.वैशाली जवळकर**- मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन देते.

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब,सर्व उपसूचना स्विकारल्या आहेत.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक – ९४७ विषय क्रमांक-८

दिनांक-२८.११.२०१६ विभाग-मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.सविता साळूंके व मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव-

२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.१७६६७ दि.४.१०.२०१६

प्रभाग क्र.४४ मधील साई चौक येथील जुनी मुतारी पाडून नवीन सुलभ पध्दतीने शौचालय करणेचे नियोजन आहे. तथापि २०१६-१७ चे अंदाजपत्रकात सदर कामाचा सामावेश नाही. सदयस्थितीत प्रभाग क्र. ४३ मध्ये कमला नेहरु शाळे लगत सुलभ पध्दतीने शौचालय बांधणेचे काम मे.सुलभ इन्टरनॅशनल सोशिएल सर्व्हिस ऑर्गनायझेशन यांचे मार्फत चालू आहे. सदर अंदापजत्रकास मा.महापालिका सभा ठराव क्र. ६६३ दि. ०६/०४/२०१५ अन्वये, र.रु. ४५,००,०००/- इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. प्रभाग क्र.४४ मधील साईचौक येथे नवीन सुलभ पध्दतीने शौचालय बांधणेचे कामाची अंदाजपत्रकीय र.रु.३०,१२,०००/- इतकी आहे.

तरी प्रभाग क्र. ४४ साई चौक येथील जुनी मुतारी पाडून नवीन सुलभ पध्दतीने शौचालय बांधणेकामी सध्या चालू असलेल्या प्रभाग क्र. ४३ कमला नेहरु शाळेलगत सुलभ शौचालय व मुतारी बांधणेचे कामास सध्याची प्रशासकीय मान्यता (र.रु. ४५,००,०००/-)+ नवीन कामाकरिता आवश्यक ती प्रशासकीय मान्यता (र.रु.३०,१२,०००/-) अशी एकूण र.रु.७५,१२,०००/- सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रभाग क्र.४५ पिंपरी वाघेरे आरक्षण क्र.१६७ मध्ये जलतरण तलावास चेंजिंग रूम व इतर सुविधा विषयक इमारत बांधणे व अनुषंगिक कामे करणेचे काम (निविदा क्र.०५/०१/२०१२-१३) सुरू आहे. सदर कामास र.रू.१,८०,००,०००/- इतकी प्रशासकीय मान्यता देणेत आलेली आहे.

सदर कामांतर्गत सदर इमारतीच्या सिमाभिंतीची उंची वाढविणे, इमारतीच्या परिसरात पेव्हींग ब्लॉक बसविणे, वॉचमन केबीन उभारणे, व इमारतीस ए.सी.पी. क्लॅडीग करणे, इत्यादी बाबींचा नव्याने समावेश करणे आवश्यक आहे. सदर सुधारीत करावयाच्या बाबींची अंदाजपत्रकीय र.रू.३६,००,०००/- इतकी येत असल्याने एकूण अंदाजपत्रकीय रक्कम रू.१,८०,००,०००/- + र.रू.३६,००,०००/- (वाढीव खर्च) = र.रू.२,१६,००,०००/- इतकी येत आहे. सदरचे काम २५.८१ % जादा दराने असल्याने सदर कामासाठी र.रू.२,१६,००,०००/- X १.२५८१ = २,७१,७४,९६०/- इतकी प्रशासकीय मान्यता आवश्यक आहे.

तरी प्रभाग क्र.४५ मधील पिंपरी वाघेरे आरक्षण क्र.१६७ मध्ये जलतरण तलावास चेंजिंग रूम व इतर सुविधा विषयक इमारत बांधणे व अनुषंगिक कामे करणेचे कामास एकूण र.रु.२,७२,००,०००/- (अक्षरी र.रू.दोन कोटी बहात्तर लाख) या खर्चास सुधारीत प्रशासकीय

मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रभाग क्र.२१ पांढरकर चाळी जवळ नवीन सार्वजनिक स्वच्छतागृहे (१६ सीट) सुलभ पध्दतीने बांधुन पुर्ण झाली आहेत त्या ठिकाणची पुर्वीची जुनी शौचालये (शाळेच्या प्रवेशव्दाराजवळची) पाडण्यास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच साई चौक रहाटणी येथे नाशिक फाटा ते वाकड व सांगवी ते किवळे या दोन बीआरटी रस्त्यांवर मोठया प्रमाणावर वाहतूकीची वर्दळ आहे. या चौकात प्रामुख्याने नाशिक फाटा, रहाटणी, पिंपरी,पिंपळेसौदागर पासून औंध, हिंजवडी, वाकड, डांगे चौकाकडे जाणा-या वाहनांस तसेच औंध वरुन डांगे चौक, रहाटणीकडे जाणा-या वाहनांस वाहतूक कोंडीमुळे खूप वेळ लागतो. या ठिकाणी सांगवी, किंवळे रस्त्यावर पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणामार्फत उड्डाणपूल बांधण्यात येणार आहे नाशिक फाटा, वाकड या रस्त्यावर साई चौक रहाटणी येथे वाहतूक कोंडी टाळण्यासाठी महानगरपालिके मार्फत ४४० मी. लांबीचा समतल वितलग (ग्रेड सेपरेटर) बांधणे आवश्यक आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकातील यु.टी.एफ. फंड या लेखाशिर्षातील पान क्र. ६२३ अनु.क्र.६ मनपा मेट्रो प्रकल्प या कामाच्या सन २०१६-१७ च्या र.रु. ५ कोटी तरतूदी पैकी र.रु. २ कोटी या कामासाठी तरतूद उपलब्ध होणे शक्य आहे. पुढील आर्थिक वर्षात ग्रेड सेपरेटरच्या कामासाठी महानगरपालिकेमार्फत आवश्यक तरतूद करण्याची कार्यवाही करावी तसेच या कामाच्या नावाचा समावेश महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकामध्ये करण्यासाठी र.रु. ४० कोटीचे अंदाजपत्रकीय रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. तसेच प्रभाग क्र. ५७ पिंपळे गुरव येथील डायनासोर उदयानासमोरील प्राथमिक शाळेचे विस्तारीकरण करणे व इतर अनुषंगिक कामे करणेचे काम सन २०१६-१७ चे अंदाजपत्रकात पान क्र. ६५, अनु.क्र.६५ वर असून सदर कामास मा.महापालिका सभा ठराव क्र. ८५०, दि.२०/०४/२०१६ अन्वये र.रु. ३,००,००,०००/- (अक्षरी र.रु. तीन कोटी फक्त) इतकी प्रशासकीय मंजुरी मिळाली आहे.

तथापि सद्या अस्तित्वात असलेल्या शाळा इमारतीवर एफ.एस.आय.च्या मर्यादेत राहून दोन मजले वाढविणेचे नियोजन असल्याने तसेच जुन्या इमारतीस आवश्यक ती दुरुस्ती करावी लागणार आहे. तसेच सदर कामाकरीता वास्तुविशारद (आर्किटेक्ट) यांची नेमणूक केलेली असून त्यांनी सदर कामाकरीता सुमारे र.रु.६,००,००,०००/- इतका अंदाजपत्रकीय खर्च येत असलेबाबत अंदाजपत्रक दिलेले आहे. त्यामुळे सदर कामास मुळ प्रशासकीय मान्यता र.रु.३,००,००,०००/- + वाढीव प्रशासकीय मंजुरी र.रु. ३,००,००,०००/- अशी एकूण र.रु. ६,००,००,०००/- (अक्षरी र.रु. सहा कोटी फक्त) इतक्या रक्कमेस सुधारीत प्रशासकीय मान्यतेची आवश्यकता आहे.

प्रभाग क्र.५७ पिंपळे गुरव येथील डायनासोर उदयानासमोरील प्राथमिक शाळेचे विस्तारीकरण करणे व इतर अनुषंगिक कामे करणे या कामासाठी र.रु. ३,००,००,०००/- (अक्षरी र.रु. तीन कोटी फक्त) चे वाढीव खर्चासह एकूण र.रु.६,००,००,०००/- (अक्षरी र.रु. सहा

कोटी फक्त) इतक्या रक्कमेस सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रभाग क्र. ५७ पिंपळेगुरव येथील आरक्षण क्र. ३४७ खेळाचे मैदान विकसित करणे, प्रेक्षक गॅलरी व व्यापारी गाळे विकसित करणे काम सन २०१६-१७ चे अंदाजपत्रकात पान क्र. ६७ अनु क्र. २३ वर असून सदर कामास मा.महापालिका सभा ठराव क्र. ८५०, दि.२०/०४/२०१६ अन्वये र.रु. ४,००,००,०००/- (अक्षरी र.रु. चार कोटी फक्त) इतकी प्रशासकीय मंजुरी मिळाली आहे.

तथापि सदरच्या कामाच्या नावात आरक्षण क्र. ३४४ व ३४४ अ खेळाचे मैदान उल्लेख करावयाचा राहून गेला असल्यामुळे त्याचा अंतर्भाव करणे आवश्यक असल्याने नावात दुरुस्ती करणेस सुधारीत मान्यता देणेत येत आहे.

तरी प्रभाग क्र. ५७ पिंपळे गुरव येथील आरक्षण क्र. ३४७ खेळाचे मैदान विकसित करणे, प्रेक्षक गॅलरी व व्यापारी गाळे विकसित करणे ऐवजी, प्रभाग क्र. ५७ पिंपळे गुरव येथील आरक्षण क्र. ३४७, ३४४ व ३४४ अ खेळाचे मैदान विकसित करणे, प्रेक्षक गॅलरी व व्यापारी गाळे विकसित करणे. कामाच्या नावास दुरुस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंतर्गत ब क्षेत्रीय कार्यालयाचा समावेश होतो. ‘ब’ क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत प्र.क्र. २४ मध्ये प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, अंदाजपत्रक -३ सन २०१६-१७ मध्ये पान क्र. ६०, अ.क्र.२१ वरती प्र.क्र.२४ (रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह) येथील रामकृष्ण मोरे नाटयगृहाचे नुतनीकरण करणे काम आहे. सदर कामास वास्तुविशारद मे. किमया आर्किटेक्ट यांची नेमणूक केलेली आहे. सदर कामास अंदाजपत्रकीय रक्कम रु. ८.७३ कोटी एवढी कमी पडत असल्याने वाढीव कामाची प्रशासकीय मान्यता आवश्यक आहे.

तरी सदर कामास सुधारित प्रशासकीय मान्यता १२.५० कोटी रक्कमेस देणेत येत आहे. तसेच सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पातील फ क्षेत्रीय कार्यालयाकडील प्रभाग क्र. ११ यमुनानगर मध्ये संभाजीराजे क्रिडांगण परिसरातील उर्वरीत ठिकाणी रस्त्याचे कडेने पेव्हींग ब्लॉक बसविणेच्या कामास मा.महापालिका सभा ठराव ८५० दि.२०/०४/२०१६ अन्वये र.रु. ५०,००,०००/- प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार सदर कामाची निविदा काढून काम सुरु करण्यात आलेले आहे. परंतु यमुनानगर परिसरामध्ये अदयाप पर्यंत ब-याच ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविणेचे काम बाकी आहे. फेब्रुवारी २०१७ मध्ये महानगरपालिकेची निवडणूक असल्यामुळे यमुनानगर परिसरामध्ये बाकी असलेले पेव्हींग ब्लॉक बसविणे आवश्यक आहे.

सद्यस्थितीत पेव्हींग ब्लॉक बसविणेचे दुसरे काम नसल्यामुळे याच कामातून पेव्हींग ब्लॉक बसविणेचे काम करणेचे झाल्यास या कामाचे सुधारीत अंदाजपत्रकास र.रु.१,५०,००,०००/- ला सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रभाग क्र. ५४ पिंपळे निलख येथील रक्षक चौक ते भैरवनाथ मंदीर पर्यंतच्या मुख्य रस्त्याची सुधारणा करुन डांबरीकरण करणेचे काम सन २०१६-१७ चे अंदाजपत्रकात पान क्र. ४२, अनु.क्र.१४७ वर असुन

सदर कामास मा.महापालिका सभा ठराव क्र.८५०, दि.२०/०४/२०१६ अन्वये र.रु. २,००,००,०००/- (अक्षरी र.रु. दोन कोटी फक्त) इतकी प्रशासकीय मंजुरी मिळाली आहे.

सद्यस्थितीत सदरचा रस्ता १२.०० मी. रुंदीचा अस्तित्वात आहे. उर्वरीत रस्ता विकास आराखडयाप्रमाणे १८.०० रुंदीचा विकसीत करणेसाठीची आवश्यक जागा महानगरपालिकेने संरक्षण विभागास र.रु.१२,९४,६३,३५६/- (अक्षरी रक्कम रुपये बारा कोटी चौ-यान्नव लक्ष त्रेसष्ठ हजार तीनशे छप्पन फक्त) इतका मोबदला देऊन ताब्यात घेतलेली आहे. संरक्षण विभागाने ८ फुट उंचीची सिमाभिंत बांधुन दोन्ही बाजूने सब-वे करुन मिळणेच्या अटीस अधिन राहून सदरचे रस्त्याचे काम करणेसाठी परवानगी दिलेली आहे.

त्याअनुषंगाने सदर कामाअंतर्गत संरक्षण विभागाच्या अटीनुसार व आवश्यक बाबींचा समावेश करुन कामाचे अंदाजपत्रक तयार केले असून सुमारे र.रु.८,००,००,०००/- इतका अंदाजपत्रकीय खर्च अपेक्षित आहे. सदर कामास असलेली मुळ प्रशासकीय मान्यता र.रु. २,००,००,०००/- ही अपुरी पडत आहे. त्यामुळे सदर कामास मुळ प्रशासकीय मान्यता र.रु. २,००,००,०००/- + वाढीव प्रशासकीय मंजुरी र.रु.६,००,००,०००/- अशी एकूण र.रु. ८,००,००,०००/- (अक्षरी र.रु.आठ कोटी फक्त) इतक्या रक्कमेस सुधारीत प्रशासकीय मान्यतेची आवश्यकता आहे.

तरी प्रभाग क्र.५४ पिंपळे निलख येथील रक्षक चौक ते भैरवनाथ मंदीर पर्यंतच्या मुख्य रस्त्याची सुधारणा करुन डांबरीकरण करणे या कामासाठी र.रु. २,००,००,०००/- (अक्षरी र.रु. दोन कोटी फक्त्) चे वाढीव खर्चासह एकूण र.रु. ८,००,००,०००/- (अक्षरी र.रु. आठ कोटी फक्त) इतक्या रक्कमेस सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच मनपा अंदाजपत्रकातील स्थापत्य 'JNNURM केंद्रशासन योजना' या लेखाशिर्षाअंतर्गत पान क्र. ६२३ अ.क्र.१७ प्रभाग क्र. ४१ गांधीनगर मधील भागवतगीता वडार समाज मंदिरामध्ये काम करणे या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम चुकीने ०/- इतकी झाली असून त्याऐवजी सदर कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ४५,५०,०००/- इतकी समजण्यात येऊन प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे त्यानुसार सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता निविदा कार्यवाही करण्यात यावी. तसेच मनपा अंदाजपत्रकातील स्थापत्य 'JNNURM केंद्रशासन योजना' या लेखाशिर्षाअंतर्गत पान क्र. ६२३ अ.क्र.१८ प्रभाग क्र. ४० खराळवाडीमध्ये बालसंस्कार केंद्र व परिक्षा मार्गदर्शन केंद्र इमारत बांधणे या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम चुकीने ०/- इतकी झाली असून त्याऐवजी सदर कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ४५,५०,०००/- ला प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे त्यानुसार सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता निविदा कार्यवाही करण्यात यावी. तसेच मोशी प्रभागाचे भौगोलिक क्षेत्रफळ मोठे आहे. सदर प्रभागामध्ये ठिकठिकाणी, चौकामध्ये, गर्दीच्या ठिकाणी स्त्री-पुरुषासाठी स्वच्छता गृह बांधणे आवश्यक आहे. तसेच सदर कामाबाबत सदर भागातील नागरीकांची देखील मागणी आहे. सार्वजनिक स्वच्छता व

आरोग्याच्या दृष्टीने स्त्री व पुरुषांसाठी ठिकठिकाणी शौचालयाच्या सुविधा पुरविणे आवश्यक आहे. केंद्र सरकारच्या स्वच्छ भारत अभियानांतर्गत देखील आशा प्रकारच्या सुविधा देणे आवश्यक व बंधनकारक आहे. या सर्व बाबींचा विचार करता तसेच सदर कामाची तातडीची गरज व आवश्यकता लक्षात घेता मे.सुलभ एंटरनॅशनल सोशल सर्व्हिस ऑर्गनाझेशन यांचे मार्फत सध्या चालू असलेल्या वरील विषयांकित कामातून (मोशी गावठाणातील जुना संडास ब्लॉक पाडून नविन सुलभ शौचालय पध्दतीने संडास ब्लॉक करणे. कामाची निविदा रक्कम रु.- ४२,६१,०००/- सुधारीत प्रशासकीय मान्यता र.रु.- १,४८,००,०००/-) सदर वाढीव कामे करणेसाठी सदर कामास र.रु. १,४८,००,०००/- एवढी सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेस व त्या अनुषंगाने होणा-या वाढीव खर्चास मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रभाग क्र. २० मध्ये बिजलीनगर रेल्वे लाईनच्या लगतच्या भागात सर्वांसाठी सार्वजनिक शौचालय बांधण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९वर पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक-९

दिनांक-२८.११.२०१६ विभाग-मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.सविता साळूंके व मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव-
२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.१७६६८ दि.४.१०.२०१६

मा.महापालिका सभा ठराव क्र. ९०९, दि. २०/०८/२०१६ मध्ये पुढील प्रमाणे दुरुस्ती करुन मान्यता देण्यात यावी. “मौजे पिंपरी मधिल पिंपरी कॅम्प येथे निर्वासितांची वसाहत सन १९४९ पासून अस्तित्वात आहे. सदरच्या वसाहतींचा व लगतचा परिसर हा अत्यंत दाटीवाटीचा असून येथील बांधकामे दाट घनतेची आहेत. त्यामुळे सदर वसाहतीचा विकास दाटवस्ती सदृश्य स्वरुपाचा आहे.” पिंपरी चिंचवड शहराच्या सुधारित मंजूर विकास योजना (जुनी हद्द) यामधिल मौजे पिंपरी मधिल पिंपरी कॅम्प येथे निर्वासितांच्या वसाहतीचे क्षेत्र दाटवस्ती क्षेत्र म्हणून दर्शविलेले नाही. विकास नियंत्रण नियमावलीतील बिगर दाटवस्तीच्या नियमानुसार पिंपरी कॅम्प येथिल निर्वासितांच्या वसाहतीचे विकसन करणे नियमाप्रमाणे शक्य होत नाही. पिंपरी चिंचवड शहराच्या सुधारित मंजूर विकास योजना (जुनी हद्द)

यामध्ये सदर पिंपरी कॅम्प येथिल निर्वासितांच्या वसाहतीचे व लगतचे क्षेत्र दाटवस्ती म्हणुन दर्शविल्यास दाटवस्तीच्या नियमानुसार तेथिल नागरिकांना बांधकाम परवानगी मिळू शकेल. सबब पिंपरी चिंचवड शहराच्या सुधारित मंजूर विकास योजना (जुनी हद्द) यामध्ये मौजे पिंपरी मधिल पिंपरी कॅम्प येथिल निर्वासितांच्या वसाहतीचे व लगतचे क्षेत्र सोबतच्या नकाशामध्ये दर्शिल्याप्रमाणे दाटवस्ती क्षेत्र म्हणून महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करण्यास आणि फेरबदलची सर्व वैधानिक कार्यवाही पुर्ण करुन फेरबदलचा प्रस्ताव शासनास मंजूरीसाठी सादर करणेकामी मा.आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्रधिकृत करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.अमिना पानसरे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

**मा.आशा शेंडगे** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते – मौजे फुगेवाडी मध्ये व त्याच्या आजुबाजूचे क्षेत्र हे दाटवस्तीचे क्षेत्र म्हणून दर्शविलेले नाही. पिंपरी चिंचवड शहराच्या सुधारीत मंजूर विकास योजना (जुनी हद्द) दर्शविलेले नाही. त्याचबरोबर पुणे-मुंबई रस्ता रुंदिकरणामुळे रहिवासी क्षेत्र कमी झालेले असून त्याठिकाणी विकास नियंत्रण नियमावलीनुसार विकसन करणे शक्य होत नाही त्यामुळे फुगेवाडी व त्या लगतचे क्षेत्र हे दाटवस्ती म्हणून दर्शविल्यास दाटवस्तीच्या नियमानुसार तेथील नागरिकांना बांधकाम परवानगी मिळू शकेल. सबब पिंपरी चिंचवड शहराच्या सुधारीत मंजूर विकास योजना (जूनी हद्द) मौजे फुगेवाडी व त्यालगतचे क्षेत्र हे दाट वस्ती क्षेत्र म्हणून महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करण्यास आणि फेरबदलाची सर्व वैधानिक कार्यवाही पुर्ण करुन फेरबदलचा प्रस्ताव शासनास मंजूरीसाठी सादर करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.सिमा सावळे** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.संदीप चिंचवडे** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो – सदर विषयांस अनुसरुन गांव मौजे चिंचवड येथील सर्व्हे नं.१ ब याठिकाणी अल्प उत्पन्नधारकांसाठी सहकारी गृहरचना संस्था आहेत. सदर ठिकाणी भाजी मंडई, पोलीसस्टेशन आहेत शेजारी गावठाण क्षेत्र आहे. या सर्व्हे नं. १ ब मधील सहकारी गृहरचना संस्थाना दाट लोकवस्ती (Congested Area) करीता असलेली बांधकाम परवानगी नियमावली लागू करण्यात यावी यासाठी सदर प्रस्तावास मान्यता देणेत यावी व सदरचा सर्व्हे नं.१ ब दाट लोकवस्ती म्हणून समावेश करण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.राजेंद्र जगताप** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारल्या आहेत.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक - ९४८ विषय क्रमांक-९
दिनांक-२८.११.२०१६ विभाग-मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.सविता साळूंके व मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव-
२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.१७६६८ दि.४.१०.२०१६

मा.महापालिका सभा ठराव क्र. ९०९, दि. २०/०८/२०१६ मध्ये पुढील प्रमाणे दुरुस्ती करुन मान्यता देण्यात यावी. “मौजे पिंपरी मधिल पिंपरी कॅम्प येथे निर्वासितांची वसाहत सन १९४९ पासून अस्तित्वात आहे. सदरच्या वसाहतींचा व लगतचा परिसर हा अत्यंत दाटीवाटीचा असून येथील बांधकामे दाट घनतेची आहेत. त्यामुळे सदर वसाहतीचा विकास दाटवस्ती सदृश्य स्वरुपाचा आहे.” पिंपरी चिंचवड शहराच्या सुधारित मंजूर विकास योजना (जुनी हद्द) यामधिल मौजे पिंपरी मधिल पिंपरी कॅम्प येथे निर्वासितांच्या वसाहतीचे क्षेत्र दाटवस्ती क्षेत्र म्हणून दर्शविलेले नाही. विकास नियंत्रण नियमावलीतील बिगर दाटवस्तीच्या नियमानुसार पिंपरी कॅम्प येथिल निर्वासितांच्या वसाहतीचे विकसन करणे नियमाप्रमाणे शक्य होत नाही. पिंपरी चिंचवड शहराच्या सुधारित मंजूर विकास योजना (जुनी हद्द) यामध्ये सदर पिंपरी कॅम्प येथिल निर्वासितांच्या वसाहतीचे व लगतचे क्षेत्र दाटवस्ती म्हणुन दर्शविल्यास दाटवस्तीच्या नियमानुसार तेथिल नागरिकांना बांधकाम परवानगी मिळू शकेल. सबब पिंपरी चिंचवड शहराच्या सुधारित मंजूर विकास योजना (जुनी हद्द) यामध्ये मौजे पिंपरी मधिल पिंपरी कॅम्प येथिल निर्वासितांच्या वसाहतीचे व लगतचे क्षेत्र सोबतच्या नकाशामध्ये दर्शिवल्याप्रमाणे दाटवस्ती क्षेत्र म्हणून महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करण्यास आणि फेरबदलची सर्व वैधानिक कार्यवाही पुर्ण करुन फेरबदलचा प्रस्ताव शासनास मंजूरीसाठी सादर करणेकामी मा.आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्रधिकृत करण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच मौजे फुगेवाडी मध्ये व त्याच्या आजुबाजूचे क्षेत्र हे दाटवस्तीचे क्षेत्र म्हणून दर्शविलेले नाही. पिंपरी चिंचवड शहराच्या सुधारीत मंजूर विकास योजना (जुनी हद्द) दर्शविलेले नाही. त्याचबरोबर पुणे-मुंबई रस्ता रुंदिकरणामुळे रहिवासी क्षेत्र कमी झालेले असून त्याठिकाणी विकास नियंत्रण नियमावलीनुसार विकसन करणे शक्य होत नाही त्यामुळे फुगेवाडी व त्या लगतचे क्षेत्र हे दाटवस्ती म्हणून दर्शविल्यास

दाटवस्तीच्या नियमानुसार तेथील नागरिकांना बांधकाम परवानगी मिळू शकेल. सबब पिंपरी चिंचवड शहराच्या सुधारीत मंजूर विकास योजना (जूनी हद्द) मौजे फुगेवाडी व त्यालगतचे क्षेत्र हे दाट वस्ती क्षेत्र म्हणून महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करण्यास आणि फेरबदलाची सर्व वैधानिक कार्यवाही पुर्ण करुन फेरबदलचा प्रस्ताव शासनास मंजूरीसाठी सादर करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच सदर विषयांस अनुसरुन गांव मौजे चिंचवड येथील सर्व्हे नं.१ ब याठिकाणी अल्प उत्पन्नधारकांसाठी सहकारी गृहरचना संस्था आहेत. सदर ठिकाणी भाजी मंडई, पोलीसस्टेशन आहेत शेजारी गावठाण क्षेत्र आहे. या सर्व्हे नं. १ ब मधील सहकारी गृहरचना संस्थाना दाट लोकवस्ती (Congested Area) करीता असलेली बांधकाम परवानगी नियमावली लागू करण्यात यावी यासाठी सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे व सदरचा सर्व्हे नं. १ ब दाट लोकवस्ती म्हणून समावेश करण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १०वर पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक-१०

दिनांक-२८.११.२०१६ विभाग-मा.आयुक्त

संदर्भ :-१) मा.सविता साळूंके व मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव-

२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.१७६६९ दि.४.१०.२०१६

महानगरपालिकेचे ड क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र.४४ मध्ये काँक्रीट रस्ते करणे या लेखाशिर्षकावर अंदाजपत्रक पान क्र.३५ अ.क्र.१५ व र.रु.१,००,०००/- (अक्षरी र.रु.एक लाख फक्त) इतकी तरतूद उपलब्ध असून त्याकामावर र.रु.५,०१,००,०००/- (र.रु.पाच कोटी एक लाख फक्त) इतका खर्च होणार असल्याने सोबतच्या प्रपत्र-अ नुसार संबंधित लेखाशिर्षकासमोर नमुद केलेप्रमाणे एकूण र.रु.५,००,००,०००/- (अक्षरी र.रु.पाच कोटी फक्त) तरतूद प्रभाग क्र.४४ मध्ये काँक्रीट रस्ते करणे या लेखाशिर्षकावर वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.नंदा ताकवणे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.नारायण बहिरवाडे** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो आहे – प्रभाग क्र. ४४ मध्ये काँक्रीट रस्ते करणेचे काम सन २०१६-१७ चे अंदाजपत्रकात पान क्र. ३५ अनु.क्र.१५ वर असुन सदर कामास मा.महापालिका सभा ठराव क्र. ६६३, दि.०६/०४/२०१६ अन्वये र.रु.१,००,००,०००/- (अक्षरी र.रु.एक कोटी फक्त) इतकी प्रशासकीय मंजुरी मिळाली आहे.

रस्त्याची पातळी ही अस्तित्वात असलेल्या घरांच्या, दुकानांच्या व मंदीरे यांच्या पातळीपेक्षा जास्त आहे. पावसाळा कालावधीत पावसाचे पाणी नागरिकांच्या घरामध्ये शिरत असलेबाबत नागरिकांच्या वारंवार तक्रारी या विभागास प्राप्त होत असून मा.नगरसदस्य यांनी सदरच्या रस्त्याची पातळी कमी करुन रस्ता काँक्रीटीकरण करुन मिळणेबाबत मागणी करीत आहेत. त्यामुळे रस्त्याची पातळी ही अस्तित्वात असलेल्या घरांच्या पातळीच्या समांतर करणेस व काँक्रीटीकरण करणेचे कामाकरीता एकूण र.रु.१६,००,००,०००/- (अक्षरी र.रु. सोळा कोटी फक्त) इतक्या रक्कमेची आवश्यकता आहे. मा.महापालिका सभा ठराव क्र. ६६३, दि.०६/०४/२०१६ अन्वये सदर कामासाठी मिळालेली र.रु.१,००,००,०००/- इतकी प्रशासकीय मंजुरी अपुरी असल्याने र.रु.१६,००,००,०००/- इतक्या रक्कमेस सुधारीत प्रशासकीय मान्यता घ्यावी लागणार आहे.

प्रभाग क्र. ४४ मध्ये काँक्रीट रस्ते करणे या कामासाठी र.रु.१५,००,००,०००/- (अक्षरी र.रु.पंधरा कोटी फक्त) चे वाढीव खर्चासह एकुण र.रु. १६,००,००,०००/- (अक्षरी र.रु. सोळा कोटी फक्त) इतक्या रक्कमेस सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

ड क्षेत्रीय कार्यकक्षेतील वाकड उपविभागातील वार्ड क्र ४८, ५४ ते ५७ या परिसरात होणा-या रस्ता दुभाजकात दिवाबत्ती व्यवस्था करणे व आनुषंगिक कामे करणे या कामास तरतूद अपूरी असल्याने सदर कामास मा. स्थायी समिती सभा ठराव क्र. १७३९५ दि.२०/०९/२०१६ अन्वये सन्मा. सदस्य पारीत ठरावानुसार खालीलप्रमाणे तरतूद वर्ग करणेस मंजूरी दिलेली आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | लेखाशीर्ष | पृष्ठ क्र. / अ.क्र. | २०१६-१७ ची मुळ तरतूद | वाढ | घट | सुधारित तरतूद २०१६-१७ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | वाकड उपविभागातील वार्ड क्र ४८, ५४ ते ५७ या परिसरात होणा-या रस्ता दुभाजकात दिवाबत्ती व्यवस्था करणे व आनुषंगिक कामे करणे. | सार्वजनिक सुरक्षितता (ड प्रभाग विद्युत) | ३८५ /४७ | १०००० | १५००००० | ० | १५१०००० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | प्रभाग क्र. ५६ वैदूवस्ती जवळकरनगर येथील खेळाचे मैदान आरक्षणामध्ये विविध प्रकारच्या खेळाच्या खेळपट्ट्या विकसित करणे. | स्थापत्य विशेष योजना | ६५/ ६४ | २००००००० | ० | १५००००० | १८५००००० |
| | | | एकूण | २००१०००० | १५००००० | १५००००० | २००१०००० |

तरी वरील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे ड क्षेत्रीय कार्यकक्षेतील वाकड उपविभागातील वार्ड क्र ४८,५४ ते ५७ या परिसरात होणा-या रस्ता दुभाजकात सांगवी फाटा येथील पूल प्रकल्पाच्या कामामध्ये बसविलेल्या एलईडी दिव्यांच्या खांबाप्रमाणेच रंगीत दिवाबत्तीचे खांब उभे करून दिवाबत्ती व्यवस्था करणे व आनुषंगिक कामे करणे या कामासाठी तरतूद वर्गीकरणास मान्यता देणेत यावी. तसेच प्रभाग क्र.१०१ फुगेवाडी येथील लोकमान्य टिळक शाळेच्या जुन्या इमारतीत फेरफार करुन नवीन शाळा इमारत बांधणे व स्थापत्य विषयक अनुषंगिक कामे करण्याचे काम चालु आहे. सदर कमाचे मनपा अंदाजपत्रकामध्ये सन २०१६-१७ मधील विशेष योजना अंतर्गत याच शाळेचे भाग-२ चे कामाचे तरतूद उपलब्ध आहे. तरी काम एकच असल्याने कामाचा खर्च भाग-१ या कामावर होणार असल्याने विशेष योजना लेखाशिर्ष तरतुद पान क्रं. व अनु. क्रं.१९/१४ र.रु.८०,००,०००/- मधील र.रु. ७०,००,०००/- व पान क्रं. व अनु क्रं. १९/१५ र.रु.८०,००,०००/- मधील र.रु.७०,००,०००/- प्राथमिक व दुय्यम शिक्षण पान क्रं. ५८९ व अ.क्र.३ या कामावर वर्गीकरण करणे आवश्यक आहे. सदर कामाचे वर्गीकरणाकरिता मा.स्थायी समिती ठराव क्र.१८०६५ दि.१५/१०/२०१६ नुसार मान्यता मिळाली आहे. सदर वर्गीकरण लेखाशिर्षनिहाय असल्याने मा.स्थायी समितीचे वर्गीकरणाचे ठरावास मान्यता देणेत यावी. तसेच सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता अंमलबजावणी करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.तानाजी खाडे** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.अतुल शितोळे** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो - प्रभाग क्र. ५९ मध्ये पाणीपुरवठा जलनि:सारण विदयूत व स्थापत्य विभागाचे एकत्रित कॉंक्रीट रस्त्यांचे काम चालू आहे सदर कामाचे मनपा अंदाजपत्रकामध्ये सन २०१६-१७ मधील एकत्रित कामाच्या सोयीने तरतूद विभागनिहाय उपलब्ध केली होती. तरी कामाची निविदा एकच असल्याने व कामाचा खर्च एकत्रित होणार असल्याने जल:निसारण विभागाकडील तरतूद पान क्र.५२७/७१

र.रु.१,२०,००,०००/- स्थापत्य विभागाकडील पान क्र.१५७/४९ या कामावर वर्गीकरण करणे आवश्यक आहे. सदर कामाचे वर्गीकरणाकरिता मा.स्थायी समिती ठराव क्र.१८०७४ दि.१५/१०/२०१६ नुसार मान्यता मिळाली आहे. सदर वर्गीकरण विभागनिहाय असल्याने मा.स्थायी समितीचे वर्गीकरणाचे ठरावास मान्यता देणेत यावी.

**मा.दत्ता साने** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.दत्ता साने** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, या विषयात ज्या लेखाशिर्षातून वर्गीकरण केले आहे ते – चिखली गाव स्मशानभूमी हा निधी आमच्या प्रभागातून वर्ग होणार आहे. या विषयाला माझा विरोध आहे. चार नंबरचा चिखलीचा विषय सोडून आमचा निधी वर्ग करायचा प्रयत्न केला आहे. या विषयाला माझा विरोध आहे. मी तसे अधिकृत पत्र दिले आहे.

**मा.वैशाली काळभोर**–मा.महापौर साहेब,उपसूचना स्विकारल्या आहेत.

**मा.महापौर** – मा.दत्ता साने यांचा विरोध नोंदवून उपसूचनांसह हा विषय मंजूर करण्यात येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक – ९४९ विषय क्रमांक-१०
दिनांक-२८.११.२०१६ विभाग-मा.आयुक्त

संदर्भ :-१) मा.सविता साळूंके व मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव-
२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.१७६६९ दि.४.१०.२०१६

महानगरपालिकेचे ड क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र. ४४ मध्ये काँक्रीट रस्ते करणे या लेखाशिर्षकावर अंदाजपत्रक पान क्र.३५ अ.क्र. १५ वर र.रु.१,००,०००/- (अक्षरी र.रु.एक लाख फक्त) इतकी तरतूद उपलब्ध असून त्याकामावर र.रु.५,०१,००,०००/- (र.रु.पाच कोटी एक लाख फक्त) इतका खर्च होणार असल्याने सोबतच्या प्रपत्र-अ नुसार संबंधित लेखाशिर्षकासमोर नमुद केलेप्रमाणे एकूण र.रु.५,००,००,०००/- (अक्षरी र.रु.पाच

कोटी फक्त) तरतूद प्रभाग क्र.४४ मध्ये कॉंक्रीट रस्ते करणे या लेखाशिर्षकावर वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रभाग क्र. ४४ मध्ये कॉंक्रीट रस्ते करणेचे काम सन २०१६-१७ चे अंदाजपत्रकात पान क्र.३५ अनु.क्र.१५ वर असुन सदर कामास मा.महापालिका सभा ठराव क्र. ६६३, दि.०६/०४/२०१६ अन्वये र.रु.१,००,००,०००/- (अक्षरी र.रु.एक कोटी फक्त) इतकी प्रशासकीय मंजुरी मिळाली आहे.

रस्त्याची पातळी ही अस्तित्वात असलेल्या घरांच्या, दुकानांच्या व मंदीरे यांच्या पातळीपेक्षा जास्त आहे. पावसाळा कालावधीत पावसाचे पाणी नागरिकांच्या घरामध्ये शिरत असलेबाबत नागरिकांच्या वारंवार तक्रारी या विभागास प्राप्त होत असून मा.नगरसदस्य यांनी सदरच्या रस्त्याची पातळी कमी करुन रस्ता कॉंक्रीटीकरण करुन मिळणेबाबत मागणी करीत आहेत. त्यामुळे रस्त्याची पातळी ही अस्तित्वात असलेल्या घरांच्या पातळीच्या समांतर करणेस व कॉंक्रीटीकरण करणेचे कामाकरीता एकूण र.रु.१६,००,००,०००/- (अक्षरी र.रु. सोळा कोटी फक्त) इतक्या रक्कमेची आवश्यकता आहे. मा.महापालिका सभा ठराव क्र. ६६३, दि.०६/०४/२०१६ अन्वये सदर कामासाठी मिळालेली र.रु.१,००,००,०००/- इतकी प्रशासकीय मंजुरी अपुरी असल्याने र.रु.१६,००,००,०००/- इतक्या रक्कमेस सुधारीत प्रशासकीय मान्यता घ्यावी लागणार आहे.

प्रभाग क्र.४४ मध्ये कॉंक्रीट रस्ते करणे या कामासाठी र.रु.१५,००,००,०००/- (अक्षरी र.रु.पंधरा कोटी फक्त) चे वाढीव खर्चासह एकुण र.रु.१६,००,००,०००/- (अक्षरी र.रु.सोळा कोटी फक्त) इतक्या रक्कमेस सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच ड क्षेत्रीय कार्यकक्षेतील वाकड उपविभागातील वार्ड क्र.४८,५४ ते ५७ या परिसरात होणा-या रस्ता दुभाजकात दिवाबत्ती व्यवस्था करणे व आनुषंगिक कामे करणे या कामास तरतूद अपूरी असल्याने सदर कामास मा. स्थायी समिती सभा ठराव क्र.१७३९५ दि.२०/०९/२०१६ अन्वये सन्मा. सदस्य पारीत ठरावानुसार खालीलप्रमाणे तरतूद वर्ग करणेस मंजूरी दिलेली आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | लेखाशीर्ष | पृष्ठ क्र. / अ.क्र. | २०१६-१७ ची मुळ तरतूद | वाढ | घट | सुधारित तरतूद २०१६-१७ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | वाकड उपविभागातील वार्ड क्र ४८, ५४ ते ५७ या परिसरात होणा-या रस्ता दुभाजकात दिवाबत्ती व्यवस्था करणे व आनुषंगिक कामे करणे. | सार्वजनिक सुरक्षितता (ड प्रभाग विद्युत) | ३८५ /४७ | १०००० | १५००००० | ० | १५१०००० |
| २ | प्रभाग क्र. ५६ वैदूवस्ती जवळकरनगर येथील खेळाचे मैदान | स्थापत्य विशेष योजना | ६५/ ६४ | | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | आरक्षणामध्ये विविध प्रकारच्या खेळाच्या खेळपट्ट्या विकसित करणे. | | | २००००००० | ० | १५००००० | १८५००००० |
| | | | एकूण | २००१०००० | १५००००० | १५००००० | २००१०००० |

तरी वरील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे ड क्षेत्रीय कार्यकक्षेतील वाकड उपविभागातील वार्ड क्र ४८,५४ ते ५७ या परिसरात होणा-या रस्ता दुभाजकात सांगवी फाटा येथील पूल प्रकल्पाच्या कामामध्ये बसविलेल्या एलईडी दिव्यांच्या खांबाप्रमाणेच रंगीत दिवाबत्तीचे खांब उभे करून दिवाबत्ती व्यवस्था करणे व आनुषंगिक कामे करणे या कामासाठी तरतूद वर्गीकरणास मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रभाग क्र.१०१ फुगेवाडी येथील लोकमान्य टिळक शाळेच्या जुन्या इमारतीत फेरफार करुन नवीन शाळा इमारत बांधणे व स्थापत्य विषयक अनुषंगिक कामे करण्याचे काम चालु आहे. सदर कमाचे मनपा अंदाजपत्रकामध्ये सन २०१६-१७ मधील विशेष योजना अंतर्गत याच शाळेचे भाग-२ चे कामाचे तरतूद उपलब्ध आहे. तरी काम एकच असल्याने कामाचा खर्च भाग-१ या कामावर होणार असल्याने विशेष योजना लेखाशिर्ष तरतुद पान क्रं. व अनु. क्रं.१९/१४ र.रु. ८०,००,०००/- मधील र.रु. ७०,००,०००/- व पान क्रं. व अनु क्रं. १९/१५ र.रु. ८०,००,०००/- मधील र.रु. ७०,००,०००/- प्राथमिक व दुय्यम शिक्षण पान क्रं. ५८९ व अ.क्र.३ या कामावर वर्गीकरण करणे आवश्यक आहे. सदर कामाचे वर्गीकरणाकरिता मा.स्थायी समिती ठराव क्र.१८०६५ दि.१५/१०/२०१६ नुसार मान्यता मिळाली आहे. सदर वर्गीकरण लेखाशिर्षनिहाय असल्याने मा.स्थायी समितीचे वर्गीकरणाचे ठरावास मान्यता देणेत येत आहे तसेच सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता अंमलबजावणी करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रभाग क्र. ५९ मध्ये पाणीपुरवठा जलनि:सारण विदयूत व स्थापत्य विभागाचे एकत्रित काँक्रीट रस्त्यांचे काम चालू आहे सदर कामाचे मनपा अंदाजपत्रकामध्ये सन २०१६-१७ मधील एकत्रित कामाच्या सोयीने तरतूद विभागनिहाय उपलब्ध केली होती. तरी कामाची निविदा एकच असल्याने व कामाचा खर्च एकत्रित होणार असल्याने जल:निसारण विभागाकडील तरतूद पान क्र. ५२७/७१ र.रु. १,२०,००,०००/- स्थापत्य विभागाकडील पान क्र. १५७/४९ या कामावर वर्गीकरण करणे आवश्यक आहे. सदर कामाचे वर्गीकरणाकरिता मा.स्थायी समिती ठराव क्र. १८०७४ दि.१५/१०/२०१६ नुसार मान्यता मिळाली आहे. सदर वर्गीकरण विभागनिहाय असल्याने मा.स्थायी समितीचे वर्गीकरणाचे ठरावास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-८० प्रतिकूल- ०१

अशी मते पडली व सदर ठराव बहुमताने मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११वर पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक-११

दिनांक-२८.११.२०१६ विभाग-मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.सविता साळूंके व मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव-
२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.१७६७० दि.४.१०.२०१६

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. सन २०१५-१६ पासून "इतर कल्याणकारी योजना" या विभागामार्फत राबविण्यात येत आहेत. या योजनेअतंर्गत खुल्या प्रवर्गातील विद्यार्थी/विद्यार्थीनींकरीता योजना राबविण्यात येत आहेत. सध्याच्या योजनांशिवाय समाजातील सर्व स्तरातील विद्यार्थी, विद्यार्थीनींना शिष्यवृत्ती आणि उच्च शिक्षणाकरिता बँकेकडील कर्ज उपलब्ध होणेचे दृष्टीने सोबतचे प्रपत्र "अ" नुसार योजना " इतर कल्याणकारी" योजनेअंतर्गत राबविण्याकरिता मान्यता देणेकामी तसेच खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिताची तरतूद "इतर कल्याणकारी योजना" खुल्या प्रवर्गातील विद्यार्थीनीकरिताची तरतूद "महिलांकरिता योजना" आणि मागास घटकातील विद्यार्थांकरिता (SC,ST,VJNT) "मागासवर्गीय कल्याणकारी योजना" या लेखाशिर्षावरील तरतूदीतून करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.अमिना पानसरे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

**मा.सविता साळुंके** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते आहे – नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत SC,ST,VJNT या प्रवर्गातील मागासवर्गीय विद्यार्थी, महिला, युवकांचे करिता विविध योजना राबविण्यात येतात. या योजनांकरिता अर्जदाराचा जातीचा दाखला आवश्यक असल्याने अनेक होतकरु लाभार्थीना या योजनांचा लाभ घेता येत नाही. त्यामुळे मागासवर्गीय कल्याणकारी योजनांतर्गत राबविल्या जाणा-या सर्व योजनांकरिता अर्जदाराच्या जातीच्या दाखल्या ऐवजी अर्जदाराच्या किंवा अर्जदाराच्या वडीलांचा जातीच्या दाखल्याची प्रत किंवा अर्जदाराच्या शाळा सोडल्याच्या दाखल्याची प्रत आवश्यक राहील. याप्रमाणे मागासवर्गीय कल्याणकारी योजनेअंतर्गत सर्व योजनांकरिता अर्हता निश्चित करण्यास मान्यता देण्यात यावी. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील निराधार ज्येष्ठ नागरिकांना पुणे महानगरपालिकेच्या धर्तीवर अर्थसहाय्यांची योजना प्रपत्र अ नुसार राबविण्यास मा.आयुक्त पिंपरी चिंचवड मनपा यांना अधिकार प्रदान करण्यास मान्यता देणेत

यावी. तसेच प्रभाग क्र.२१ मध्ये नविन अभ्यासिका व स्पर्धापरीक्षा केंद्र सुरु करणे यासाठी वरील योजनेतून तरतूद देणेस मान्यता देणेत यावी.

**मा.सुमन नेटके** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, सर्व उपसूचना स्विकारल्या आहेत.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता –

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक – ९५० | विषय क्रमांक-११ |
| दिनांक-२८.११.२०१६ | विभाग-मा.आयुक्त |

संदर्भ :- १) मा.सविता साळूंके व मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव-
२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.१७६७० दि.४.१०.२०१६

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. सन २०१५-१६ पासून “इतर कल्याणकारी योजना” या विभागामार्फत राबविण्यात येत आहेत. या योजनेअतंर्गत खुल्या प्रवर्गातील विद्यार्थी/ विद्यार्थीनींकरीता योजना राबविण्यात येत आहेत. सध्याच्या योजनांशिवाय समाजातील सर्व स्तरातील विद्यार्थी, विद्यार्थीनींना शिष्यवृत्ती आणि उच्च शिक्षणाकरिता बँकेकडील कर्ज उपलब्ध होणेचे दृष्टीने सोबतचे प्रपत्र “अ” नुसार योजना “इतर कल्याणकारी” योजनेअंतर्गत राबविण्याकरिता मान्यता देणेकामी तसेच खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिताची तरतूद “इतर कल्याणकारी योजना” खुल्या प्रवर्गातील विद्यार्थीनीकरिताची तरतूद “महिलांकरिता योजना” आणि मागास घटकातील विद्यार्थांकरिता (SC,ST,VJNT) “मागासवर्गीय कल्याणकारी योजना” या लेखाशिर्षावरील तरतूदीतून करण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत SC,ST,VJNT या प्रवर्गातील मागासवर्गीय विद्यार्थी, महिला, युवकांचे करिता विविध योजना राबविण्यात येतात. या योजनांकरिता अर्जदाराचा जातीचा दाखला आवश्यक असल्याने अनेक होतकरु लाभार्थीना या योजनांचा लाभ घेता येत नाही. त्यामुळे मागासवर्गीय कल्याणकारी योजनांतर्गत राबविल्या जाणा-या सर्व योजनांकरिता अर्जदाराच्या

जातीच्या दाखल्या ऐवजी अर्जदाराच्या किंवा अर्जदाराच्या वडीलांचा जातीच्या दाखल्याची प्रत किंवा अर्जदाराच्या शाळा सोडल्याच्या दाखल्याची प्रत आवश्यक राहील. याप्रमाणे मागासवर्गीय कल्याणकारी योजनेअंतर्गत सर्व योजनांकरिता अर्हता निश्चित करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील निराधार ज्येष्ठ नागरिकांना पुणे महानगरपालिकेच्या धर्तीवर अर्थसहाय्यांची योजना प्रपत्र अ नुसार राबविण्यास मा.आयुक्त पिंपरी चिंचवड मनपा यांना अधिकार प्रदान करण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रभाग क्र. २१ मध्ये नविन अभ्यासिका व स्पर्धापरीक्षा केंद्र सुरु करणे यासाठी वरील योजनेतून तरतूद देणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १२वर पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक – ९५१ विषय क्रमांक-१२

दिनांक-२८.११.२०१६ विभाग-मा.आयुक्त

संदर्भ -१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.
स्वभाअक/३/कावि/६/२०१६ दिनांक ४/१०/२०१६

देशातील सर्व शहरांमधील नागरिकांना स्वच्छ पर्यावरण व चांगले आरोग्य मिळावे या करीता शहरांना स्वच्छतेची आणि या शहरातील व सर्व नागरिकांना शौचालयाची सुविधा उपलब्ध करून देण्याचे ध्येय गाठण्यासाठी केंद्रशासनाने स्वच्छ भारत अभियान संपूर्ण देशामध्ये राबविण्याची घोषणा दि.२/१०/२०१४पासून केलेली आहे. महाराष्ट्र शासनाने देखील केंद्र शासनाच्या “स्वच्छ भारत अभियान”च्या धर्तीवर राज्यामध्ये “स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)” राबविणेबाबत नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र. स्वभाअ/२०१५/ प्र.क्र.२३/नवि/३४, दि.१५/५/२०१५ अन्वये कळविणेत आलेले आहे. तसेच या अभियानाचे अनुषंगाने केंद्र व राज्य शासनाचे हिस्स्याची रक्कम (अनुदान) क्र.स्वमअ-२०१५/प्र.क्र.४०/नवि-३४ दि.१४/८/२०१५ अन्वये निर्गत करणेत आलेली आहे.

सदर अभियानाचे अनुषंगाने शहरातील ज्या कुटुंबाकडे स्वत:चे स्वतंत्र शौचालयनाही त्यांचेकरिता शौचालय उभारणेसाठी निधी उपलब्ध करून शहर हागंदारी मुक्त करणे (Open Defecation Free) हा या अभियानाचा मुळ उद्देश आहे. राष्ट्रीय जनगणना २०११ नुसार पिंपरी

चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील एकूण११,६८४ कुटुंबे अभियानांतर्गत वैयक्तीक शौचालय उभारणी करीता निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. नगर विकास विभाग मंत्रालय, मुंबई - ३२ यांचे कडील प्राप्त पत्र क्र.स्वमअ-२०१५/प्र.क्र.४०/नवि-३४, नगर विकास विभाग दि.१७/८/२०१५ व शासन निर्णय क्र.स्वमअ २०१६/प्र.क्र.१३/२०१६-१७ दि. १३/०६/२०१६ अन्वये सदर अभियानाचे अनुषंगाने केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून खालील प्रमाणे अनुदान प्राप्त झाले आहे.

**स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) केंद्रशासन व राज्य शासन हिस्सा वाटप तक्ता**

| क्र | तपशील | केंद्र शासन अनुदान | राज्य शासन अनुदान |
|---|---|---|---|
| १ | वैयक्तिक घरगुती शौचालय | १,२४,९६,०००/- | २,४९,९२,०००/- |
| २ | सामुदायिक शौचालय | ३४,६७,०००/- | ११,५६,०००/- |
| ३ | स्वच्छ महाराष्ट्रअभियानाचे ब्रँडिंग (माहिती, शिक्षण व प्रसार आणि जन जागृती) | ५,९०,०००/- | १,९७,०००/- |
| ४ | क्षमताबांधणी | १,५०,०००/- | ४६,०००/- |
| ५ | **एकूण** | **१,६७,०३,०००/-** | **२,६३,९१,००० /-** |
| | | **केंद्रशासन व राज्य शासन एकूणअनुदान** | **४,३०,९४,०००/-** |

वरील प्रमाणे प्राप्त अनुदान व मनपा हिस्सा यामधून प्रत्येत लाभार्थीस केंद्र शासनाचे र.रु ४०००/-, राज्य शासनाचे र.रु.८०००/- व मनपा हिस्सा र.रु.४०००/-याप्रमाणे वैयक्तिक घरगुती शौचालय बांधणेसाठी अनुदानाची रक्कम अदा करणेत येईल.

त्यानुसार सदर अभियान सुरु झालेपासून दिनांक ३०/०९/२०१६अखेरसोबत सादर केलेले प्रपत्र "अ "प्रमाणे कामकाज झालेले आहे.शासन निर्णय क्र.स्वभाअ/२०१५/प्र.क्र.२४९/नवि-३४, दिनांक१९/११/२०१५ अन्वये "नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढावा घेण्याची बाब संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्रत्येक महिन्याच्या सर्व साधारण सभेच्या विषय सूचीवर कायम स्वरूपी समावेश करून या विषयाचा सविस्तर आढावा सर्व साधारण सभेमध्ये घेण्यात यावा " असे कळविलेले आहे.तसेच स्वच्छ भारत अभियानासाठी मा. पंतप्रधान यांनी महाराष्ट्र राज्याकरिता नामनिर्देशित केलेल्या खेलरत्न व अर्जुन पुरस्कार विजेत्या नेमबाज अंजली भागवत यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेसाठी ब्रॅन्ड अम्बॅसिडर म्हणून नियुक्ती केलेली आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत महापालिकेने दिनांक ३०/०९/२०१६ अखेर केलेल्या कार्यवाहीची माहिती खालील प्रमाणे

**प्रपत्र “अ”**

| **महानगरपालिकेचे नाव** | | **पिंपरी चिंचवड महानगरपालिका** | **शेरा** |
| --- | --- | --- | --- |
| जिल्हा | | पुणे | |
| वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अर्ज केलेल्या कुटुंबांची संख्या | | ६३१२ | |
| केंद्र शासनाचे “स्वच्छ भारत अभियान”च्या संकेत स्थळावर अपलोड करणेत आलेल्या एकूण अर्जांची संख्या | | ५८८७ | |
| मंजूर अर्जांची एकूण संख्या | | ३९९९ | |
| बांधकाम सुरु झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुतीशौचालय | ३४३६ | |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुती शौचालय | २७८४ | |
| बांधकाम सुरु झालेल्या शौचालयांची संख्या | सामुदायिक शौचालय | ३६१ सीटस | |
| निर्गत करणेत आलेला पहिलाहप्ता | ३९४४ लाभार्थी | GOI+GOM=२३६.६४ लाख | GOI =२०००/- व GOM= ४०००/- हिस्सा |
| | | ULB = ७८.८८ लाख | ULB = २०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **३१५.५२ लाख** | |
| निर्गत करणेत आलेला दुसरा हप्ता | १९८२ लाभार्थी | GOI+GOM=११८.९२ लाख | GOI =२०००/- व GOM= ४०००/- हिस्सा |
| | | ULB = ३९.६४ लाख | ULB = २०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **१५८.५६ लाख** | |

सबब, महापालिकेकडून राबविणेत येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंमलबजावणीचा आढावा अवलोकन करणेत येत आहे.

**मा.अमिना पानसरे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १३वर पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक-१३

दिनांक-२८.११.२०१६ विभाग-मा.आयुक्त

संदर्भ -१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.
स्था/बीआरटीएस/८१३/२०१६ दिनांक ४ /१०/२०१६

सांगवी किवळे हा रस्ता महानगरपालिकेने विकसीत केला असून या मार्गावर सार्वजनिक बीआरटी बस वाहतुक सुरु करण्यात आलेली आहे. या रस्त्यावरील कावेरी नगर या ठिकाणी सबवे बांधणेची मागणी या भागातील मा. नगरसदस्यांनी केली आहे. तसेच या कामासाठी दि. ११ ऑगस्ट २०१६ रोजी रस्ता रोको आंदोलनही करण्यात आले आहे. तसेच याठिकाणी चौक असल्यामुळे लहानमोठे अपघात वारंवार घडत असतात त्यामुळे या ठिकाणी नागरीकांच्या सुरक्षिततेसाठी व वाहनांची रहदारी सुरळीत होण्यासाठी सबवे बांधणे आवश्यक आहे.

त्यानुसार सदर जागेची पाहणी करुन सा.बां.विभाग सन २०१६-१७ व मान्य दरपृथ:करणानुसार सदर कामाचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे. एस.एन.भोबे यांनी सविस्तर अंदाजपत्रक तयार केले असून अंदाजपत्रकीय रक्कम रु.६,५०,००,०००/- इतकी येत आहे. तसेच सदर ठिकाणच्या EHV पायलॉनची उंची वाढविणे व नविन पायलॉन उभारणे या कामी र.रु. १,६०,००,०००/- खर्च येणार आहे. त्यामुळे कावेरीनगर येथे सबवे बांधणेकामी विद्युत खर्चासह र.रु.८,१०,००,०००/- इतका खर्च येणार आहे. तथापि, मनपाचे सन २०१६-१७ चे अंदाजपत्रकातील पान क्र. ५७ अनु.क्र. १९३ अन्वये कामास र.रु.४,००,००,०००/- इतक्या अंदाजपत्रकीय रक्कमेस महापालिका सभा ठराव क्र.८५० दिनांक २०/४/२०१६ अन्वये प्रशासकिय मान्यता मिळाली आहे. सदर कामाची निविदा प्रसिध्द करणेकामी र.रु.८,१०,००,०००/- या रक्कमेस मा. महापालिका सभेची प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे.

विषयांकित कामाची अंदाजपत्रकीय र.रु.८,१०,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

**मा.भारती फरांदे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

**मा.तानाजी खाडे** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो - मनपा अंदाजपत्रकातील स्थापत्य 'विशेष योजना' या लेखाशिर्षा अंतर्गत पान क्र. १९ अ.क्र.१५ कासारवाडी येथे नवीन शाळा इमारत बांधणे या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम १,६०,००,०००/- इतकी असून त्याऐवजी सदर कामास रक्कम रुपये १२,००,००,०००/- (अक्षरी र.रु.बारा कोटी) एवढया रकमेस प्रशासकीय मान्यता देणेत यावी. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता निविदा कार्यवाही करणेस मान्यता देणेत यावी. तसेच मनपा अंदाजपत्रकातील स्थापत्य 'विशेष योजना' या लेखाशिर्षा अंतर्गत पान क्र.१९ अ.क्र.१४ प्रभाग क्र.६२ फुगेवाडी मधील लोकमान्य टिळक शाळेच्या इमारतीत फेरफार करुन नवीन शाळा इमारत बांधणे व स्थापत्य विषयक अनुषंगिक कामे करणे भाग-२ या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम १,६०,००,०००/- इतकी असून त्याऐवजी सदर कामास रक्कम रुपये ४,३०,००,०००/- एवढया रकमेस प्रशासकीय मान्यता देणेत यावी. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता निविदा कार्यवाही करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.दत्ता साने** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता –

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक – ९५२ | विषय क्रमांक-१३ |
| दिनांक-२८.११.२०१६ | विभाग-मा.आयुक्त |

संदर्भ -१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.
स्था/बीआरटीएस/८१३/२०१६ दिनांक ४ /१०/२०१६

सांगवी किवळे हा रस्ता महानगरपालिकेने विकसीत केला असून या मार्गावर सार्वजनिक बीआरटी बस वाहतुक सुरु करण्यात आलेली आहे. या रस्त्यावरील कावेरी नगर या ठिकाणी सबवे बांधणेची मागणी या भागातील मा. नगरसदस्यांनी केली आहे. तसेच या कामासाठी दि. ११ ऑगस्ट २०१६ रोजी रस्ता रोको आंदोलनही करण्यात आले आहे. तसेच याठिकाणी चौक असल्यामुळे लहानमोठे अपघात वारंवार घडत असतात त्यामुळे या ठिकाणी नागरीकांच्या सुरक्षिततेसाठी व वाहनांची रहदारी सुरळीत होण्यासाठी सबवे बांधणे आवश्यक आहे.

त्यानुसार सदर जागेची पाहणी करुन सा.बां.विभाग सन २०१६-१७ व मान्य दरपृथ:करणानुसार सदर कामाचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे. एस.एन.भोबे यांनी सविस्तर

अंदाजपत्रक तयार केले असून अंदाजपत्रकीय रक्कम रु. ६,५०,००,०००/- इतकी येत आहे. तसेच सदर ठिकाणच्या EHV पायलॉनची उंची वाढविणे व नविन पायलॉन उभारणे या कामी र.रु. १,६०,००,०००/- खर्च येणार आहे. त्यामुळे कावेरीनगर येथे सबवे बांधणेकामी विद्युत खर्चासह र.रु. ८,१०,००,०००/- इतका खर्च येणार आहे. तथापि, मनपाचे सन २०१६-१७ चे अंदाजपत्रकातील पान क्र. ५७ अनु.क्र. १९३ अन्वये कामास र.रु. ४,००,००,०००/- इतक्या अंदाजपत्रकीय रक्कमेस महापालिका सभा ठराव क्र. ८५० दिनांक २०/४/२०१६ अन्वये प्रशासकिय मान्यता मिळाली आहे. सदर कामाची निविदा प्रसिध्द करणेकामी र.रु. ८,१०,००,०००/- या रक्कमेस मा. महापालिका सभेची प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे.

विषयांकित कामाची अंदाजपत्रकीय र.रु. ८,१०,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच मनपा अंदाजपत्रकातील स्थापत्य 'विशेष योजना' या लेखाशिर्षा अंतर्गत पान क्र. १९ अ.क्र.१५ कासारवाडी येथे नवीन शाळा इमारत बांधणे या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम १,६०,००,०००/- इतकी असून त्याऐवजी सदर कामास रक्कम रुपये १२,००,००,०००/- (अक्षरी र.रु.बारा कोटी) एवढया रकमेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता निविदा कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच मनपा अंदाजपत्रकातील स्थापत्य 'विशेष योजना' या लेखाशिर्षा अंतर्गत पान क्र. १९ अ.क्र.१४ प्रभाग क्र. ६२ फुगेवाडी मधील लोकमान्य टिळक शाळेच्या इमारतीत फेरफार करुन नवीन शाळा इमारत बांधणे व स्थापत्य विषयक अनुषंगिक कामे करणे भाग-२ या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम १,६०,००,०००/- इतकी असून त्याऐवजी सदर कामास रक्कम रुपये ४,३०,००,०००/- एवढया रकमेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता निविदा कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १४वर पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक-१४

दिनांक-२८.११.२०१६ विभाग-मा.आयुक्त

संदर्भ -१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.
क्र.स्था/BSUPप्र/४९९/२०१६ दि. ४/१०/२०१६

केंद्रशासनाने नागरी भागाकरिता प्रधानमंत्री आवास योजनेमध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने सामिल होणेबाबत महाराष्ट्र शासनाचे दि.०९/१२/२०१५ चे शासन निर्णयानुसार व त्यासंबंधी प्रस्ताव सादर करणेसाठी शासनाचे मा.श्री. निर्मलकुमार देशमुख, राज्य अभियान संचालक यांनी दि.०३/०२/२०१६ तसेच दि.१३/०४/२०१६ च्या पत्रामार्फत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस प्रधानमंत्री आवास योजना "सर्वांकरिता घरे २०२२" मध्ये योजना तयार करणे संदर्भात व शहरी गरीब लाभार्थी निश्चित करणे संदर्भात कळविले आहे. तसेच शासनाने म्हाडाची राज्यस्तरीय सुकाणू अभिकरण समिती म्हणून नेमणूक केली असून त्यांनी दि.०१/०६/२०१६ चे पत्रान्वये प्रधानमंत्री आवास योजनेचा आराखडा DPR (Detailed Project Report) तयार करुन प्रस्तावाच्या छाननी करिता मुख्य अधिकारी पुणे गृहनिर्माण क्षेत्र व क्षेत्र विकास मंडळाच्या कार्यालयाकडे सादर करणेविषयी कळविले आहे.

**या योजनेतील ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे :-**

१) सदर योजनेमध्ये केंद्रशासनाचे प्रत्येक घरासाठी र.रु.१.५ लक्ष व राज्य शासनाचे र.रु.१ लक्ष इतके अनुदान आहे व उर्वरित हिस्सा महानगरपालिका व लाभार्थी यांचा असणार आहे.

२) सदर योजनेमध्ये ३० चौ.मी. चटई क्षेत्रापर्यंतची घरकुले अनुज्ञेय आहेत.

३) या योजनेसाठी शहरातून आर्थिकदृष्ट्या दुर्बल असणा-या नागरिकांचे अर्ज मागवावयाचे आहेत. ज्या व्यक्तीचे उत्पन्न वार्षिक र.रु.३ लाख आहे तोच लाभार्थी पात्र ठरणार आहे.

४) लाभार्थी भारताचा नागरिक असणे आवश्यक आहे.

५) सदर योजनेतील घरे हे कुटुंबातील कर्त्या महिलेच्या किंवा कुटुंबातील कर्ता पुरुष व महिला यांच्या संयुक्त नावावर असतील आणि कर्ती महिला सदस्य नसेल तर या ठिकाणी कर्ता पुरुष यांच्या नावे घर राहिल.

६) लाभार्थी कुटुंबामध्ये पति / पत्नी व अविवाहित मुले यांचा समावेश असेल. या अभियान अंतर्गत केंद्राकडून अनुदान / सहाय्य प्राप्त करुन घेण्याकरिता देशातील कोणत्याही भागात लाभार्थी कुटुंबातील व्यक्तीच्या मालकीचे पक्के घर नसावे.

७) अभियान अंतर्गत बांधण्यात येणा-या घरांची सहकारी संस्था स्थापन करणेत येईल.

८) या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांची पात्रता प्रधानमंत्री आवास योजना, "सर्वांसाठी घरे" – नागरी च्या मार्गदर्शक सूचनानुसार राहील.

सदरची योजना केंद्रशासनाची असून योजनेस केंद्र व राज्य शासनाने सदर योजनेस आर्थिक मदत दर्शविली आहे. त्याअनुषंगाने सदर योजना नागरी स्वराज्य संस्थाच्या क्षेत्रात महाराष्ट्र शासनाने शासन निर्णयाद्वारे लागू केली असून त्यामुळे सदर योजनेमध्ये महानगरपालिकेने भाग घेणे आवश्यक आहे.

त्यानुसार EWS (Economically Weaker Section) च्या आरक्षित जागांवर घरकूल प्रकल्प राबविणेकरिता DPR बनविणेकामी त्या जागेचा सविस्तर सर्व्हे करणे, इमारत बांधकाम नकाशे तयार करणे, मुलभूत सुविधा (Infrastructure) नियोजन करणे, बांधकाम खर्चाचे अंदाजपत्रके तयार करणे, प्रकल्पाकरिता पर्यावरण नाहरकत दाखला, शासकीय तसेच निमशासकीय संस्थाकडील नाहरकत प्रमाणपत्रे सादर करणे, प्रकल्पाच्या बांधकामास परवानगी घेणे, निविदा तयार करणे,

DPR बनवून तो शासनाकडे सादर करणे, तसेच त्यास केंद्र व राज्य शासनाची मंजुरी तसेच अनुदान मिळविणेकामी वेळोवेळी पाठपुरावा करणे व इतर तदनुषंगिक वास्तुविशारद व अभियांत्रिकी विषयक सल्ला इत्यादी आवश्यक कामे करणेकामी सदर क्षेत्रातील अनुभवी वास्तुविशारद व अभियांत्रिकी सल्लागार संस्थेची नेमणूक करणे आवश्यक आहे. त्यानुसार प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत EWS योजनेच्या घरे बांधणेचे काम करणेसाठी प्रकल्प सल्लागार म्हणून मे. इनग्रेन आर्किटेक्ट अँण्ड अर्बन प्लॅनर यांची नेमणूक केली आहे व त्यांचेमार्फत DPR बनविणेचे काम सुरु आहे.

सध्या महानगरपालिकेच्या मंजूर विकास आराखड्यामध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी (EWS) घरे या आरक्षणांतर्गत च-होली येथे स.नं.४०८ पै,४०९ पै, (आरक्षण क्र.२/८३) मधील २.१५ हेक्टर क्षेत्रात महानगरपालिकेच्या ताब्यात आलेले आहे. सदर जागेवर प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत २.५ F.S.I. अपेक्षित धरुन १४४२ घरकुले बांधणेचे नियोजन केलेले आहे.

- **प्रकल्पातील इमारतींविषयी ठळक वैशिष्ट्ये**

१) इमारत पार्किंग + १४ मजली (तळ मजला पुर्णपणे पार्किंगसाठी राखीव). इमारतीभोवती पुरेशी मोकळी जागा

२) दोन लिफ्ट - १.४८ X २.१० मी. (५' X ७')

३) एक स्ट्रेचर लिफ्ट ३.३६ X१.९९ मी. (११' X६.६')

४) दोन जिने (रुंदी १.५० मी.), जिन्या मध्ये कोटा फरशी.

५) सामाईक पॅसेज (रुंदी १.३५ मी.), Vitrified tiles सुरक्षिततेच्या दृष्टीने १.२ मीटरउंचीची पडदी (Parapet) Oil Paint सह.

६) इमारतीला बाहेरुन Texture Paint व आतून Oil Bound Distemper

७) नियमानुसार आवश्यक ती अग्निशमन व्यवस्था (Fire Fighting).

८) जमिनीखाली व इमारतीवर आवश्यक क्षमतेच्या पाण्याच्या टाक्या.

९) प्रत्येक इमारतीस सोलर हिटर सुविधा.

१०) इमारतीचे Alluminium Form Work च्या सहाय्याने एकसंध RCC बांधकाम (Monolithic Construction).

११) पार्किंगमध्ये Trimix पध्दतीचे Flooring. प्रत्येक इमारतीच्या पार्किंगमध्ये स्वच्छतागृहासह सोसायटी ऑफीस.

१२) प्रत्येक मजल्यावर १६ सदनिका, प्रत्येक सदनिकेला पुरेसा उजेड, हवेशीर अशी व्यवस्था.

१३) इमारतींचा देखभाल - दुरुस्तीचा कालावधी सदर योजनेच्या ठेकेदारामार्फत ३ वर्षे व लिफ्ट ची देखभाल दुरुस्तीचा कालावधी ५ वर्षे राहील.

१४) मलशुध्दीकरण केंद्राचा देखभाल दुरुस्तीचे कालावधी सदर योजनेच्या ठेकेदारामार्फत ५ वर्षाचा राहील.

- **इमारतीतील सदनिकेची ठळक वैशिष्ट्ये**

१) केंद्र शासनाच्या नियमानुसार एका सदनिकेचे चटई क्षेत्रफळ (Carpet Area) ३० चौ.मी. (३२२ चौ.फुट).

२) बैठकीची खोली (Hall)– ३.०६ X ३.२ मी. (१०' - १ X १०' – ६'')

३) स्वयंपाक गृह (Kitchen)– २.४९ X १.९८ मी. (८'X ६' – ६'')

४) शयनगृह (Bedroom)– २.७४ X ३.२० मी.(९'X १०' – ६'')

५) स्नानगृह (Bathroom) -१.५२ X १.२० मी. (५'X ४') Wash basin सह, स्नानगृहामध्ये Antiskid ceramic tileflooring,४ फुट उंचीचा Glazed Tile मध्ये Dado व Oil Paint.

६) शौचालय (W.C.)– १.२० X ०.९१ मी. (४'X ३') ओरीसा पध्दतीचे W.C. पॅन, सिरॅमिक टाईल फ्लोरींगव ४ फुट उंचीचा Glazed Tile मध्ये Dado व ४ फुटाच्या वरील भागास Oil Paint.

७) माळा (Loft) स्वयंपाकगृहामध्ये– ०.६ मी. (२') रुंदी व ०.७५ मी. (२' ६'') उंचीचा.

८) मुख्य दरवाजा व बेडरुम चा दरवाजा - PUF Material मध्ये.

९) स्नानगृह व संडास चा दरवाजा - PVC Material मध्ये.

१०) खिडक्या - Alluminium Sliding व लोखंडी Grill सह.

११) विद्युत तारा– Casing पट्टीमध्ये, Powerpoint,Switches - Anchor कंपनीचे / तत्सम.

१२) Kitchen Otta – Kadappa Platform मध्ये Stainless Steel sink, Platform वर २ फुट उंचीचा Glazed Tile मध्ये Dado.

१३) सदनिकेमध्ये आतील भिंतींना सर्वत्र Oil Bound Distemper.

अशा पध्दतीची इमारतीची व सदनिकेची वैशिष्ट्ये राहतील.

सदर प्रकल्पा अंतर्गत च-होली येथे १४४२ सदनिका बांधणेकामी रु.१,१९,३१,७६,९४९/- इतका खर्च येत आहे. त्यानुसार प्रत्येक सदनिकेला येणारा खर्च हा र.रु. ८,२७,४४६/- इतका आहे. इमारतीच्या बांधकाम क्षेत्राप्रमाणे प्रत्येक सदनिकेचा Construction Built up Area हा ५४५ चौ.फुट आहे. त्यानुसार प्रति चौ.फुट बांधकामाचा खर्च र.रु.१,५१८/- इतका येत आहे.

१) केंद्रशासन अनुदान - रु.१.५० लक्ष

२) राज्यशासन अनुदान - रु.१.०० लक्ष

राज्य शासन योजनेसाठी रु.१ लक्ष चे अनुदान देणार आहे. सदरचे घर हे १४ मजली इमारतीमध्ये सर्व सोयी - सुविधायुक्त असणार आहे. यापूर्वी EWS च्या घरकुल योजनेसाठी सन २०१० मध्ये लाभार्थ्यांकडून त्यांच्या हिश्श्यापोटी रु.३.७६ लक्ष घेण्याचे मनपाने मान्य केले. त्यानुसार लाभार्थ्यांनीही सदर योजनेतील त्यांच्या हिश्श्यापोटी रु.३.७६ लक्ष भरले आहेत. त्यामुळे प्रधानमंत्री आवास योजनेतील सदनिकेच्या लाभार्थ्यांकडून त्यांच्या हिश्श्यापोटी र.रु.५ लक्ष घेण्यास हरकत वाटत नाही. त्यामुळे सदर प्रकल्पातील महानगरपालिकेचा प्रति सदनिका हिस्सा रु. ७७ हजार इतका राहील. प्रकल्पाचा नियोजित कालावधी ३ वर्ष इतका असल्याने महानगरपालिकेस प्रतिवर्षी रु. ३.७२ कोटी घालावे लागणार आहेत.

सदनिकाच्या खर्चाचे वाटप खालीलप्रमाणे.

१) केंद्र शासन - रु.१.५० लक्ष

२) राज्य शासन - रु.१.०० लक्ष

३) म.न.पा. - रु.०.७७ लक्ष

४) लाभार्थी - रु.५.०० लक्ष

**एकुण - रु.८.२७ लक्ष**

प्रत्येक प्रकल्पामध्ये कमर्शिअल वापरासाठी २% जागा विकास नियंत्रण नियमावली (D.C. Rule) नुसार ठेवणे क्रमप्राप्त आहे. त्यामुळे सदर प्रकल्पातील जागा ६०३७.३० चौ.फुट इतकी आहे.

प्रकल्पामध्ये महानगरपालिकेचा हिस्सा प्रत्येक सदनिकेसाठी र.रु.१ लक्ष इतका आहे. तो हिस्सा कमी करणेच्या दृष्टीकोनातून व मनपाचा Infrawork साठी सुध्दा खर्च येणार आहे तो काही प्रमाणात कमी व्हावा म्हणून कमर्शिअल जागेकरीता स्वतंत्र निविदा काढून ५० वर्षाचे Lease ने देणे व त्यातून मिळणाऱ्या Premium द्वारे मनपाचा स्वहिस्सा कमी करता येईल. कमर्शिअल वापराकरिता बांधून वापरा या तत्वावर करारनामा करुन अटी व शर्ती ठरवून विकसकाकडून Premium ची रक्कम २ वर्षात २ हप्त्यात घेण्यात येईल. ५० वर्षांनंतर इमारतीसहित संपूर्ण जागा मनपाला विकसकाने परत देणे क्रमप्राप्त राहील. Lease कालावधीत इमारतींचे मिळकत कर, पाणीपट्टी, विद्युत बिल इत्यादी विकसकाने भरणे आवश्यक राहील.

महानगरपालिकेच्या विकास आराखड्यामध्ये (D.P.) च-होली येथील जागा EWS साठी राखीव असल्याने सदर प्रकल्पामध्ये जागेची किंमत गृहित धरण्यात आलेली नाही.

लाभार्थ्यांचा हिस्सा रु.५.०० लक्ष इतका आहे. त्यामध्ये सोडतीमध्ये (Lucky Draw) नाव आल्यानंतर पहिला हप्ता २०% रक्कम, दुसरा हप्ता ४०% रक्कम हा इमारतीचे काम ५०% झाल्यानंतर व तिसरा हप्ता ४०% रकमेचा भरणा ताबा मिळण्यापूर्वी मनपाकडे करणे आवश्यक आहे. सदरची सदनिका मनपा मार्फत बांधून लाभार्थ्यांना त्यांचा हिस्सा भरुन घेतलेनंतर ९९ वर्षाच्या Lease ने देणेत येतील. त्याशिवाय विज, पाणी मिटर व स्वयंपाकासाठीचे गॅस पाईपलाईन करिता अनामत रक्कम जोडणी शुल्क यासाठी येणारा प्रत्यक्ष खर्च लाभार्थ्यास स्वतः (स्वहिश्श्या व्यतिरिक्त) महानगरपालिकेकडे भरावा लागेल. तसेच लाभार्थ्यांना मिळकत कर, वीज बिल इ. बिले स्वतः भरावी लागतील. प्रत्येक इमारतीची सोसायटी स्वतंत्र करणेत येईल व सोसायटीमार्फत सामाईक वीज बिल, सामाईक पाणी बिल भरावे लागेल.

महानगरपालिका ज्याप्रमाणे मनपा क्षेत्रामध्ये सार्वजनिक ठिकाणी रस्ते, पाणीपुरवठा, दिवा बत्ती, ड्रेनेज, मलशुध्दीकरण केंद्र (STP), घनकचरा व्यवस्थापन (Solid Waste Management) इत्यादी मुलभूत सुविधा (Infrastructure) स्वखर्चाने करते त्याप्रमाणे या

प्रकल्पातही महानगरपालिकेने स्वखर्चाने करावे असे वाटते. या सुविधा MPCB पर्यावरण खात्याच्या नियमानुसार करणे आवश्यक आहे. त्या मुलभूत सुविधांचा खर्च खालीलप्रमाणे :-

| अ क्र | ठिकाणाचे नाव | सीमा भिंत | रस्ते | पावसाळी गटर व Rain water harvesting | पा.पु. | ड्रेनेज | मल शुध्दी करण केंद्र (STD) | घनकचरा व्यवस्थापन (SWM) | दिवा बत्ती ट्रान्सफॉर्मर फिडर इ. | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्व आकडे लक्ष मध्ये | | | | | | | | | | |
| १ | च-होली | २७.९२ | २३२.८६ | ९३.८८ | १२.६१ | ४३.३२ | १५१.१५ | १.०० | २३३.४७ | ७९६.२१ |

एकंदरीत वरील सर्व ठिकाणी मुलभूत सुविधा (Infrastructure) पुरविणेकामी रु.७९६.२१ लक्ष इतका खर्च येईल. सदर प्रकल्पातील इमारतींचे काम सुरु झालेनंतर मुलभूत सुविधा (Infrastructure) करिता निविदा काढण्यात येतील.

सदर प्रकल्पासाठी खालील बाबींची मंजूरी आवश्यक आहे.

१) प्रस्तावास प्रशासकीय मान्यता

२) बांधकाम परवानगी

३) पर्यावरण खात्याकडील नाहरकत दाखला (Environmental Clearance Certificate), केंद्रीय भूमिजल बोर्डाकडील नाहरकत दाखला.

४) राज्य शासनाच्या “केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समिती” (CSMC) ची मान्यता.

प्रशासकीय मान्यतेनंतर बांधकाम परवानगी साठी व पर्यावरण दाखल्यासाठी अर्ज दाखल करणेत येईल. प्रस्तावास मनपाची मान्यता मिळालेनंतर सदर योजना म्हाडा मार्फत राज्य शासनाच्या “केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समिती” (CSMC) ची मान्यता घेवून प्रकल्पाच्या इमारतीच्या बांधकामांच्या सर्व निविदा काढणेत येतील.

सदर प्रकल्पास सक्षम प्राधिकारी (झोनिपू विभाग), नगररचना विभाग, भुमि आणि जिंदगी विभाग, बांधकाम परवानगी विभाग, कायदा सल्लागार (कायदा विभाग) व माहिती व तंत्रज्ञान अधिकारी यांचेकडून अभिप्राय आलेला आहे.

पंतप्रधान आवास योजनेकरिता प्रशासकीय मान्यतेकरिता खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे :-

**तक्ता – अ**

| अ.क्र. | तपशिल | खर्च |
|---|---|---|
| १ | प्रकल्पाचा इमारत बांधकामासाठी एकुण खर्च | १,१९,३१,७६,९४९ |
| २ | ५% Contingencies सह | १,२५,२८,३५,७९६ |
| ३ | २% Work charges establishment Charges सह | १,२७,७८,९२,५१२ |
| ४ | ६% भाववाढ (Escalation) | ७,१५,९०,६१६ |
| | **एकुण (३ + ४)** | **१,३४,९४,८३,१२८** |
| | **Say एकुण रु.** | **१३५.०० कोटी** |

महानगरपालिकेमार्फत मुलभूत सुविधा पुरविणे (Infra) कामांचा खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे

**तक्ता – ब**

| अ.क्र. | तपशिल | खर्च |
|---|---|---|
| १ | प्रकल्पाचा infra साठीचा एकुण खर्च | ७,९६,२१,००० |
| २ | ५% Contingencies | ८,३६,०२,०५० |
| ३ | २% Work charges establishment | ८,५२,७४,०९१ |
| ४ | ६% भाववाढ (Escalation) | ४७,७७,२६० |
| | **एकुण (३ + ४)** | **९,००,५१,३५१** |
| | **Say एकुण रु.** | **९.०० कोटी** |

**तक्ता अ** नुसार केंद्र शासन, राज्य शासन व मनपा यांचे संयुक्त निधी मधून पंतप्रधान आवास योजने अंतर्गत १४४२ सदनिका बांधणेकामी **तक्ता अ** नुसार **र.रु.१३५.०० कोटी** चे खर्चास व सदर प्रकल्पाचे साईटवर मुलभूत सुविधा मनपामार्फत पुरविणेकामी **तक्ता ब** नुसार येणा-या **र.रु.९.०० कोटी**चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

**मा.नंदा ताकवणे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

**मा.मंगलाताई कदम** – मा.महापौर साहेब, या विषयाची माहिती देण्यात यावी.

**मा.राजन पाटिल** (कार्य.अभियंता) – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, प्रधानमंत्री आवास योजना या अंतर्गत दि. ९/१२/२०१५ रोजी महाराष्ट्र शासनाने मुंबई इथे एक मिटींग बोलवली होती. महाराष्ट्रातील सर्व महापालिकांना यात सहभागी होण्याविषयी सांगण्यात आले होते. सर्वांसाठी घरे २०२२ पर्यंत, त्यासाठी ही योजना तयार केली आहे. या योजनेची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत –

**मा.शमिम पठाण** – विषय वाचून दाखवू नका. कोणाचा हिस्सा किता असणार आहे ते सांगा.

**मा.राजन पाटिल** (कार्य.अभियंता) – यात केंद्र शासन आपल्याला दीड लाख देणार आहे. राज्य शासन एक लाख देणार आहे. आपण ७७,०००/- रुपये टाकणार आहोत. लाभार्थ्यांकडून रु.५,००,०००/- घेणार आहोत.

**मा.मंगलाताई कदम** – घरकुल योजनेसाठी आपण लाभार्थ्यांकडून किती घेतले होते ते पण सांगा.

**मा.राजन पाटिल** (कार्य.अभियंता) – घरकुल योजनेसाठी आपण लाभार्थ्यांकडून रु.३,७६,०००/- घेतले होते. याठिकाणी आपण रु.५ लाख घेतोय.

**मा.मंगलाताई कदम** – घरकुल योजनेसाठी कोणाचा हिस्सा किती होता ते सांगा.

**मा.राजन पाटिल** (कार्य.अभियंता) – घरकुल योजनेसाठी केंद्र शासनाने रु.१,६९,०००/- दिले होते. प्राईम मिनिस्टर आवास योजनेत दीड लाख देत आहेत. राज्य शासनाने घरकुल योजनेसाठी रु.१,०१०००/- दिले होते. प्राईम मिनिस्टर आवास योजनेत एक लाख देत आहेत. त्यानंतर महानगरपालिकेने घरकुल योजनेसाठी रु.७०,०००/- टाकले होते. आता प्राईम मिनिस्टर आवास योजनेसाठी रु.७७,०००/- टाकतोय. घरकुल योजनेत लाभार्थ्यांकडून रु.३,७६,०००/- घेतले होते. आत्ता आपण लाभार्थ्यांकडून रु.५,००,०००/- घेण्याचे प्रस्तावित केले आहे.

**मा.योगेश बहल** – किती आकारमानाचे घर देतोय.

**मा.राजन पाटिल** (कार्य.अभियंता) –घरकुल योजनेत ३७ स्क्वे.मी. घर देत होतो. आपण आता ३० स्क्वे.मी. इतके आकारमानाचे घर देणार आहोत.

**मा.शमिम पठाण**–मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह,खरेतर केंद्र शासनाने नागरी भागासाठी पंतप्रधान आवास योजनेचा हा विषय आपल्याकडे आला आहे. यातून आपण पिंपरी चिंचवड शहरातील गरीब लोकांना आवास देणार आहेत. त्यांना निवारा देणार आहेत. गोरगरीबांना घरे देणार आहेत. केंद्र शासन व राज्य शासन खरेतर आघाडी सरकारची नक्कल करतेय. पण त्यांना जमत नाहीए. आपण पाऊणे चार लाखांत घर देतो होतो तेव्हा यांनी ऊर बडवून घेतले. मोठ मोठे मोर्चे काढले. यांनी विषय वाचला नाही का. यांना लोकांबद्दल एवढी कळकळ असेल, गरीबांबद्दल एवढा कळवळा असेल तर त्यांनी खरेतर केंद्र शासनाच्या विरोधात आत्ता सुद्धा टाळ बडवत यायचे होते. आम्ही गोरगरीबांसाठी जे केले आहे, मागील राष्ट्रवादी काँग्रेस व काँग्रेस सरकारने जे केलेले आहे. या महापालिकेत जी सत्ता आली होती, त्या सत्तेच्या माध्यमातून त्या सत्तेचा उपयोग गेल्या १५ वर्षांत कसा केला आहे ते लोकांना कळू द्यात. यांचा खोटारडेपणा लोकांच्या लक्षात येऊ द्यात. आता मला एकच सांगायचे आहे की, मी सर्व सन्माननीयांना विनंती करेन की, आपण एक उपसूचना देऊ. पाच लाख रुपये दारीद्र्य रेषेखालील लोक भरणार आहेत. त्यांनी जनधन योजना राबवली. त्यांनी बँकेत खाते उघडले आहे. त्यांना रु.५ लाख भरायचे आहेत. नाहीतर असेच रहायचे. झोपडीत रहायचेय. उघड्यावर रहायचेय. मला इथे उपसूचना द्यायची आहे की, हे ५ लाख रुपये ज्यावेळी सन्मा. पंतप्रधान प्रत्येकाच्या खात्यात रु.१५ लाख भरतील. त्यातून पंतप्रधानांनी ते वळवून घ्यावेत व गोरगरीबांना घरे द्यावीत अशी उपसूचना मांडते. या लोकांनी रु.५ लाख कुठून आणायचे.

**मा.महापौर** – अशी उपसूचना घेता येत नाही.

**मा.शमिम पठाण**–मा.महापौर साहेब, पाच लाख कुठून आणायचे. माझ्या वॉर्डमध्ये जी पुनर्वसन योजना होती, ती केंद्र शासनाच्या या धोरणामुळे बंद पडली आहे. तिथे जर आमचे शासन असते तर अजूनही जेएनएनयूआरएमची जी रक्कम आहे, जी मुदत आहे, ती वाढवली असती. माझ्या दळवीनगरमध्ये लोकांचे पुनर्वसन झाले असते. अतिशय घाणेरडे राजकारण करत आहेत. मोठमोठी आश्वासने देत आहेत. आणि इकडे लोकांना धुळीला मिळवताहेत. चांगले बोलायचे, अच्छे दिन म्हणायचे आणि वाईटच वागायचं. मनात तळतळ आहे ती माझ्या लोकांची. माझ्या लोकांचे पुनर्वसन झाले नाही. माझ्या गरीबांनी दळवी नगरमधील झोपडपट्टी वासियांच्या डोळ्यांत घराचे स्वप्न होते. ते या शासनाने धुळीला मिळवले आहे. म्हणून हा विषय मंजूर करु नका. आम्हाला त्याचे एक लाख रुपडी सुद्धा नकोत. त्यांना द्यायचे असेल तर त्यांनी त्यात किंमतीत आम्हाला घरे द्यावीत. हे अत्यंत कमी क्षेत्र देत आहेत. म्हणून मी सन्मा.सभागृहाला विनंती करेन की, अशा या फक्त थापा देणा-या, लोकांचे वाईट चिंतणा-या आणि उगीचच भूलथापा देणा-या या सरकारचा हा विषय इथे नामंजूर करावा अशी विनंती

करते. सगळ्यांनी जरी विषय मंजूर केलातरी माझा विरोध नोंदवावा अशी मी मा.महापौर साहेब यांना हात जोडून विनंती करते.

**मा.तानाजी खाडे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, आर्थिकदृष्ट्या दूर्बल घटकांतील लोकांसाठी नवीन योजना येते आहे. नागरीकांना त्यासाठी रु.५ लाख भरायचे आहेत. हा जो विषय आहे, हा अच्छे सरकारचा विषय आहे. अच्छे दिन. मा.महापौर, आपल्या महापालिके मार्फत आपण जेएनएनयूआरएम स्किम राबवली होती. आत्ताच मा.शमिम पठाण ताईंनी जीव तोडून भाषण केले. आज याच भारतीय जनता पक्षाच्या सदस्यांनी जागेची अडचण आणून, रेडझोनचा मुद्दा उपस्थित करुन ही योजना थांबवली. आज बरेचसे गोरगरीब घर मिळण्यापासून वंचित राहील आहेत. एवढे मोठे काम केंद्र सरकारच करत होते. दुसरे म्हणजे केंद्र सरकारच्या घरकुल योजनेतून आपण नागरीकांकडून ४ लाख रुपये घेऊन त्यांना ४५० स्क्वे. फुटाचे घर देत होतो. आता लोकांना रु.५ लाख देऊन त्यांना ३२२ स्क्वे. फुटाचे घर देणार आहेत. म्हणजे ७० स्क्वे. फूट कमी घर मिळणार आहे. मागील सरकारचे काम चांगले होते का या सरकारचे काम चांगले आहे. हे सरकार लोकांच्या डोळ्यांत धूळफेक करते आहे. घरकुल योजनेतून घर देत होतो. काहीतरी कारण आणून ती योजना थांबवली. येथे आपण कोणाचा फायदा करतोय. कोणाचे काम करतोय. बीजेपीचे सदस्य या शहरातील लोकांचा मजाक उडवायला लागले आहेत. एवढे तरी कळाले पाहिजे. मागील सरकार ३७ स्क्वे.मी. चे घर देत होते. हे सरकार ३० स्क्वे. मी. चे घर देते आहे. मा.आयुक्त साहेब, माझी आपल्याला विनंती आहे की, मागील घरकुल योजनेतील कामे थांबवली आहेत. लोकांचा ठराव झाला होता. काही लोक वेटींगमध्ये आहेत. त्यांचा देखील प्रश्न सोडवणे गरजेचे आहे. सभागृह आज या विषयाला मान्यता देणार आहे. आपण लोकांना मागील विषयाचे काय उत्तर देणार. उद्या इलेक्शन येत आहेत. एक महिन्यानंतर महापालिकेच्या निवडणूका लागणार आहेत. निवडणूकीत आपल्याला जनतेसमोर जायचे आहे. जनतेसमोर जात असताना आपण ज्या पद्धतीने घरे देणार होतो, ते थांबवले व दुस-या प्रकारे घरे देणार आहेत. मा.पक्षनेते, आपण या गोष्टींत प्रामुख्याने लक्ष घातले पाहिजे. आपण यातून जनतेला वेठीस धरतोय. जनतेचे नुकसान झाले नाही पाहिजे. जनतेचा फायदा झाला होईल यासाठी जे जे करता येईल ते आपण केले पाहिजे. आज या सरकारने लोकांच्या डोळ्यांत धूळफेक केली आहे. मी या सरकारचा निषेध करतो आणि हा विषय फेटाळून लावावा अशी विनंती करतो.

**मा.योगेश बहल** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, या विषयासंदर्भात मा.शमिम पठाण ताई व मा.तानाजी खाडे बोलले. मी प्रथमतः याला अनुमोदन देतो. सांगायचे तात्पर्य हेच होते की, मागील आघाडी सरकारने जेएनएयूआरएम अंतर्गत घरकुल योजना

आणली होती. आत्ता बीएसयूपीचा विषय आला आहे. शहरातील गरीब लोकांसाठी हा विषय आहे. शहरातील गरीबांसाठी आपण ऑलरेडी योजना राबवली आहे. या योजनेत खेळ कोणी घातला, खो कोणी घातला, या शहरातील सर्वांना ज्ञात आहे. या शहरातील सूज्ञ नागरीकांना माहित आहे की, चांगले चांगले निर्णय घेतले. काही तांत्रिक बाबींच्या अडचणी होत्या. परंतू हायकोर्टाने निकाल दिल्यानंतरसुद्धा हे महाशय सुप्रिम कोर्टापर्यंत गेले. तिथे जाऊन सुद्धा ते फेटाळले गेले. तरीसुद्धा प्राधिकरणाच्या ऑफीसमध्ये त्यांनी त्यांचे गुड ऑफीसेस वापरून त्यांनी पुन्हा कशी अडवणूक करता येईल. त्यासाठी आम्हाला मोर्चा काढावा लागला. पूर्वी आपण ३७ स्क्वे.मी. चे घर देत होतो. आत्ता ३० स्क्वे. मी. चे घर देतोय. म्हणजे कमी झाले. पूर्वी कैंद्र शासनाचे अनुदान जास्त होते, ते आता कमी झाले आहे. राज्य शासनाने सुद्धा अनुदान कमी केले आहे. महापालिकेचा सहभाग जास्त वाढलेला आहे. थोडक्यात लोकांना जी स्वप्ने दाखवली होती. लोकांना जी घोषणाबाजी केली होती की, अच्छे दिन आऐंगे. तर हे अच्छे दिन कोणते आहेत. हे सांगण्यासाठीचा हा सर्वांचा प्रयास आहे. खरे म्हटलेतर खोटे बोलायचे, रेटून बोलायचे हा आज धंदा झाला आहे. त्याव्यतिरिक्त बोलायचे नाही. दुसरं उरलसुरलं केवळ आरोप करायचे. शंभर दिवसांत प्रश्न सोडवू, कुठे गेले तुमचे शंभर दिवस. शंभर दिवसांत शास्ती कर रद्द करु. झाला का रद्द. शंभर दिवसांत अनधिकृत बांधकामे रेग्युलराईज करु. झाली का. काहीही करायचे नाही. फक्त बोबलायचं काम करायचं, खोटे बोलायचे काम करायचे. गरीबाची फसवणूक करायची. कालाधन. काला धन परदेशातून येणार होते. आता काला धन परदेशातून काय आलेच नाही. गोरगरीबांना त्यांच्या धनासाठी, त्यांच्या पुंजीसाठी सुबह शाम रात दिन लाईनमध्ये उभं रहाव लागतयं. लाईन में खडे रहो, आता ही परिस्थिती झाली आहे. दाऊद ईब्राहिमला शंभर दिवसांत आणणार होते. कुठयं तो दाऊद ईब्राहिम. म्हणजे किती खोटं बोलायचं याला काहीतरी मर्यादा असते. म्हणजे जेव्हा तुलना करायची वेळ येते तेव्हा सरळ दिसतेय की, शहरी गरीबांनी पाच लाख कुठून आणायचे. म्हणजे मागे ज्याप्रमाणे काही खोटे लोक घुसले. मा.तानाजी खाडे अजून त्यावर ओरडत असतात. तिथे प्रशासनाची काय चुक झाली. चुकीच्या लोकांना घरे मिळाली. लोकांनी खोटी ॲफीडेव्हीट दिली. घरे विकायची नाही म्हटले तरी घरे विकली. दोन तीन लोकांना भाड्याने दिली. सगळा चुकीचा कारभार. मग असा सामान्य गरीब जो झोपडपट्टीत राहतो, ज्याचे पोट हातावर आहे. जो हातगाडीवाला असेल, गरीब असेल, त्याने पाच लाख कुठून आणायचे. मग पुन्हा त्या गरीबाने कोणाकडून तरी पैसे घ्यायचे. मग तो माणूस काहीतरी ॲफीडेव्हीट लिहून घेईल. आत्ता मी पैसे देतो, नंतर तू घर माझ्या नावावर कर. म्हणजे पुन्हा त्या गरीबाची फसवणूक, पुन्हा पिळवणूक. सर्व काही खोटे होणार. मग हे पेपर कशाला घेतो. खोटी योजना आणायची कशाला. त्याची पाच लाख कमवायची पात्रता नसेलतर त्याने पाच लाख कुठून आणायचे. इकॉनॉमिकली विकर सेक्शनसाठी वेगळी स्किम, गोरगरीबांसाठी वेगळी स्किम असे म्हणतोय. पण त्याने पैसे कुठून

आणायचे असा प्रश्न आहे. मिनिमम वेजेस ॲक्टप्रमाणे आपण त्या गरीबाला तेवढे पैसे तरी देतोय का, तेवढा पगार देतोय का. मग तरी त्याने पाच लाख आणायचे. म्हणजे पंतप्रधान आवास योजना जी आहे ती कोणासाठी आहे, हे तरी आम्हाला कळाले पाहिजे. आपण मंजूरी देताना कोणाला मंजूरी देतोय. त्या गरीबाची छाननी आपण केली आहे का. तशाप्रकारचे गरीब आपण शोधले आहेत का, तशाप्रकारची लिस्ट आपण केली आहे का. मग कोणासाठी आपण देतोय. म्हणजे पुन्हा खोटे बोलायचे, खोटे बोलण्याव्यतिरिक्त काही करायचे नाही अशी परिस्थिती आहे. मा.महापौर साहेब, आपले जे म्हणणे होते की, इथे कोणी नाही, तिथे कोणी नाही. या सभागृहाचा आवाज, या जनतेचा आवाज लोकांपर्यंत नेणारे पत्रकार इथे उपस्थित आहेत. ते त्यांचे काम करतील. आपली सत्याची बाजू मांडली गेलीच पाहिजे. हे लोकांनाही कळले गेले पाहिजे की, नुसती भाषणे करण्याने लोकांचे पोट भरत नाही. आपली मतं आजमावून लोकांना नोकरी मिळत नाही. हे सर्व काही सत्य असताना अश्याप्रकारच्या बोगस योजना जर आणत असतील तर त्यांना उघडे पाडणे आपले काम आहे. भ्रष्टाचार, भ्रष्टाचार, भ्रष्टाचार एका बाजूला ओरडायचं. आज एकतरी भ्रष्टाचार सिद्ध झाला आहे का. मग खोटं बोलायचं, बदनाम करायचं, हा एकमेव धंदा भाजपचा आहे. आणि तो हाणून पाडला पाहिजे. नागरीकांना सुद्धा हे कळून चुकले आहे की, हे खोटे बोलण्याशिवाय काही करु शकत नाहीत.

**मा.मंगलाताई कदम** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, म्हणतात ना खुर्चीत बदल झाला की नावात बदल होतो. परंतू समोरच्याचा फायदा करुन जर खुर्चीत बदल झाला तर समोरच्या लोकांचा, गोरगरीबांचा यातून खरेतर फायदा व्हायला पाहिजे. अशी योजना आणली असतीतर आम्हाला नक्कीच आनंद झाला असता. आम्ही सुद्धा त्याचे आनंदाने स्वागत केले असते. आम्ही त्यांचे धन्यवाद मानले असते की, आम्हाला पहिल्यांदा रु.१,६९,०००/- देत होते ते आत्ता रु.२,००,००० देणार आहेत. यात वाढ करायला पाहिजे होती. यात त्यांनी घट केली आहे. हे केंद्र सरकार दीड लाख देणार आहे. पहिल्या सरकारने रु.१,६९,०००/- दिले होते. हे सरकार गोरगरीबांसाठी खरोखरच काम करणारे असते, त्यांना खरोखरच स्किम करायच्या असत्यातर त्यांनी दोन लाख द्यायला पाहिजे होते. महाराष्ट्र शासनाकडून फक्त एक लाख येणार आहेत. पूर्वी दीड लाख देत होते. म्हणजे तुम्ही सांगा, हा वरचा आकडा कमी केला आहे तो नागरीकांकडून ते वसूल करणार आहेत. हे आम्हाला नागरीकांना सांगायचे आहे. आम्ही जे सभागृहामध्ये बोलतोय ते नागरीकांपर्यंत गेले पाहिजे की, केंद्र सरकार व महाराष्ट्र शासन यांची जी रक्कम आहे ती नागरीकांनी भरायची आहे. मुळात म्हणजे खुर्ची बदलली, सगळे बदलले. परंतू ज्यावेळी आपण सभागृहात सर्वपक्षीय लोक आहोत, आपण कधीही त्यांच्याकडे आजादुजापणा केलेला नाही. तुम्ही आजसुद्धा बघितले असेल. आम्ही त्यांना कोणालाही उपसूचना द्यायला अडवले नाही. सर्व पक्षांतील लोकांना आम्ही म्हटले की तुम्हाला काय

उपसूचना द्यायच्या आहेत त्या द्या. आम्ही सभागृहात सर्वांना बरोबर घेऊन चालतो. सर्वांना बरोबर घेऊन कामकाज करत आलो आहोत. ही नेहमीच,कायमच ओरडत आलेली मंडळी आहेत. आणि या विषयावरुन सरळसरळ हे सिद्ध होते आहे की, ते जर गरीबांना घरे देणार आहेत, तर त्यांनी या योजनेचे नाव बदली केले. तरीसुद्धा मा.महापौर साहेब, आम्ही सभागृहाच्या वतीने सगलेजण ठामपणे सांगतो की, घरकुल योजनेतील जी उर्वरीत वेटींगला असलेली लोकं आहेत, त्यांना इथे पहिल्यांदा घरे मिळाली पाहिजेत. आमची केंद्र सरकारला, महाराष्ट्र शासनाला विनंती असेल की, आम्हाला ३० स्क्वे. फूटाऐवजी ३७ स्क्वे. फूटाचेच घर मिळाले पाहिजे. पाटील साहेब लक्षात घ्या. पूर्वीची घरकुलची जी योजना आहे, त्याच पद्धतीने घरकुल योजनेत आम्ही लोकांना जसे घर दिले आहे, त्याच पद्धतीने तितक्याच स्क्वे.फूटाचे घर दिले पाहिजे. आम्ही शहरातील नागरीकांना बांधिल आहोत. तसे करता येत नसेलतर ही योजना राबवू नका. जर शहरातील काही लोकांवर अन्याय होणार असेल, जर पिंपरी चिंचवडमधील शहरातल्या नागरीकांवर अन्याय होणार असेल, यामुळे सात हजार लोकांवर अन्याय होणार आहे. तसे होणार असेलतर आम्हाला ही योजना नको. आम्ही एकंदरीत ३७ स्क्वे. मी.चे घर दिले होते. इथे ३० स्क्वे. मी.चे म्हणजे ७ स्क्वे. मी. कमी घर देताय. इथे लोकांनी पाच लाख भरायचे आहेत. त्यावेळी बाकी गोष्टींचे रेट वाढल्यामुळे आपण घराचा रेट वाढवला होता म्हणून काही मंडळींना नको नको केले होते. आणि आज अशी परिस्थिती असताना आत्ता नागरीकांमध्ये पैशांच्या बाबतीत भेदभाव कसा करणार. जर ही योजना आणायची असेलतर पूर्वीच्याच पद्धतीने ही योजना अंमलात येईल. पूर्वीची वेटींग लिस्ट राहील. अन्यथा हा विषय केला जाणार नाही. मा.महापौर साहेब, एक उपसूचना होती, हा विषय तसा होणार असेलतरच करायचा. सगळी माहिती घ्या. आम्ही म्हणतो त्याप्रमाणे हा विषय करता आलातरच करायचा आहे. आम्हाला गोरगरीबांवर अन्याय करायचा नाही. आम्ही पहिल्यांदाच तसे दिले आहे. वेळ आलीतर महापालिकेच्या माध्यमातून नुकसान सोसू, परंतू आमच्या ७,००० नागरीकांना त्याच पद्धतीने घरे मिळाली पाहिजेत. वेटींगला असलेल्या लोकांना घरे मिळाली पाहिजेत. अन्यथा, ही स्किम तशीच्या तशी कागदावर ठेवावी. हा विषय क्रमांक १४चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी मी सूचना मांडते.

**मा.भारती फरांदे** – मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन आहे.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - ९५३ विषय क्रमांक-१४
दिनांक-२८.११.२०१६ विभाग-मा.आयुक्त

संदर्भ -१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.
क्र.स्था/BSUPप्र/४९९/२०१६ दि. ४/१०/२०१६

विषय क्रमांक १४चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.उल्हास शेट्टी -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १५वर पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ९५४ विषय क्रमांक-१५
दिनांक-२८.११.२०१६ विभाग-मा.नगरसचिव

**<u>मा.विधी समिती</u>**

दि.१९/८/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.प्रभाकर वाघेरे –** मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -
अनुकूल-८१ प्रतिकूल- ०
अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.उल्हास शेट्टी -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १६वर पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ९५५ विषय क्रमांक-१६
दिनांक-२८.११.२०१६ विभाग-मा.नगरसचिव

**<u>मा.क्रिडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती</u>**

अ) दि. ३/८/२०१६ दि. १८/८/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
ब) दि. १८/८/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.प्रभाकर वाघेरे –** मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.महापौर** – सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर करणेत येत आहे.

(धराडे शकुंतला भाऊसाहेब)

**महापौर**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी – ४११०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

नगरसचिव कार्यालय

क्रमांक – नस/१०/कावि/१३/२०१७

दिनांक – १९/०१/२०१७



**नगरसचिव**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी – ४११ ०१८.

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

**( मा.स्थायी समिती सभा ठराव क्रमांक १७६७०, दि.४/१०/२०१६ व मा.महापालिका सभा विषय क्रमांक ११ चे लगत )**

५ वी ते इयत्ता १० मध्ये शिकत असलेल्या खुल्या प्रवर्गातील विद्यार्थी/विद्यार्थीनींना शिष्यवृत्ती देणेबाबत.

---------------------------------------------------------------------------------------

**योजनेचे स्वरूप** - खुल्या प्रवर्गातील विद्यार्थी/विद्यार्थीनींमध्ये शिक्षणाची आवड निर्माण व्हावी व त्यांचे गुणवत्तेत वाढ व्हावी आणि त्यांना आर्थिक पाठबळ मिळावे म्हणून या योजनेद्वारे इयत्ता ५ वी ते इयत्ता ७ वी मध्ये शिकत असणा-या खुल्या प्रवर्गातील विद्यार्थी/विद्यार्थीनीस र.रू. २०००/- आणि इयत्ता ८ वी ते इयत्ता १० वी मध्ये शिकत असणा-या खुल्या प्रवर्गातील विद्यार्थी/ विद्यार्थीनीस र.रू.३०००/- (वार्षिक) शिष्यवृत्ती देणे.

खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांस 'इतर कल्याणकारी योजना' आणि खुल्या प्रवर्गातील विद्यार्थीनीस "महिलाकरिता योजना" या लेखाशिर्षावर करण्यात आलेल्या तरतूदीतून शिष्यवृत्ती रक्कम अदा करणेत यावी.

**योजनेच्या अटी व शर्ती -**

१) अर्जदाराने विहीत नमुन्यातील अर्ज करणे.

२) अर्जदार विद्यार्थी/विद्यार्थीनीस वास्तव्याचे पुराव्यार्थ रेशनिंग कार्ड, झोपडपट्टी ओळखपत्र, पालकाचे मतदान ओळखपत्र, घरपट्टी पावती इ. पैकी एक पुरावा सादर करणे आवश्यक.

३) इयत्ता ५ ते १० मध्ये शिकत असणा-या खुल्या प्रवर्गातील विद्यार्थी/विद्यार्थीनीस शिष्यवृत्ती देण्यात येईल.

४) अर्जदार विद्यार्थी/विद्यार्थीनीस मागील शैक्षणिक वर्षामध्ये किमान ७५ टक्के गुण प्राप्त झालेले असणे आवश्यक.

५) त्याच्या पुराव्यार्थ अर्जासोबत अर्जदार विद्यार्थी/विद्यार्थीनीने मागील वर्षाची गुणपत्रिकेची प्रत सादर करणे आवश्यक.

६) अर्जासोबत विद्यार्थी/विद्यार्थीनीची आधारकार्डची प्रत जोडणे आवश्यक.

७) अर्जासोबत अर्जदाराने बँक पासबुकची प्रत सादर करणे आवश्यक

८) सदर योजनेत आवश्यक ते बदल करण्याचा अधिकार मा.आयुक्त यांना राहील.

सही/-
सभापती
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

१२ वी नंतरचे वैद्यकीय (MBBS, BAMS, BDS, BUMS, BHMS) MBA आणि अभियांत्रिकी पदवी परिक्षा यासारखे उच्च शिक्षण घेण्यासाठी खुल्या प्रवर्गातील विद्यार्थी, विद्यार्थीनीस आणि मागास घटकातील (SC, ST, VJNT, प्रवर्गातील) विद्यार्थ्यांना राष्ट्रीयकृत बँकेकडील "शैक्षणिक कर्जाचे" व्याजाची रक्कम अदा करणे.

-----------------------------------------------------------------------------------

**योजनेचे स्वरूप** - पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमध्ये वास्तव्य असलेल्या आणि १२ वी नंतरचे वैद्यकीय (MBBS,BAMS,BDS,BUMS,BHMS) MBA आणि अभियांत्रिकी पदवी करीता प्रवेश मिळाला असून राष्ट्रीयकृत बँकेकडील शैक्षणिक कर्ज मंजूर झाले आहे. अशा विद्यार्थी/विद्यार्थीनींस शैक्षणिक कालावधीतील प्रत्येक वर्षामध्ये बँकेकडील मंजूर दराने आकारणेत आलेली व्याजाची रक्कम बँकेच्या खात्यावर महानगरपालिकेमार्फत अदा करणे.

खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिताचा खर्च "इतर कल्याणकारी योजना" लेखाशिर्षावरील तरतूदीतून, मागासवर्गीय (SC, ST, VJNT) प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरीताचा खर्च "मागासवर्गीय कल्याणकारी योजना" या लेखाशिर्षावरील तरतूदीतून आणि सर्व घटकातील मुलींकरीताचा खर्च "महिला करिता योजना" या लेखाशिर्षावरील तरतूदीतून करण्यात यावा.

**योजनेच्या अटी व शर्ती -**

१) अर्जदाराने विहीत नमुन्यातील अर्ज करणे.

२) अर्जदार विद्यार्थी/विद्यार्थीनीस वास्तव्याचे पुराव्यार्थ रेशनिंग कार्ड, झोपडपट्टी ओळखपत्र, पालकाचे मतदान ओळखपत्र, घरपट्टी पावती इ. पैकी एक पुरावा सादर करणे आवश्यक.

३) अर्जासोबत १२ वी नंतरचे वैद्यकीय(MBBS,BAMS,BDS,BUMS,BHMS) MBA आणि अभियांत्रिकी पदवी करिता प्रवेश घेतल्याचे पत्राची प्रत सादर करणे आवश्यक.

४) अर्जदारास राष्ट्रीयकृत बँकेकडील शैक्षणिक कर्ज मंजूर झालेल्या पत्राची प्रत अर्जासोबत सादर करणे आवश्यक.

५) अर्जासोबत विद्यार्थी/विद्यार्थीनीची आधारकार्डची प्रत जोडणे आवश्यक.

६) अर्जासोबत अर्जदाराने बँक पासबुकची प्रत सादर करणे आवश्यक.

७) सदर व्याजाची रक्कम विद्यार्थी/विद्यार्थीनीचे 'शैक्षणिक कर्ज' खात्यावर जमा करणेत येईल.

८) सदर योजनेत आवश्यक ते बदल करण्याचा अधिकार मा.आयुक्त यांना राहील.

सही/-
सभापती
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८.**

**नागरवस्ती विकास योजना विभाग**

**प्रपत्र 'अ'**

**(मा.महापालिका सभा विषय क्रमांक ११ ठराव क्रमांक ९५० दि.२८/११/२०१६ चे लगत)**

**योजनेचे नाव-** नागरवस्ती विकास योजना विभागाकडील महिला बाल कल्याण योजना अंतर्गत ज्येष्ठ महिलांना प्राथमिक आरोग्य संगोपन करीता दरमहा अर्थसहाय्य देणे.

**योजनेचे कार्यक्षेत्र :-** पिंपरी चिंचवड महानगरपालिका, हद्द

**योजनेचे स्वरुप :-** महिला बाल कल्याण योजनेअंतर्गत पिं.चिं.मनपा हद्दीतील वयोगट ६५ वर्षे व त्यापुढील वयोगट असलेल्या ज्येष्ठ महिलांना प्राथमिक आरोग्य संगोपन करीता दरमहा अर्थसहाय्य अदा करणेत येईल.

**ज्येष्ठ महिलांना प्राथमिक आरोग्य संगोपन करीता दरमहा अर्थसहाय्य देणेकरीता नियम व अटी :-**

१. अर्जदाराचे कुटूंबाचे पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत किमान ३ वर्षे वास्तव्य असल्याचा दाखला (रेशनिंग कार्डची स्वसाक्षांकित प्रत आवश्यक) तसेच ३ वर्षे वास्तव्य असलेल्या राहण्याचा पुरावा म्हणून गत ३ वर्षाचा मनपा टॅक्स पावती किंवा लाईट बिल किंवा टेलिफोन बिल (लॅण्डलाईन) किंवा झोपडी फोटो पास/झोपडी सेवा शुल्क पावती / भाडे करारनामा इ. जोडावे.

२. वय मर्यादा ६५ वर्षे व त्यापुढील (वयाचा पुरावा म्हणून जन्मदाखला/ससून जनरल हॉस्पिटलमधील वयाचा दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, मतदान यादीतील नांव अथवा मतदान ओळखपत्र यापैकी एक आवश्यक)

३. कुटूंबाचे सर्व मार्गानी मिळालेले वार्षिक उत्पन्न रु. १ लाखाच्या आत असावे. (त्याकरिता रेशनकार्डची प्रत सादर करणे आवयक राहील अथवा मा.तहसिलदार यांचेकडील उत्पन्नाचा दाखला जोडावा.)

४. केंद्र शासन व राज्य शासनाच्या सामाजिक अर्थसहाय्य योजनेतून ज्येष्ठ महिलांना वेतन /अर्थसहाय्य मिळत असल्यास त्या व्यतिरिक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका नागरवस्ती विकास योजना विभागाकडील महिला बाल कल्याण योजनाअंतर्गत प्राथमिक आरोग्य संगोपन करीता दरमहा रक्कम रु. ४००/- अर्थसहाय्य देणेत येईल.

५. केंद्र शासन व राज्य शासनाच्या सामाजिक अर्थसहाय्य योजनेतून ज्येष्ठ महिलांना वेतन /अर्थसहाय्य मिळत नसल्यास पिंपरी चिंचवड महानगरपालिका नागरवस्ती विकास योजना विभागाकडील महिला बाल कल्याण योजनाअंतर्गत प्राथमिक आरोग्य संगोपन करीता दरमहा रक्कम रु.१०००/- अर्थसहाय्य देणेत येईल.

६. सदर योजने अंतर्गत लाभ घेणा-या लाभार्थी महिलेनी स्वत:चे आधार कार्ड जोडणे आवश्यक आहे.

७. सदर योजने अंतर्गत लाभ घेणा-या लाभार्थी महिलेचे राष्ट्रीयकृत बँकेत खाते असणे आवश्यक. सोबत बँक खाते पासबुकची झेरॉक्स प्रत जोडणेत यावी.

८. शासकीय व निमशासकीय सेवेतून निवृत्त झालेल्या सेवकांना पेन्शन मिळत असल्यास अशा कुटूंबातील व्यक्तीला सदर योजनेचा लाभ घेता येणार नाही.

९. सदर योजनेचा लाभ घेणा-या अर्जदाराने हयात असल्याबाबतचा दाखला त्याचे खाते असलेल्या बँकेमध्ये दरवर्षी दि.१ ते ३१ जानेवारी पर्यंत सादर करणे बंधनकारक राहील.

१०. नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत राबविणेत येणा-या सदर योजनांपैकी एकाच योजनेचा लाभ लाभार्थ्याला मिळेल.

११. अटी व नियम यांत बदल करण्याचा/अर्ज नाकारण्याचा अधिकार मा.महापालिका आयुक्त अथवा ते प्राधिकृत करतील त्या अधिका-यास राहील.

सही/-
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८.**

**नागरवस्ती विकास योजना विभाग**

**प्रपत्र 'अ'**

**(मा.महापालिका सभा विषय क्रमांक ११ ठराव क्रमांक ९५० दि.२८/११/२०१६ चे लगत)**

**योजनेचे नाव-** नागरवस्ती विकास योजना विभागाकडील युवक कल्याणकारी योजना अंतर्गत ज्येष्ठ नागरिकांना (पुरुष) प्राथमिक आरोग्य संगोपन करीता दरमहा अर्थसहाय्य देणे.

**योजनेचे कार्यक्षेत्र :-** पिंपरी चिंचवड महानगरपालिका, हद्द

**योजनेचे स्वरुप :-** युवक कल्याणकारी योजनेअंतर्गत पिं.चिं.मनपा हद्दीतील वयोगट ६५ वर्षे व त्यापुढील वयोगट असलेल्या ज्येष्ठ नागरिकांना (पुरुष) प्राथमिक आरोग्य संगोपन करीता दरमहा अर्थसहाय्य अदा करणेत येईल.

**ज्येष्ठ नागरिकांना (पुरुष) प्राथमिक आरोग्य संगोपन करीता दरमहा अर्थसहाय्य देणेकरीता नियम व अटी :-**

१. अर्जदाराचे कुटूंबाचे पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत किमान ३ वर्षे वास्तव्य असल्याचा दाखला (रेशनिंग कार्डची स्वसाक्षांकित प्रत आवश्यक) तसेच ३ वर्षे वास्तव्य असलेल्या राहण्याचा पुरावा म्हणून गत ३ वर्षाचा मनपा टॅक्स पावती किंवा लाईट बिल किंवा टेलिफोन बिल (लॅण्डलाईन) किंवा झोपडी फोटो पास/झोपडी सेवा शुल्क पावती / भाडे करारनामा इ. जोडावे.

२. वय मर्यादा ६५ वर्षे व त्यापुढील (वयाचा पुरावा म्हणून जन्मदाखला/ससून जनरल हॉस्पिटलमधील वयाचा दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, मतदान यादीतील नांव अथवा मतदान ओळखपत्र यापैकी एक आवश्यक)

३. कुटूंबाचे सर्व मार्गानी मिळालेले वार्षिक उत्पन्न रु. १ लाखाच्या आत असावे. (त्याकरिता रेशनकार्डची प्रत सादर करणे आवयक राहील अथवा मा.तहसिलदार यांचेकडील उत्पन्नाचा दाखला जोडावा.)

४. केंद्र शासन व राज्य शासनाच्या सामाजिक अर्थसहाय्य योजनेतून ज्येष्ठ नागरिकांना (पुरुष) वेतन/अर्थसहाय्य मिळत असल्यास त्या व्यतिरिक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका नागरवस्ती विकास योजना विभागाकडील युवक कल्याणकारी योजना अंतर्गत प्राथमिक आरोग्य संगोपन करीता दरमहा रक्कम रु.४००/- अर्थसहाय्य देणेत येईल.

५. केंद्र शासन व राज्य शासनाच्या सामाजिक अर्थसहाय्य योजनेतून ज्येष्ठ नागरिकांना (पुरुष) वेतन/अर्थसहाय्य मिळत नसल्यास पिंपरी चिंचवड महानगरपालिका नागरवस्ती विकास योजना विभागाकडील युवक कल्याणकारी योजना अंतर्गत प्राथमिक आरोग्य संगोपन करीता दरमहा रक्कम रु. १०००/- अर्थसहाय्य देणेत येईल.

६. सदर योजने अंतर्गत लाभ घेणा-या लाभार्थी पुरुषाने स्वत:चे आधार कार्ड जोडणे आवश्यक आहे.

७. सदर योजने अंतर्गत लाभ घेणा-या लाभार्थी पुरुषाचे राष्ट्रीयकृत बँकेत खाते असणे आवश्यक. सोबत बँक खाते पासबुकची झेरॉक्स प्रत जोडणेत यावी.

८. शासकीय व निमशासकीय सेवेतून निवृत्त झालेल्या सेवकांना पेन्शन मिळत असल्यास अशा कुटूंबातील व्यक्तीला सदर योजनेचा लाभ घेता येणार नाही.

९. सदर योजनेचा लाभ घेणा-या अर्जदाराने हयात असल्याबाबतचा दाखला त्याचे खाते असलेल्या बँकेमध्ये दरवर्षी दि.१ ते ३१ जानेवारी पर्यंत सादर करणे बंधनकारक राहील.

१०. नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत राबविणेत येणा-या सदर योजनांपैकी एकाच योजनेचा लाभ लाभार्थ्याला मिळेल.

११. अटी व नियम यांत बदल करण्याचा/अर्ज नाकारण्याचा अधिकार मा.महापालिका आयुक्त अथवा ते प्राधिकृत करतील त्या अधिका-यास राहील.

सही/-
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८.**

**नागरवस्ती विकास योजना विभाग**

**प्रपत्र ‘अ’**

**(मा.महापालिका सभा विषय क्रमांक ११ ठराव क्रमांक ९५० दि.२८/११/२०१६ चे लगत)**

**योजनेचे नाव-** नागरवस्ती विकास योजन विभागाकडील महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत विधवा, निराधार महिलांना प्राथमिक आरोग्य संगोपन करीता दरमहा अर्थसहाय्य देणे.

**योजनेचे कार्यक्षेत्र :-** पिंपरी चिंचवड महानगरपालिका, हद्द

**योजनेचे स्वरुप :-** महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत पिं.चिं.मनपा हद्दीतील विधवा, निराधार महिलांना प्राथमिक आरोग्य संगोपन करीता दरमहा अर्थसहाय्य अदा करणेत येईल.

**विधवा, निराधार महिलांना प्राथमिक आरोग्य संगोपन करीता दरमहा अर्थसहाय्य देणेकरीता नियम व अटी :-**

१. अर्जदाराचे कुटूंबाचे पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत किमान ३ वर्षे वास्तव्य असल्याचा दाखला (रेशनिंग कार्डची स्वसाक्षांकित प्रत आवश्यक) तसेच ३ वर्षे वास्तव्य असलेल्या राहण्याचा पुरावा म्हणून गत ३ वर्षाचा मनपा टॅक्स पावती किंवा लाईट बिल किंवा टेलिफोन बिल (लॅण्डलाईन) किंवा झोपडी फोटो पास / झोपडी सेवा शुल्क पावती / भाडे करारनामा इ. जोडावे.

२. अर्जदाराचे वय मर्यादा १८ वर्षापुढील (वयाचा पुरावा म्हणून जन्मदाखला/ससून जनरल हॉस्पिटलमधील वयाचा दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, मतदान यादीतील नांव अथवा मतदान ओळखपत्र यापैकी एक आवश्यक)

३. कुटूंबाचे सर्व मार्गानी मिळालेले वार्षिक उत्पन्न रु.१ लाखाच्या आत असावे. (त्याकरिता रेशनकार्डची प्रत सादर करणे आवयक राहील अथवा मा.तहसिलदार यांचेकडील उत्पन्नाचा दाखला जोडावा.)

४. केंद्र शासन व राज्य शासनाच्या सामाजिक अर्थसहाय्य योजनेतून विधवा, निराधार महिलांना वेतन/अर्थसहाय्य मिळत असल्यास त्या व्यतिरिक्त विधवा, निराधार महिलांसाठी प्राथमिक आरोग्य संगोपन करीता दरमहा रक्कम रु.४००/- अर्थसहाय्य देणेत येईल.

५. केंद्र शासन व राज्य शासनाच्या सामाजिक अर्थसहाय्य योजनेतून विधवा, निराधार महिलांना वेतन/अर्थसहाय्य मिळत नसल्यास सदर योजनेतील पात्र ठरणा-या विधवा, निराधार महिलांसाठी प्राथमिक आरोग्य संगोपन करीता दरमहा रक्कम रु.१०००/- अर्थसहाय्य देणेत येईल.

६. सदर योजने अंतर्गत लाभ घेणा-या लाभार्थी महिलेनी स्वत:चे आधार कार्ड जोडणे आवश्यक आहे.

७. सदर योजने अंतर्गत लाभ घेणा-या लाभार्थी महिलेचे राष्ट्रीयकृत बँकेत खाते असणे आवश्यक. सोबत बँक खाते पासबुकची झेरॉक्स प्रत जोडणेत यावी.

८. सदर योजनेचा लाभ घेणा-या अर्जदाराने हयात असल्याबाबतचा दाखला त्याचे खाते असलेल्या बँकेमध्ये दरवर्षी दि.१ ते ३१ जानेवारी पर्यंत सादर करणे बंधनकारक राहील.

९. शासकीय व निमशासकीय सेवेतून निवृत्त झालेल्या सेवकांना पेन्शन मिळत असल्यास अशा कुटूंबातील व्यक्तीला सदर योजनेचा लाभ घेता येणार नाही.

१०. सदर पात्र ठरणा-या निराधार महिलेनी मा.तहसिलदार/तलाठी यांचा निराधार असल्याबाबतच मुळ दाखला जोडणे आवश्यक राहील.

११. सदर योजनेतील पात्र ठरणा-या विधवा महिलांनी पती मयत झालेबाबतचे मृत्यू दाखला मुळप्रत जोडणे आवश्यक राहील.

१२. नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत राबविणेत येणा-या सदर योजनांपैकी एकाच योजनेचा लाभ लाभार्थ्याला मिळेल.

१३. अटी व नियम यांत बदल करण्याचा/अर्ज नाकारण्याचा अधिकार मा.महापालिका आयुक्त अथवा ते प्राधिकृत करतील त्या अधिका-यास राहील.

सही/-
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.

**<u>मा.सहा.आयुक्त,प्रशासन यांनी सभागृहात वाचन केलेला मा.मुख्यलेखापरिक्षक व सहा.आयुक्त (प्रशासन) यांच्या द्विसदस्यिय समितीचा अहवाल :-</u>**

Administration /

Dear – Please initiate recovery action against the concerned by fixing responsibility. Accordingly put up proposal for issuing show cause notice to them.
– Also issue letter to Stores department to initiate recovery action against the erring suppliers.
13/8/16.

(29)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८
मुख्य लेखापरीक्षक व सहाय्यक आयुक्त
(प्रशासन) द्विसदस्यिय समिती
दिनांक २०/०८/२०१६

प्रति,
मा.आयुक्त सो
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८

विषय- दिंडी प्रमुखाला देण्यात आलेल्या विठ्ठल-रुक्मिणी मूर्ती खरेदीतील भ्रष्टाचाराची चौकशीबाबत अहवाल

संदर्भ- १) भारतीयं जनता पार्टी, पिंपरी चिंचवड शहर यांचेकडील पत्र दिनांक १९/०७/२०१६
२) मा.नगरसदस्या सौ.सिमा सावळे यांचे दिनांक २६/०७/२०१६ चे पत्र
३) श्री.ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा दिंडी समाज यांचे दिनांक २७/०७/२०१६ चे पत्र
४) दिनांक ०६/०८/२०१६ रोजीची सुनावणी / चर्चा
५) सह आयुक्त, मध्यवर्ती भांडार यांची दिनांक १०/०८/२०१६ रोजीची साक्ष

महोदय,

आषाढी पालखी सोहळा २०१६ साठी विठ्ठल रुक्मिणी मूर्ती खरेदी प्रकरणातील भ्रष्टाचाराची चौकशी करणेकामी मा.आयुक्त यांनी सहाय्यक आयुक्त (प्रशासन) व मुख्य लेखापरीक्षक यांच्या द्विसदस्यिय समितीने चौकशी करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

त्यानुसार प्राप्त संदर्भिय तक्रारीच्या अनुषंगाने व दिनांक ०६/०८/२०१६ रोजी सौ.सिमा सावळे, नगरसदस्या, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, यांनी समक्ष झालेल्या चर्चा सुनावणीतील मुद्द्यानुसार चौकशी करण्यात आली. तथापि चौकशी ही कालमर्यादित असल्याने सदस्या सौ.सिमा सावळे, नगरसदस्या पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्या निवेदनात नमुद असल्याप्रमाणे सन २००८/०९, २०१२/१३, २०१३/१४, २०१४/१५ या कालावधीतील खरेदीची चौकशीचा अंतर्भाव करण्यात आला नाही.

आषाढीवारी पालखी सोहळा- २०१६ करीता विठ्ठल रुक्मिणी मूर्ती (शिल्प) खरेदी प्रकरणातील वस्तुस्थिती तथा घटनाक्रम :-

23

- आषाढीवारी पालखी सोहळा २०१६ करीता नियोजनासाठी दिनांक २३/०५/२०१६ बैठक

- विषय क्रमांक १४ :- दरवर्षी प्रमाणे पालखी सोहळ्यातील दिंडी प्रमुखांचा सत्कारकामी द्यावयाच्या भेटवस्तू खरेदी व वाटपासंदर्भात चर्चा करणे.

- सभावृत्तांतानुसार. अ.क्र.६ :- सभावृत्तांत दिनांक ०३/०६/२०१६ अन्वये मुद्दा क्र.(६) अन्वये सह आयुक्त, भांडार विभाग यांनी दिंडी प्रमुखांच्या सत्कार समारंभासाठी मा.महापौर आणि सक्षम प्राधिकारी यांचे आदेशानुसार भेटवस्तू खरेदी करुन त्याचे दिंडी प्रमुखांना वाटप करण्यात यावे.

- मा.महापौर कार्यालयाचे दिनांक २५/०५/२०१६ रोजीच्या पत्रान्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने आषाढीवारी पालखी सोहळा २०१६ मधील संतश्रेष्ठ तुकाराम महाराज व संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यातील दिंडी प्रमुखांना विठ्ठल रुक्मिणी मूर्ती भेट देणेसाठी ८०० नग शिल्प उपलब्ध करुन देणेचे निर्देश देण्यात आले.

- विठ्ठल रुक्मिणी भेट देणेकरीता ६५० नग शिल्प तातडीने उपलब्ध करुन देणेबाबत मा.सहाय्यक आयुक्त, माहिती व जनसंपर्क विभाग यांचेकडील पत्र क्र.माजसं/०४/कावि/५६/२०१६ दिनांक ०३/०६/२०१६ अन्वये मागणी करण्यात आली.

- मध्यवर्ती भांडार विभाग यांनी दिनांक ०७/०६/२०१६ रोजी विठ्ठल रुक्मिणी मूर्ती / शिल्प उत्पादक व त्याचे अधिकृत वितरक यांचेकडून सर्व करासह कोटेशन मागवून कोटेशन दरांची तुलना करता मे.आल्हाट आर्ट स्टुडिओ यांचे लघुत्तम कोटेशन दर रक्कम रु.३,९५०/- प्रति नग प्रमाणे ६५० नग विठ्ठल रुक्मिणी शिल्प खरेदीकामी रक्कम रु.२५,६७,५००/- इतका खर्च अपेक्षित असल्याचे अंदाजपत्रक तयार केले.

(२४)

दरपत्रक :-

| साहित्याचा तपशील / साईज / स्पेसिफिकेशन | मे.आल्हाट आर्ट यांचे सर्व करासह दर प्रती नग र.रु. | मे.सोनी एंटरप्रायझेस यांचे सर्व करासह दर प्रती नग र.रु. | मे.राज एंटरप्रायझेस यांचे सर्व करासह दर प्रती नग र.रु. |
|---|---|---|---|
| विठ्ठल रुक्मिणी मूर्ती / शिल्पाचे स्पेसिफिकेशन<br>विठ्ठल मूर्ती :- उंची ४५० एम.एम. (अंदाजे १८ इंच)<br>२) रुक्मिणी मूर्ती :- उंची ३९० एम.एम. (अंदाजे १५ इंच)<br>३) बेस साईझ :-<br>३०० एम.एम. X १०० एम.एम.<br>४) वजन :- २.५ ते ३ किलोग्रॅम<br>५) मेटल :- ब्लॅक मेटल (अल्युमिनियम)<br>६) रंग :- पावडर कोटिंग ब्लॅक मॅट | रु.३,९५०/- प्र.नग | रु.४,२००/- प्र.नग | रु.४,३००/- प्र.नग |

❖ स्पेसिफिकेशन चार्ट (निविदेप्रमाणे) :-

| अ. क्र. | साहित्याचा तपशिल | साईज / स्पेसिफिकेशन | परिमाण व संख्या | दर प्रती नग |
|---|---|---|---|---|
| १) | विठ्ठल रुक्मिणी मूर्ती ( शिल्प ) | **विठ्ठल मूर्ती :- उंची** ४५० एम.एम. (अंदाजे १८ इंच)<br>**रुक्मिणी मूर्ती :- उंची** ३९० एम.एम. (अंदाजे १५ इंच)<br>**बेस साईझ** :-<br>३०० एम.एम. X १०० एम.एम.<br>**वजन** :- २.५ ते ३ किलोग्रॅम<br>**मेटल** :- ब्लॅक मेटल (अल्युमिनियम)<br>**रंग** :- पावडर कोटिंग ब्लॅक मॅट | ६५० नग | र.रु.३,९५०/- |

❖ आषाढीवारीसाठी माहिती व जनसंपर्क विभागाने मागणी केलेले ६५० नग विठ्ठल रुक्मिणी शिल्प दिनांक २७/०६/२०१६ पूर्वी मनपास उपलब्ध होणे आवश्यक असलेने ७ दिवसांची अल्प मुदत ई-निविदा प्रसिध्द करुन खरेदी करणेचे मध्यवर्ती भांडार विभागाकडून प्रस्तावित करण्यात आले व त्याला मा.आयुक्त यांची मान्यता घेणेत आली.

२०

- अल्प मुदत ई-निविदा सूचना ९/२०१६-१७ प्रसिध्द करणेसाठी दिनांक ०७/०६/२०१६ रोजी मान्यता दिली त्यानुसार ई-निविदा ऑनलाईन व दै.लोकमत, दै.लोकमंथन, दै.सिध्दांत समाचार, साप्ताहिक गगनझेप व साप्ताहिक झुंज या वृत्तपत्रात प्रसिध्द करणेकरीता जनसंपर्क विभागाकडून वृत्तपत्राचे रोटेशन क्र.२ पत्र क्र.जसं/५/कावि/११८० /२०१६ दिनांक ०८/०६/२०१६ अन्वये जाहिरात क्र.८५३ प्राप्त झाले.

- मध्यवर्ती भांडार विभागाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माहिती व जनसंपर्क विभागास आषाढीवारी पालखी सोहळा करीता तातडीने विठ्ठल रुक्मिणी मूर्ती खरेदीकामी मनपाकडे नोंदणी केलेल्या उत्पादित पुरवठाधारक किंवा त्यांचे अधिकृत वितरक यांचेकडून ई-टेंडरिंग कार्यप्रणालीद्वारे निविदा मागविण्यात आली. सदरची ऑनलाइन निविदा दिनांक १०/०६/२०१६ ते १७/०६/२०१६ अखेर दुपारी ३.०० वाजेपर्यंत भरता येणार होत्या.

- दिनांक १७/०६/२०१६ रोजी दुपारी ३.२३ मि. निविदा उघडली असता सदर कामासाठी एकही निविदा प्राप्त झालेली नाही.

- आषाढीवारी पालखी दिनांक २७/०६/२०१६ रोजी मनपा हद्दीत येत असल्याने खात्यास उक्त विठ्ठल रुक्मिणी मूर्तीची (शिल्प) तातडीने आवश्यकता असल्याने सदरच्या निविदेस ३ दिवस मुदतवाढ देणेसाठी मध्यवर्ती भांडार विभागाने मा.आयुक्त यांची मान्यता दिनांक १७/०६/२०१६ रोजी घेतली आहे. त्यानुसार दिनांक १८/०६/२०१६ ते २१/०६/२०१६ पर्यंत मुदतवाढीचे शुध्दिपत्रक (१) प्रसिध्द करण्यात आले.

- मध्यवर्ती भांडार विभागाची दिनांक २२/०६/२०१६ च्या टि-१७ वरील टिपणीत दिनांक २१/०६/२०१६ रोजी निविदा उघडल्या असता तीन निविदा प्राप्त झाल्या आहेत. निविदेकरीता पुरेशी स्पर्धा झालेली असल्याने निविदेतील अटी व शर्तीनुसार निविदाकार निविदा दर उघडण्यास पात्र असल्याने त्याचे निविदा दर दिनांक २२/०६/२०१६ रोजी उघडण्यात आले असून दराचा तुलनात्मक तक्ता जोडला आहे.

| अ. क्र. | निविदाकाराचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम रुपये | निविदा प्राप्त दर रक्कम रुपये | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | मे.अक्षय ग्रीन एनर्जी | रु.३,९५०/- | रु.३,९५०/- | |
| २ | मे.आल्हाट आर्ट स्टुडिओ | रु.३,९५०/- | रु.४,१००/- | |
| ३ | मे.साई सेवा | रु.३,९५०/- | रु.४,५००/- | |

5

२०

त्यानुसार मे.अक्षय ग्रीन एनर्जी यांचे प्राप्त लघुत्तम दरानुसार मे.अक्षय ग्रीन एनर्जी यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिका, मध्यवर्ती भांडार विभाग क्र.मभां/७/कावि/४७७/२०१६ दिनांक २४/०६/२०१६ अन्वये मूर्त्यांचा पुरवठा नेहरुनगर गोडाऊनमध्ये ५ दिवसांचे आत करण्याबाबत पुरवठा आदेश निर्गत करण्यात आले.

❖ पुरवठ्याचा तपशिल :-

| अ.क्र. | पुरवण्याचे ठिकाण | मूर्तीची संख्या | पोहच दिनांक | वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | भक्ती शक्ती. उद्यान निगडी मनपा जकात नाक्यासमोरील मंडपात | ३०० नग | २८/०६/२०१६ | दुपारी २.०० वाजणेपूर्वी |
| २ | आळंदी जुना जकात नाका मनपाचे मंडपात | ३५० नग | २९/०६/२०१६ | सकाळी ६.०० वाजणेपूर्वी |
| | एकूण | ६५० नग | | |

❖ प्रस्तुत खरेदीकामी मा.आयुक्त यांचे विषयपत्र क्र.मभां/७/कावि/४७६/२०१६ दि.२४/०६/२०१६ अन्वये नगरसचिव, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना मनपाचे माहिती व जनसंपर्क विभागास अल्पमुदती ई-निविदा सूचना क्र.९/१६-१७ अन्वये प्राप्त लघुत्तम निविदाकार मे.अक्षय ग्रीन एनर्जी यांचे ६५० नग विठ्ठल रुक्मिणी मूर्तीचे एकूण दर रु.२५,१०,३००/- हे मनपा अंदाजपत्रकीय दर रु.२५,६७,५००/- पेक्षा २.२२% ने कमी असल्याने ते स्वीकृत करुन त्यांच्या बरोबर करारनामा करुन पुरवठा आदेश निर्गत करणेस व येणा-या खर्चास अवलोकनार्थ मान्यता मिळणेबाबतचा विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ७३(ड) नुसार नजिकच्या मा.स्थायी समितीपुढे ठेवण्यात यावा असे कळविले आहे.

❖ प्रस्तुत खरेदीकामी मा.स्थायी समिती ठराव क्र.१६५९५ विषय क्र.६१ दिनांक २८/०६/२०१६ अन्वये अवलोकन करुन मान्यता दिलेली आहे.

ठराव क्रमांक- १६५९५ विषय क्रमांक ६१

दिनांक- १८/०६/२०१६ विभाग- मध्यवर्ती भांडार

सुचक- मा.विमल काळे अनुमोदक- मा.संदिप चिंचवडे

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांची जा.क्र.मभां/७/कावि/४७६/२०१६ दि.२४/०६/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवुन-

(३९)

मनपाची माहिती व जनसंपर्क विभागास आषाढीवारी पालखी सोहळा २०१६ मधील संत तुकाराम महाराज व संत ज्ञानेश्वर महाराज पालखीतील दिंडीप्रमुखांना विठ्ठल रुक्मिणी मूर्ती भेटवस्तु देणेकामी खरेदीकामी अल्प मुदत ई-निविदा क्र.९/२०१६-१७ अन्वये ऑनलाईन निविदा दर मागविणेत आलेले होते. त्यामध्ये प्राप्त निविदाकारापैकी मे.अक्षय ग्रीन एनर्जी यांचे विठ्ठल रुक्मिणी मूर्तीचे सर्वात लघुत्तम दर र.रु.३८६२/- प्र.नग प्राप्त झालेले आहेत. प्राप्त लघुत्तम दराने माहिती व जनसंपर्क विभागास ६५० नग विठ्ठल रुक्मिणी मूर्ती खरेदीकामी एकूण र.रु.२५,१०,३००/- इतका खर्च येणार आहे. प्राप्त लघुत्तम दर हे मनपा अंदाजपत्रकीय दर एकूण र.रु.२५,६७,५००/- पेक्षा २.२२% ने कमी आहेत. सदर दर स्विकृत करणेस मान्यता दिलेली असून त्यांचेबरोबर करारनामा करुन पुरवठा आदेश निर्गत करणेत आले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे. तसेच अल्प मुदत ई.नि.सु.क्र.९/२०१६-१७ अन्वये आषाढीवारी पालखी सोहळा २०१६ मधील संत तुकाराम महाराज व संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यातील दिंडीप्रमुखांचा मनपाचे वतीने विठ्ठल रुक्मिणी मुर्ती / भेटवस्तु देऊन सत्कार करणेत येत आहे. निविदेतील प्राप्त लघुत्तम दराने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन्मा.सदस्य व मान्यवर यांचेकरीता पुर्नप्रत्ययी आदेशाद्वारे जादा ३२५ नग विठ्ठल रुक्मिणी मुर्ती / भेटवस्तु खरेदी करणेस व त्यासाठी येणारे वाढीव र.रुपये १२,५५,१५०/- चे खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

❖ <u>प्राप्त तक्रारीतील प्रमुख मुद्दे</u> :-

| | | |
|---|---|---|
| १) | संदर्भ क्रमांक (१) भारतीय जनता पार्टी, पिंपरी चिंचवड शहर यांचेकडील पत्र दिनांक १९/०७/२०१६ | मूर्तीची खरेदी वाढीव दराने झाल्याबाबतची तक्रार |
| २) | संदर्भ क्रमांक (२) मा.नगरसदस्या सौ.सिमा सावळे यांचे दिनांक २६/०७/२०१६ चे पत्र | (१) दरपत्रक मागणी कार्यपध्दतीबाबत<br>(२) निविदा अटी व शर्तीनुसार सादर करावयाची कागदपत्रामधील त्रुटींबाबत<br>(३) यापूर्वीच्या सन २००८/०९, २०१२/१३, २०१३/१४, २०१४/१५ या कालावधीतील मूर्ती खरेदीची चौकशीची मागणी |

| | | |
|---|---|---|
| ३) | संदर्भ क्रमांक (३) श्री.ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा दिंडी समाज यांचे दिनांक २७/०७/२०१६ चे पत्र | भ्रष्टाचाराबाबत |
| ४) | संदर्भ क्रमांक (४) दिनांक ०६/०८/२०१६ रोजीची सुनावणी | निविदा मंजूरीच्या प्राधिकाराबाबतची तक्रार |

प्रस्तुत प्रकरणी प्राप्त तीन तक्रारी, दिनांक ०६/०८/२०१६ रोजीची चर्चा / सुनावणीतील मुद्द्यांची उपलब्ध निविदा नस्तीच्या आधारे तपासणी केली असता खालील बाबी निदर्शनास आल्या.

I) प्रस्तुत प्रकरणी खरेदीकामी अंदाजित रक्कम निश्चितीसाठी मागविण्यात आलेली दरपत्रकासाठी पुरवठादारांना तक्रारीत नमूद केल्याप्रमाणे मागणी पत्र दिल्याचे आढळून येत नाही.

* प्राप्त ३ दरपत्रक धारक

१) मे.आल्हाट आर्ट स्टुडिओ

२) मे.अक्षय ग्रीन एनर्जी

३) मे.साई सेवा

हे दरपत्रकावरील नोंदीनुसार मा.शासन / मनपाकडे अधिकृत नोंदणीकृत असल्याचा उल्लेख दिसून येत नाही. त्यामुळे उपलब्ध कागदपत्रांवरुन ते ब्रॉझ मूर्ती उत्पादक / किंवा अधिकृत वितरक असल्याबाबत खात्री पटवता आली नाही.

या संदर्भात मध्यवर्ती भांडार विभागाने क्र.मभां/५/कावि/६४०/२०१६ दि.१०/०८/२०१६ अन्वये पुढीलप्रमाणे कळविले आहे.

१. मनपाचे संबंधीत विभागाकडून साहित्यांची मागणी संख्या, स्पेसिफिकेशन सह साहित्याचे सर्व करासह दर प्राप्त झालेनंतर त्यांची खातरजमा करणेसाठी स्थानिक बाजारपेठेमधून उत्पादक / पुरवठाधारक / दुकानदार यांचेकडून लेखी पत्राद्वारे, ईमेलद्वारे अथवा तातडीचे बाब असल्यास समक्ष कर्मचारी पाठवून सर्वकरासह मनपास पोहच कोटेशन / दरपत्रके घेणेत येतात. तसेच काही विभागाकडून खरेदी करावयाचे साहित्याचे अंदाजपत्रकीय दर कळविले जातात. तांत्रिक बाबतीत प्राचार्य आय.टी.आय.यांचेमार्फत मुल्यांकन करुन अंदाजपत्रकीय दर निश्चित केले जातात.

२. सदर प्रकरणी समक्ष संबंधीत कर्मचारी यांनी मे.सोनी एंटरप्रायझेस, नगररोड, लोहगाव, मे.आल्हाट आर्ट स्टुडिओ विश्रांतवाडी व मे.राज एंटरप्रायझेस, खडकी येथून उत्पादक असल्याची खात्री करुन अंदाजे सर्व करासह कोटेशनद्वारे दरपत्रके आणलेली आहेत.

समितीचे निष्कर्ष :-

भांडार विभागाने वरीलप्रमाणे प्रचलित पध्दत व केलेली कार्यवाही याबाबत कळविले असले तरी वरील आक्षेप क्र.१ व २ चे निरसन होत नसून आवश्यक कागदपत्रांची शहानिशा करण्याची जबाबदारी विभागाची असताना तशी कार्यवाही झालेली दिसून येत नाही.

II) <u>निविदाची कागदपत्रे तपासणी</u> :-

प्रस्तुत खरेदी प्रकरणाची नस्तीतील निविदा अर्हता छाननी तक्ता व निविदाधारकांची कागदपत्राची छाननी केली असता पुढील बाबी निदर्शनास आल्या.

(१) **मे. साई सेवा एंटरप्रायझेस** :-

राज एटंरप्रायझेस यांनी मे.साईसेवा एंटरप्रायझेस यांना सदर निविदेत खरेदी, दरपत्रके सादर करणे, दराबाबतची वाटाघाटी, पुरवठा करणे, इनव्हाईस तयार करणे व देयकाची रक्कम घेणेसाठी प्राधिकृत केले आहे.

तथापि राज एंटरप्रायझेस यांच्या प्राधिकृत पत्रावरुन ते ब्रॉझ मूर्त्यांचे उत्पादक असल्याबाबत उल्लेख दिसून येत नाही.

मध्यवर्ती भांडार विभागाचे मत :-

मे.साई सेवा एंटरप्रायझेस यांनी ऑनलाईन निविदा सादर केली असून त्यासोबत मे.राज एंटरप्रायझेस या उत्पादकाचे अधिकृत विक्रेता असल्याचे पत्र सादर केले आहे. त्यांना एस.एस.आय. प्रमाणपत्राबाबत विचारणा केली असता ते आहे असे सांगितले. सोबत त्याची प्रत जोडत आहोत.

समितीचा निष्कर्ष :-

१) वरील आक्षेपाबाबत विभागाने निविदा छाननीवेळी उचित दक्षता घेतली नसल्याचे निदर्शनास येते.

२) सदर निविदाकार यांच्या कागदपत्राची उचित छाननी न झाल्याने मे.साई सेवा एंटरप्रायझेस अपात्र ठरत असताना तसेच मे. राज एंटरप्रायझेस हे स्वतः उत्पादक असल्याच्या पत्राची खातरजमा करण्याकरीता कोणत्याही कागदपत्रांची मध्यवर्ती भांडार विभागाने मागणी केलेली नाही. त्यामुळे साई सेवा एंटरप्रायझेस अपात्र ठरत असताना छाननी तक्त्यामध्ये चुकीने पात्र ठरवून निविदेमध्ये तीन पात्र निविदा प्राप्त झाल्याचे दर्शवून दराबाबतचे पाकीट उघडण्यात आले. याबाबत मध्यवर्ती भांडार विभागाची जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे.

(२) अक्षय ग्रीन एनर्जी :-

यांनी निविदेत मागणी केलेली आयकर रिटर्न व व्हॅट रिटर्नची कागदपत्रे सादर केलेली नाहीत. तसेच त्यांचे दिनांक २१/०६/२०१६ च्या पत्रान्वये त्यांची नवीन फर्म असल्याने वरील दोन्ही रिटर्न भरले नसल्याचे लेखी कळविले आहे.

तथापि निविदा छाननी, अर्हता छाननी तक्ता मध्ये आय.टी. व व्हॅट रिटर्न भरले असल्याचे नमूद केले आहे.

मध्यवर्ती भांडार विभागाचे मत :-

मे.अक्षय ग्रीन एनर्जी यांनी आयकर विभागाकडील पुरावा म्हणून पॅनकार्ड सादर केलेले आहे व फर्म नविन असल्याने इनकम टॅक्स आय.टी. रिटर्न भरलेले नाही असे लेंखी म्हणणे दिलेले आहे.

मे.अक्षय ग्रीन एनर्जी यांनी व्हॅट व सीएसटी प्रमाणपत्र सादर केलेले आहेत. फर्म नविन असल्याने व्हॅट भरलेला नाही असे कागदपत्र सादर करतेवेळी लेखी म्हणणे दिलेले आहे. त्यांनी संबधीत खात्यास व्हॅट / सीएसटी भरणा केलेच्या पावत्या व आय.टी. रिटर्न भरलेबाबत कागदपत्र सादर केलेले आहेत. त्याच्या प्रती सोबत सादर करीत आहोत.

समितीचा निष्कर्ष :-

(१) वरील आक्षेपाबाबत विभागाने निविदा छाननीवेळी उचित दक्षता घेतली नसल्याचे निदर्शनास येते.

(२) महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम १९४८ नमुना ड मधील आस्थापनेच्या नुतनीकरणाचा दाखला अ.क्र.(६) पूर्वीचा नोंदणी क्र.व तारीख १३/१०/२०१३ YERAVAD/II/२८७१२ असल्याचे दिसून येते. यावरुन सदरची संस्था ३ वर्षापासून

अस्तित्वात असल्याचे दिसून येते तथापि संस्थेने त्यांची संस्था नवीन असल्याचे नमूद करुन मनपाची दिशाभूल केली आहे.

(३) सदर निविदाकार यांच्या कागदपत्राची उचित छाननी न झाल्याने अक्षय ग्रीन एनर्जी अपात्र ठरत असताना छाननी तक्त्यामध्ये पात्र ठरवून दराबाबतचे पाकिट उघडण्यात आले आहे. संबंधीताचे दर लघुत्तम असल्याने ते स्विकृत करणेबाबत मध्यवर्ती भांडार विभागाने चुकीचे प्रस्तावित केले आहे. सबब याबाबत जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे.

(३) **मे.आल्हाट आर्ट स्टुडिओ :-**

(१) यांनी VAT, CST यांची प्रमाणपत्र सादर केलेली नसून VAT आणि CST Acknowledgement सादर केली आहे.

CST NO.:- 411015/C/0434 w.e.f. 16/12/05

VAT NO.:-411015/V/0089 w.e.f. 16/12/05

(२) निविदा छाननी करताना अल्हाट आर्ट स्टुडिओ यांनी CST & VAT प्रमाणपत्र व रिटर्न सादर केलेले नसताना छाननी तक्त्यात ते सादर केले असल्याचे नमूद आहे.

मध्यवर्ती भांडार विभागाचे मत :-

मे.आल्हाट आर्ट स्टुडिओ यांनी निविदेचे वेळी सीएसटी व व्हॅट प्रमाणपत्राबाबत Acknowledgment रिसिट सादर केलेली आहे. त्यांना संबधीत खात्याकडून व्हॅट व सीएसटी प्रमाणपत्र विलंबाने प्राप्त झालेने सादर केलेली आहेत. त्याच्या प्रती सोबत जोडत आहोत.

समितीचे निष्कर्ष :-

(१) वरील आक्षेपाबाबत विभागाने निविदा छाननीवेळी उचित दक्षता घेतली नसल्याचे निदर्शनास येते.

(२) सदर निविदाकार यांच्या कागदपत्रांची उचित छाननी न झाल्याने आल्हाट आर्ट स्टुडिओ अपात्र ठरत असताना छाननी तक्त्यामध्ये चुकीने पात्र ठरवून निविदेमध्ये तीन पात्र निविदा प्राप्त झाल्या दर्शवून दराबाबतचे पाकिट उघडण्यात आले. याबाबत मध्यवर्ती भांडार विभागाची जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे.

11 (४९)

III) तक्रारीत नमूद असल्याप्रमाणे मे.अक्षय ग्रीन एनर्जी व मे.अल्हाट आर्ट स्टुडिओ यांनी दाखल केलेल्या शॉप अॅक्ट नोंदणी दाखला व मनपा ठेकेदार नोंदणी प्रमाणपत्रात दोन्ही संस्थांनी सर्व्हे नं.६/अथर्व सोसायटी, कळस गावठाण, विश्रांतवाडी, पुणे (एम कॉर्प) पुणे शहर, पुणे हा एकच पत्ता नमुद केल्याचे कागदपत्रावरुन स्पष्ट होते.

मे.साई सेवा एंटरप्रायझेस यांना प्राधिकृत करत असलेच्या राज एंटरप्रायझेस यांच्या पत्रावरील पत्ता हा दरपत्रक सादर केलेल्या राज एंटरप्रायझेस यांचा पत्ता यामध्ये तफावत असून दरपत्रकात सोनी एंटरप्रायझेस यांचा पत्ता राज एंटरप्रायझेस यांच्या प्राधिकृत पत्रात नमूद असल्याचे निदर्शनास येत आहे.

प्राप्त दरपत्रकातील मे.सोनी एंटरप्रायझेस व राज एंटरप्रायझेस यांच्या दरपत्रकामधील मूर्त्याच्या specification मध्ये मूर्तीचे वजन ऐवजी "वनज" असे नमूद आहे.

निष्कर्ष :-

वरील प्रमाणे वस्तुस्थिती असून उपलब्ध कागदपत्रे पाहता मध्यवर्ती भांडार विभागाने कागदपत्रांची छाननी करताना आवश्यक ती दक्षता घेतल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे निविदाधारकांनी संगनमताने दर भरल्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच अंदाजीत किंमत ठरवताना ज्या पुरवठादाराकडून दरपत्रके घेण्यात आली त्यांनीच निविदा प्रक्रियेत भाग घेतला असल्याने प्राप्त अंदाजपत्रकीय दर योग्य असल्याची खात्री पटवता आली नाही. तसेच सदरची बाब मूर्ती बनवणे म्हणजे कलाकृती असल्याने त्याची निश्चित किंमत उपलब्ध नाही. सबब सदर खरेदीचे देयक अदा करण्यापूर्वी मूर्तीची योग्य व वाजवी किंमत दक्षता व गुणनियंत्रण विभागाकडून निश्चित करुन घेणे आवश्यक वाटते.

IV) दिनांक ०६/०८/२०१६ रोजी झालेल्या चर्चा / सुनावणी दरम्यान मा.नगरसेविका सौ सिमा सावळे यांनी प्रस्तुत निविदा मंजूरी प्राधिकाराबाबत मुद्दा उपस्थित केलेला आहे. निविदेची अंदाजित रक्कम रु.२५,६७,५००/- असल्याने मा.स्थायी समितीकडे विषय अवलोकनार्थ न ठेवता विषयपत्राला पूर्व मंजूरी घेणे आवश्यक होते. तथापि विभागाने सदरचा विषय अवलोकनार्थ ठेवला आहे. विभागाने विषयपत्र समुचित प्राधिका-याकडे ठेवताना योग्य ती दक्षता घेतली नाही.

प्रस्तुत प्रकरणी वरीलप्रमाणे द्विसदस्यीय समिती निष्कर्ष नोंदवित आहे. तथापि या सर्व खरेदी प्रक्रियेमध्ये समिती सदस्य सहाय्यक आयुक्त (प्रशासन) यांनी जनता संपर्क विभागाचा पदभार असल्यामुळे आषाढीवारी पालखी सोहळा २०१६ करीता झालेल्या

बैठकीतील सूचना व मा.महापौर यांची दिनांक २५/०५/२०१६ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने दिंडी प्रमुखांना वाटप करावयाच्या विठ्ठल रुक्मिणी मूर्तीची मागणी नोंदविण्यात आली आहे.

सदर खरेदीबाबत विभागाने निविदाकारांची अर्हता छाननी करुन तीनही निविदाकारांना पात्र ठरवून त्यांचे दराचे पाकीट उघडले आहे. पात्र दर जादा वाटल्याने लघुत्तम दराचा निविदाकार मे.अक्षय ग्रीन एनर्जी यांच्याकडून दर कमी करुन घेतले आहेत. विभागाने प्राप्त लघुत्तम दर रास्त वाजवी असल्याने ते स्विकृत करण्यास शिफारस केली आहे. सदर खरेदीचा विषय मा.स्थायी समितीकडे अवलोकनार्थ व तातडीने पुरवठा आदेश देणेबाबतचा प्रस्ताव समितीचे दुसरे सदस्य मुख्य लेखापरीक्षक यांच्याकडे सादर केला होता. वरीलप्रमाणे विभागाने केलेली कार्यवाही, निविदा अर्हता छाननी तक्ता व प्राप्त लघुत्तम दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.२२% कमी असल्याने विभागाच्या प्रस्तावावर शेरांकन केले आहे.

खरेदी प्रकरणी द्विसदस्यीय समिती सदस्याच्या कार्यक्षेत्रातील कामाची व्याप्ती निदर्शनास आणण्यात येत आहे.

सदर खरेदी प्रकरणाच्या चौकशीअंती मनपाच्या / विभागाच्या कार्यपध्दतीमध्ये निदर्शनास आलेल्या त्रुटीमध्ये सुधारणा करणेच्या अनुषंगाने खालील सुधारणा करणे आवश्यक असल्याचे समितीचे मत आहे.

(१) विभागाने खरेदी करताना पुरवठाधारकाकडून कोणत्या निश्चित कागदपत्रांची आवश्यकता आहे. याचा अभ्यास करुन निविदा अटी व शर्ती तयार करुन त्याचे तंतोतंत पालन करणे आवश्यक आहे.

(२) प्रचलित पध्दतीने म.न.पा.ला ज्या बाबी दरवर्षी करावयाच्या आहेत त्यासाठी वेळापत्रक व त्या कार्यक्रमाचे नियोजन वर्षाच्या सुरुवातीला करणे आवश्यक असून, वेळापत्रकाच्या अनुषंगाने निविदा प्रसिध्दी व तदअनुषंगिक बाबी विभागाने पार पाडण्याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

(३) शासन निर्णय उद्योग/उर्जा/कामगार विभाग क्र.भाखंस २०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग-४ दिनांक ३०/१०/२०१५ मध्ये नमुद ४.४.२ निविदा जाहिरात आणि वितरणाच्या तरतूदी प्रमाणे मनपाच्या जाहिरात रोटेशन धोरणामध्ये आवश्यक ते बदल करणे आवश्यक वाटते.

13

(४) ई-निविदेसाठी ठेकेदार / पुरवठादार यांची विभागाकडे होणा-या नोंदणीसाठी ते करत असलेल्या कामाचे / वस्तुंचा पुरवठा निश्चित करुन त्याप्रमाणे त्या त्या ठेकेदारांची / पुरवठादार यांची वर्गवार यादी तयार असणे आवश्यक आहे.

(५) अंदाजपत्रकीय रक्कम निश्चित करताना सद्यस्थितीतील प्रचलित पध्दत योग्य नसून पुरेशी प्रसिध्दी देवून दरपत्रके मागणी करुन घेणे आवश्यक आहे.

(६) मनपा मार्फत ई-निविदा राबविण्यात येते. ई-निविदा राबविताना निविदाकाराने सर्व कागदपत्रे स्कॅन करुन पहिल्या पाकिटासोबत जोडणे आवश्यक आहे. तथापि अजूनही विभागाकडून निविदा सादर करण्याच्या शेवटच्या दिवशी त्या निविदाधारकाकडून कागदपत्रे प्रत्यक्ष घेतली जातात हे योग्य नाही.

(७) आषाढीवारी सोहळ्यामध्ये दिंडी प्रमुखांना व विणेक-यांना सन्मानार्थ वस्तु स्वरुपात भेट देण्याऐवजी वारक-याच्या मागणीप्रमाणे पालखी सोहळ्यासाठी आवश्यक असलेल्या सोयी सुविधा पुरविणे योग्य होईल.

आपले विश्वासू,

मुख्य लेखापरीक्षक　　　　सहाय्यक आयुक्त (प्रशासन)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.
मुख्य लेखापरीक्षक व
सहा.आयुक्त, प्रशासन,
द्विसदस्यीय समिती
दि.२०/१०/२०१६

# शुध्दीपत्रक

विषय : दिंडी प्रमुखाला देण्यात आलेल्या विठ्ठल-रुक्मिणी मूर्ती खरेदीतील भ्रष्टाचाराची चौकशी बाबतचा अहवाल...

संदर्भ : उपरोक्त विषयाबाबतचा दि.२०/०८/२०१६ रोजीचा मूळ अहवाल

उपरोक्त विषयान्वये दि.२०/०८/२०१६ रोजी द्विसदस्यीय समितीने अहवाल सादर केला होता. अहवालातील पृष्ठ क्र. १ वरील संदर्भ क्र. (१) ते (५) नंतर

संदर्भ क्र. (६) श्री.राहूल तानाजी कलाटे, शिवसेना शहर प्रमुख, पिंपरी चिंचवड यांचे दि.१८/०७/२०१६ चे निवेदन

संदर्भ क्र. (७) श्री.धनंजय मुरलीधर आल्हाट, नगरसेवक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे निवेदन चा अहवालात शुध्दीपत्रकान्वये समावेश करणेत येत आहे.

सहाय्यक आयुक्त, प्रशासन,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

मुख्य लेखापरीक्षक
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.